विज्ञान निर्भयता नीती

# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका



ऑक्टोबर २०२१
वर्ष पहिले | अंक चौथा

विज्ञान निर्भयता नीती

# महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती

संस्थापक : शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर

स्थापना : ९ ऑगस्ट १९८९

माणसांना विवेकी बनविणारे सशक्त संघटन

## पंचसुत्री

- **शोषण करणाऱ्या अंधश्रद्धांना विरोध**
- **वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रचार, प्रसार, अंगिकार**
- **धर्माची विधायक कृतिशील चिकित्सा**
- **संत-समाजसुधारकांचा वारसा पुढे नेण्याचा प्रयत्न**
- **व्यापक समाज परिवर्तनवादी चळवळीबरोबर सहयोग**



**डॉ. नरेंद्र दाभोलकर**
संस्थापक कार्याध्यक्ष
महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती

विवेकी विचार हेच खरे माणूसपणाचे लक्षण

विज्ञान निर्भयता नीती

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे मुखपत्र

# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

(मराठी मासिक)

ऑक्टोबर २०२१
वर्ष पहिले | अंक चौथा

**अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका**

**संपादक**
नितीन शिंदे

**कार्यकारी संपादक**
उत्तम जोगदंड

**सह संपादक**
एकनाथ पाटील

**सदस्य**
दीपक बाविस्कर
श्यामसुंदर मिरजकर
मांतेश हिरेमठ

**व्यवस्थापक मंडळ**
**व्यवस्थापकीय संपादक**
अवधूत कांबळे
**सदस्य**
तुकाराम शिंदे
राजेंद्र फेगडे
विशाल विमल

**सल्लागार मंडळ**
प्रदीप पाटकर
संध्या नरे-पवार
**कायदेशीर सल्लागार**
ॲड. गोविंद पाटील

सदरचे मासिक संपादक नितीन शिवाजीराव शिंदे यांनी संपादित केले आहे आणि प्रकाशक अविनाश रमेश पाटील यांनी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, भास्कर-६८, कालिकादेवीनगर, संघमा चौक, गोळीबार टेकडी रस्ता, धुळे, ४२४००१ येथून प्रकाशित केले आहे. महा. अंनिससाठी विवेक जागर ट्रस्टच्यावतीने प्रकाशित करण्यात आलेल्या या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, प्रकाशक, महा. अंनिस आणि विवेक जागर ट्रस्ट सहमत असेलच असे नाही. कायदेशीर बाबींसाठी मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारीसाहेब, इस्लामपूर ता. वाळवा जि. सांगली यांचे कार्यक्षेत्र असेल.

**मुखपृष्ठ**
गणेश पोतदार
इस्लामपूर

**संपादकीय पत्ता**
संपादक, अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका, 'कल्पतरू', कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजसमोर, इस्लामपूर, जि. सांगली, ४१५४०९

# अनुक्रमणिका


- **संपादकीय** |श्यामसुंदर मिरजकर | ३
- **अभिवादन**
  ⌘ गांधी समजून घेताना | संकेत मुनोत | ५
- **विचारविश्व**
  ⌘ चार्वाक दर्शन : भौतिकवादी विज्ञाननिष्ठ जीवनदृष्टी | अरुण शिंदे | ९
- **संताचिये द्वारी**
  ⌘ तुकड्यादास म्हणे... | माधव जाधव | १२
- **महिलाविश्व**
  ⌘ मी लेकुरवाळी... | सुषमा बसवंत | १६
- **मानसिक आरोग्य**
  ⌘ असमानतेतही मानसिक आरोग्य | प्रदीप जोशी | १८
  ⌘ आत्महत्या हा पर्याय नाही | सुरेश थोरात | २१
- **मनापासून**
  ⌘ ऐका हो ऐका – मनापासून ऐका| प्रदीप पाटकर | २४
- **विज्ञान जगत**
  ⌘ वेध खगोलीय आविष्कारांचा | शंकर शेलार | २६
- **भानामती**
  ⌘ अखेर भानामती थांबली | माधव बावगे | २८
  ⌘ जादुटोण्याचा संशय मानवजातीला कलंक | पी. एम. जाधव | ३१
- **कायदेविश्व**
  ⌘ सार्वजनिक दायित्वाची जाणीव करुन देणारी जनहितार्थ याचिका | ॲड.गोविंद पाटील | ३५
- **प्रश्नोत्तरे**
  ⌘ प्रश्न तुमचा उत्तर आमचे | उत्तम जोगदंड | ३८
- **चमत्कार मीमांसा**
  ⌘ देवदेवस्कीची बाधा लिंबातून निघे धागा | मच्छिंद्रनाथ मुंडे | ४०
- **जडणघडण**
  ⌘ महाराष्ट्र अंनिस सोबतची माझी वाटचाल | सुधाकर तट | ४२
- **पुस्तक परिचय**
  ⌘ संविधानाच्या स्वप्नातलं गाव | पूजा आकोटकर | ४५
- **कविता**
  ⌘ संवाद | अतुल जगताप | ४८
- **महा. अंनिसची खबरबात** | विशाल विमल | ४९

# विचारांच्या मशाली उंचावून चळवळ चालत असते!

महात्मा गांधींनी वस्त्रत्यागाची घोषणा केली, त्या घटनेला २२ सप्टेंबर २०२१ रोजी शंभर वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्त गांधीतीर्थ जळगाव येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलताना मराठीतील बहुचर्चित साहित्यिक डॉ. भालचंद्र नेमाडे म्हणाले, "एकूण मानवतेच्या इतिहासात जी मोठी मोठी माणसं झाली, त्यात गौतम बुद्ध एक सगळ्यात मोठा समजला जातो आणि आपल्या देशातून गांधीजी हे दुसरं मोठं व्यक्तिमत्त्व आहे. मानवी जीवनाच्या सर्व पैलूंना स्पर्श करणारा एवढेच नव्हे तर पूर्णतः शेवटपर्यंत माणूस म्हणून राहणारा, दैवतीकरण टाळणारा आणि सगळ्यात खालच्या स्तरापर्यंत जाणारा हा माणूस होता."

याच दिवशी अमेरिकेत व्हाईट हाऊसच्या ओव्हल ऑफिस मध्ये भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांची बैठक झाली. त्यावेळी राष्ट्राध्यक्ष जो बायडेन म्हणाले, "अहिंसा, आदर आणि सहिष्णुता या महात्मा गांधींच्या आदर्शांची आजच्या काळात सर्वाधिक गरज आहे." त्यावेळी पंतप्रधान मोदींनी ही महात्मा गांधींच्या सिद्धांताचे दाखले देत संपूर्ण विश्वासाठी ते किती फायदेशीर आहेत, ते सांगितले.

याचा अर्थ इतकाच की भारतीय पटलावर साहित्यिक आणि विचारवंत गांधीविचारांची जी समकालीन महत्ता अधोरेखित करतात तीच गांधींची थोरवी जागतिक पटलावर उद्घोषिली जाते. त्यामुळे इकडे नथुरामच्या पुतळ्याला हार घालून नतमस्तक होणारे नेते परदेशात गेल्यावर मात्र बुद्ध, गांधी आणि आंबेडकर या महामानवांच्या विचारांचा व कार्याचा उद्घोष करतात. कारण करुणा, मंगल मैत्री, समता, सत्याग्रह, अहिंसा, आत्मसन्मान आणि ज्ञान या उदात्त मानवी मूल्यांचा जो वसा वारसा या महामानवांनी दिला, तो कोणत्याही सांप्रदायिक, धार्मिक, मूलतत्त्ववादी नेतृत्वाने दिलेला नाही, हे आवर्जून लक्षात घेतले पाहिजे. गांधींचे चिरंतन प्रेरणादायी कार्य समजून घेण्यासाठी आपणास रावसाहेब कसबे यांचे 'गांधी : पराभूत राजकारणी आणि विजयी महात्मा' व रामचंद्र गुहा यांचे 'गांधींनंतरचा भारत' हे ग्रंथ मार्गदर्शक ठरतील.

आपल्या मातीतील महामानवांचे मोठेपण जेव्हा परदेशातील अभ्यासक सांगू लागतात तेव्हाच आपणाला ते वेगळ्या संदर्भात उमजू लागतात. रिचर्ड ॲटनबरो यांनी अनेक वर्षांच्या अभ्यासातून साकारलेली 'गांधी' ही चित्रपट कलाकृती किंवा डॉ. एलिनॉर झेलियट यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संदर्भात केलेली अभ्यासपूर्ण मांडणी हे याचेच उदाहरण आहे. अमेरिकेतील विदुषी संशोधक गेल ऑम्वेट यांनी भारतातील प्रागतिक महामानवांचा आणि त्यांच्या चळवळींचा अभ्यास केला तोही याच परंपरेतील आहे. अमेरिकेतील एका सधन व राजकारणात नावलौकिक असणाऱ्या कुटुंबातील गेल ऑम्वेट भारतात अभ्यासासाठी आल्या आणि डॉ. भारत पाटणकर या स्वातंत्र्य लढ्याचा वारसा लाभलेल्या कार्यकर्त्यासोबत संसार थाटून श्रमिक कष्टकऱ्यांच्या चळवळीत कार्यरत राहिल्या. त्याच म. फुले, डॉ. आंबेडकर यांच्या विचार-चळवळींचा अभ्यास करत इंग्रजीमधून नवी मांडणी करत राहिल्या. 'इंडियन वुमन इन स्ट्रगल', 'साँग ऑफ तुकोबा', 'सिकिंग बेगमपुरा', 'बुद्धिझम इन इंडिया', 'कल्चरल रिहोल्ट इन अ कॉलोनिअल सोसायटी' अशी पुस्तके लिहून त्यांनी सामाजिक चर्चाविश्वाचा परीघ अधिक रुंद केला. पुणे, मुंबई, दिल्ली, कोलकत्ता येथील विद्यापीठांमधून अभ्यागत प्राध्यापक म्हणून कार्यरत राहिलेल्या डॉ. गेल

ऑम्वेट यांनी कासेगाव (जि. सांगली) येथे शेवटचा श्वास घेतला. शेतकरी, स्त्रिया आणि दलित यांच्या जगण्यातील क्रांतिशलाका शोधणार्या आणि त्यांना आत्मभान देणाऱ्या गेल ऑम्वेट (२/८/१९४१ - २५/८/२०२१) चळवळीतील कार्यकर्त्यांचा समोर एक आदर्श वस्तुपाठ ठेवून गेल्या.

परिवर्तनवादी चळवळीतील लेखक सतीश काळसेकर, लेखक व संपादक जयंत पवार, स्त्रीवादी कार्यकर्त्या कमला भसीन आणि गेल ऑम्वेट या अंनिसच्या विचारपरंपरेला पाठबळ देणाऱ्या लेखक - कार्यकर्त्यांचे गेल्या काही दिवसात निधन झाले. अंनिस परिवाराच्यावतीने त्यांना विनम्र अभिवादन!

महाराष्ट्र अंनिसची वाटचाल ही नेहमीच बुद्धिप्रामाण्य, विवेकवाद, विज्ञाननिष्ठा आणि अंधश्रद्धा निर्मूलन या दिशेने झालेली आहे. हे कार्य करताना आपले स्वप्न हे भयमुक्त आणि व्यापक समाजभान असणाऱ्या प्रगल्भ समाजरचनेचे आहे. या वाटेवर महात्मा गांधींसारखे महामानव आपणास अहिंसेच्या मार्गाने लढा देऊन सत्याचा आग्रह धरायला लागतात. अशाच आदर्श समाजाची संकल्पना संत रविदास यांनी आपल्या 'बेगमपूर' या काव्यात केल्याचे गेल ऑम्वेट यांनी 'सिकिंग बेगमपुरा' पुस्तकात स्पष्ट केले आहे. कार्यकर्ता म्हणून आपली वाटचाल संत आणि महामानवांच्या विचारांचा प्रकाशझोतात होणे स्वाभाविक आहे. समाजात अज्ञान-अंधश्रद्धेविरुद्ध लढा उभारण्याचे नैतिक बळ आपणाला पूर्व परंपरेने दिले आहे. आपण एकाच वेळी रस्त्यावरचे वास्तव लढे आणि बौद्धिक पातळीवरील सनातनी परंपरावाद्यांशी वैचारिक लढे लढायला तयार असले पाहिजे, तरच संघटनेची वाटचाल उद्दिष्टांच्या दिशेने होत राहील. चालू अंक हा त्या दिशेनेच टाकलेले एक पाऊल आहे, असे आम्हाला वाटते.

महाराष्ट्र अंनिसच्या सर्व कार्यकर्त्यांना पाठबळ देणारे हितचिंतक आणि आमच्या अंकाचे विवेकी वाचक या सर्वांचे मनःपूर्वक धन्यवाद! येणारा अंक हा प्रत्यक्ष छापिल स्वरूपात आपल्या समोर येईल. आपण जाहिराती व वर्गणीच्या स्वरूपात आम्हाला बळ द्याल, अशी अपेक्षा आहे.

**- श्यामसुंदर मिरजकर**
९४२१२ १२३५२

■ ■ ■

# गांधी समजून घेताना



संकेत मुनोत
८६६८९ ७५१७८

अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीचे कार्य करतांना ते गावोगावी वाढवण्यासाठी गांधीजींची प्रेरणा मिळाली असे डॉ. दाभोलकर म्हणत. गांधींनी स्वतःला सुधारक वगैरे कधी म्हटले नाही. पण तसे न म्हणताही धर्माचा मौलिक अर्थ सांगत.त्यातून त्यांनी लोकांना सहिष्णू,चारित्र्यवान बनण्यास प्रवृत्त केले. लेखाच्या सुरुवातीलाच हे स्पष्ट करतो की, मी गांधीवादी नसून त्यांच्या विचारांचा छोटासा अभ्यासक आहे.

लहानपणी गांधीजींबद्दल मला आदर वाटायचा, मात्र ८वी ते १० वीच्या दरम्यान मी गांधीजींचा तिरस्कार करीत असे. देशाचे तुकडे करणारा, अहिंसेचा अतिरेक करणारा, ५५ कोटी देणारा, आंबेडकरांना, भगतसिंग, बोस यांना त्रास देणारा म्हातारा अशी काहीशी प्रतिमा अर्धवट वाचनातून मनात निर्माण झाली होती. त्यांच्या खुन्याची पुस्तके आणि नाटके पाहिली होती. त्यामुळे त्या खुन्याचा थोडा चाहता झालो होतो. पण सत्य वेगळेच आहे, हे मला दोन्ही बाजू वाचल्यावर लक्षात आले, जसजसा गांधी वाचू लागलो तसतसे सत्य उमगत गेले, स्वतःत सकारात्मक बदल घडविण्याची आणि Knowing Gandhi Global Friends चळवळ सुरू करण्याची प्रेरणा त्यातून मिळाली.

**१ . जागतिक प्रभाव-**

अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा, ॲपलचे मुख्य स्टीव्ह जॉब्स, विनोदाचा बादशहा चार्ली चॅप्लिन, दक्षिण आफ्रिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष नेल्सन मंडेला आणि जगातल्या कितीतरी लोकांनी त्यांच्या आयुष्यात गांधीविचारांची प्रेरणा असल्याचे कबूल केले आणि जागतिक परिवर्तन घडवून दाखवले. अल्बर्ट आईन्स्टाईन या थोर वैज्ञानिकांने तर म्हटलेलेच आहे की ''येणाऱ्या पिढ्या विश्वास ठेवणार नाहीत की असा कोणी हाडामांसाचा माणूस या पृथ्वीतलावर वावरत होता'' आणि होय आईन्स्टाईनच्या इतर सिद्धांताप्रमाणे हाही सिद्धांत खरा ठरतो की काय असे, वाटण्यासारखी परिस्थिती आज आहे.

**२. गांधीजी - जात आणि धर्म-**

गांधीजींनी कोणत्याही जातीचे वा धर्माचे अतिरेकी समर्थन केले नाही.म्हणून सर्व जातीतील कट्टरतावादी लोक त्यांचा द्वेष करतात. एका जातीतील कट्टर लोकांना पुणे करारामुळे गांधीजी ब्राह्मणधार्जिणे आणि दलितद्वेष्टे (मनुवादी) वाटतात. एका जातीतील काही कट्टर लोकांना गांधी ब्राह्मणद्वेष्टे, दलितधार्जिणे वाटतात. कारण जिथे एकाच जातीचे वर्चस्व होते अशी सर्व ठिकाणे राजकारण, समाजकारण व इतर अनेक गांधीजींनी अस्पृश्यता निवारण चळवळीद्वारे त्या जातीचे वर्चस्व संपवून सर्वांना त्यात पुढे आणले.

पाकिस्तानमधील काही कट्टर मुस्लिमांनाही आम्हाला छोटा पाकिस्तान दिला,काश्मीर दिला नाही वगैरे कारणांवरून गांधी मुस्लिमद्वेष्टे व हिंदुधार्जिणे वाटतात.

त्यामुळे गांधीजींच्या मागे त्यांचा उदो-उदो वा देव करणारा कोणताही जातसमूह नाही. जेवढी टिंगल गांधीजींची उडवली जाते,त्याच्या एक टक्का

जरी इतर कोणत्या महापुरुषाची झाली असती, तर दंगली झाल्या असत्या.पण कुठल्याही जातीचा, धर्माचा, पंथाचा आधार न घेता ते जगभर पोहोचले. याउलट इतर जातींच्या महापुरुषांना त्यांच्याच जातीच्या लोकांनी स्वतःपुरते संकुचित करून ठेवले.

काही महापुरुषांचे गुणगान करताना किंवा चरित्र लिहितांना गांधीजींना कमी लेखावेच लागते, त्याशिवाय त्यांचा महापुरुष 'मोठा' होत नाही. याउलट, गांधींचे वर्णन करताना कोणाला कमी लेखायची गरज नाही. गांधीजीनी स्वतःच्या चरित्रात इतर कुणाही पेक्षा स्वतःलाच कमी लेखले आहे.

**३. स्वातंत्र्य फक्त गांधींमुळेच मिळाले का?**

असं कोणीही म्हणत नाही की, स्वातंत्र्य फक्त गांधींमुळे मिळाले. पण हे राष्ट्र घडवण्यात, सर्व जाती-पाती, धर्मांच्या लोकांना एकत्र आणण्यात, कोट्यवधी सामान्य माणसांना इंग्रजांविरुद्ध निर्भयपणे लढण्यास प्रेरणा देणारे ते होते. त्यामुळे ते स्वातंत्र्य लढ्याचे नायक ठरतात आणि हे त्याकाळचे सर्वच नेते मान्य करतात. नेताजी बोस त्यामुळेच त्यांना ' राष्ट्रपिता' म्हणतात आणि आझाद हिंद सेनेतही प्रत्येक कार्यक्रमानंतर 'महात्मा गांधी की जय' म्हटले जाते. जसे 'छत्रपती शिवाजी महाराज की जय' म्हटलं की सगळे मावळे त्यात येतात . त्यात वेगवेगळ्या मावळ्यांची वेगळी नावे घेऊन जय म्हणण्याची गरज पडत नाही.तसेच 'महात्मा गांधी की जय' म्हटलं की त्याकाळचे सगळेच स्वातंत्र्यसैनिक येतात.

**४. ब्रिटिशांचे जगातील साम्राज्य कमी करण्यात गांधीजींचा वाटा-**

पूर्ण जगावर राज्य करणाऱ्या ब्रिटिश साम्राज्याचे पंतप्रधान चर्चिल म्हणाले होते की, या गांधीला जर जनरल स्मट्सने आफ्रिकेतील तुरुंगातच संपवले असते तर, ब्रिटिशांचे जगावर राज्य अजून काही दशके टिकले असते.शिवाय भारताला स्वातंत्र्य दिले तर १० वर्षात भारताचे तुकडे तुकडे होऊन हा देश बेचिराख होईल, असेही त्याचे म्हणणे होते. पण स्वातंत्र्य मिळून ७० वर्षे झाली तरी आपण आजही एकत्र आहोत आणि लोकशाही टिकून आहे ती या गांधींविचारांमुळेच.

**५. शहीदे आजम भगतसिंग यांची फाशी आणि म. गांधी-**

भगतसिंग आणि क्रांतिकारकांचे प्राण वाचावे यासाठी गांधी गव्हर्नर जनरल आयर्विन यास भेटले व फाशीची शिक्षा अमलात न आणण्याची विनंती केली. शिक्षेच्या एक दिवस आधी त्यांनी आपले सर्व भाषिक कौशल्य पणाला लावून पत्र लिहून अगदी येशू ख्रिस्ताचा दाखला देऊनही शिक्षा माफ करण्याची विनंती केली. पण त्यास न जुमानता फाशी अंमलात आणली गेली. ब्रिटिश गांधीजींचे सहज ऐकणारे असते, तर गांधी म्हटले असते चले जाव आणि ब्रिटिश निघून गेले असते. तसे मग ब्रिटिशांनी कस्तुरबांच्या आरोग्याची मुद्दामहून गैरसोय करून त्यांची हत्या ही केली नसती.

दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे भगतसिंग आणि त्याचे सहकारी हौतात्म्यासाठी खूपच अधीर झाले होते. त्यांना माफी नकोच होती, म्हणून तर त्यांनी खटल्या दरम्यान बचावाचा प्रयत्न केला नाही. वीर भगतसिंग यांनी स्वतःच्या पालकांनाही खडसावून शिक्षा माफ करण्यासाठी कुठलेही प्रयत्न करू नका असे सांगितले. आमच्या हुतात्मा होण्याने हजारो तरुणांना स्वातंत्र्य लढ्याची प्रेरणा मिळेल, असे ते म्हणत असत.

**६. गांधीजी खूप आध्यात्मिक वा धार्मिक होते असा काही कट्टर नास्तिक मंडळींचा आरोप असतो -**

सत्य - गांधीजी हे धार्मिक व आध्यात्मिक असले तरी धर्मांध व दुसऱ्या धर्माचा द्वेष करणारे नव्हते. गांधीजींचे अध्यात्म हे धार्मिक अथवा

साक्षात्कारी नव्हते. त्याला सामाजिक परिमाणे होती. समाजाची सेवा, निसर्गाचे रक्षण, जलसंवर्धन, सार्वजनिक आरोग्याची काळजी हे त्यांना अभिप्रेत होते. व्यक्तिगत त्याग व व्यक्तिगत विकास यातून समाजाच्या हिताचा व्यापक विचार त्यांनी मांडला होता. एकाही डोळ्यातून एकही अश्रू निघू नये, गरिबी, अन्याय, विषमता यांचे उच्चाटन व्हावे, हीच त्यांची जीवनदृष्टी होती, हेच त्यांचे अध्यात्म होते आणि हाच त्यांचा परमार्थ होता. स्वातंत्र्याचा उल्लेख करणाऱ्यांनी स्वातंत्र्याकडे कसे पाहावे, याची दृष्टी गांधीजींच्या आचरणातून मिळते..

### ७. गांधीहत्येनंतर ब्राह्मणांची हत्या झाली का?

गांधीहत्येनंतर कत्तल वगैरे काही झाली नाही. काही घरे अवश्य जाळली गेली. भ्याडपणे नथुराम गोडसेने जेव्हा प्रार्थनेला जाणाऱ्या गांधीजींची हत्या केली, त्यानंतर तो स्वतःची ओळख सांगत नव्हता. स्वतःला मुसलमान दाखवून, गांधीजींची हत्या एका मुस्लिमाने केली असे सांगून भारतभर हिंदू-मुस्लिम दंगल पेटवून कत्तली घडवण्याचा आणि सरकार पाडण्याचा त्याचा आणि त्याच्या संघटनेचा डाव होता. त्या ठिकाणी जेव्हा व्हॉईसरॉय लॉर्ड माउंटबॅटन आले तेव्हा लोक त्यांच्याकडे आले आणि हत्या करणारा मुस्लिम आहे का? असे विचारू लागले. त्यांनी तसे असणे शक्यच नाही असे सांगितले. नंतर काकासाहेब गाडगीळ यांनी नथुरामला ओळखले आणि मोठा अनर्थ टळला. राष्ट्रपित्याच्या हत्येमुळे पूर्ण देश शोकात बुडालेला असतांना काही लोकांनी साखर आणि मिठाई वाटणे सुरु केले. आमचा बाप गेला आणि यांना कसला आनंद झाला म्हणून लोक भडकले आणि धावून गेले पण यात कुणाचीही कत्तल झाली नाही. पुणे, नगर आणि अनेक ठिकाणी गांधीवाद्यांनीच मध्ये पडून घरे, वाडे जळण्यापासून वाचविली आणि जमावाला शांत केले. गांधीवाद्यांनी कधीही ब्राह्मणांचा किंवा कुठल्या जातीचा विरोध वा द्वेष केला नाही. आचार्य विनोबा भावे, कालेलकर, धर्माधिकारी हे गांधीजींचे महाराष्ट्रातील प्रमुख शिष्य कोण होते? जर द्वेष असता तर यांना गांधीवाद्यांनी गांधीनंतर आपले मानले असते का?

### ८. गांधीहत्या-

गांधीहत्येबद्दल ५५ कोटी रुपये, फाळणी आदी काही खोटी कारणे सांगितली जातात,पण हे सत्य नाही. फाळणीला शेवटपर्यत विरोध करणारे एकमेव गांधीजींच होते तर त्यांचे उपोषण हे ५५ कोटींसाठी नसून दंगली थांबाव्यात यासाठी होते. सरकारने ५५ कोटी देण्याचे कबूल केले तरी ते उपोषण थांबले नव्हते. दंगल थांबली तेव्हा त्यांनी उपोषण मागे घेतले. गांधीहत्येचे मुख्य कारण होते त्यांचे सर्वसमावेशक धोरण. जे कार्य हजारो वर्षांपूर्वी भ. महावीर व म. बुद्धांनी केले तेच काम गांधीजींनी आता केले. ते म्हणजे धर्म, राजकारण, शिक्षण, अर्थकारण, समाजकारण आदी सगळीकडे एका वर्गाची मक्तेदारी, वर्चस्व मोडून काढून ते सामान्य माणसांसाठी खुले केले. गांधीजींच्या उदयापूर्वी राजकारण, धर्मकारण आदी ठिकाणी मुख्यतः उच्चवर्णीय लोकांची मक्तेदारी होती, ज्यामुळे त्यांची हत्या झाली. गांधीजींवर पहिला हल्ला पुण्यात जुन १९३४ मध्ये ते अस्पृश्यता निवारण चळवळीचे कार्य करत असतांना झाला जेव्हा ५५ कोटी, फाळणी इ. गोष्टीही अस्तित्वात नव्हत्या. सनातनी लोकांनी तो हल्ला घडवला होता. त्यानंतरही अनेक हल्ले झाले.

### ९. परिवर्तन –

गांधी स्वतःत नेहमी सकारात्मक परिवर्तन करत राहिले उदा – चातुर्वर्ण्याबद्दलची त्यांची मते बदलत गेली. फक्त आंतरजातीय विवाहातच उपस्थित राहणार, असा पण त्यांनी केला आणि

शेवटपर्यंत त्याचे पालन केले. याचा परिणाम आजही दिसतो. उदाहरण सांगतो, माझे जेष्ठ मित्र पोलीस प्रेमसागर सांगतात की, त्या दोघांचे आंतरजातीय लग्न जवळजवळ अशक्य होते. त्यांचा जवळचा मित्रही त्यांना सल्ला देऊन सोडून गेला की, "या आंतरजातीय विवाहात तुझा खून वगैरे होऊ नये म्हणून म्हणून तू लांब रहा यापासून." हे चालू असताना मुलीच्या आजीकडे (आईची आई) हे प्रकरण गेले. त्या म्हणाल्या "अरे लडका हरिजन है, मतलब अपने से भी उपर है ऐसा गांधीजीने कहा है।" त्या आजीला कोणी विरुद्ध बोलू शकलं नाही, कारण गांधींचे एवढे स्थान सगळीकडे होते. ३० वर्षांपूर्वी त्यांचे लग्न झाले तेव्हा माझ्या लग्नात म. गांधी उपस्थित असल्यासारखे मला यामुळे वाटल्याचे पोलीस प्रेमसागरजी मला म्हणाले होते. तेव्हा मलाही भरून आले की,किती लोकांना अंतर्बाह्य बदलून टाकले या गांधीने.

**१०. पर्यावरण –**

पृथ्वीकडे सर्वांची गरज भागवण्याएवढे आहे पण एकाची हाव भागवू शकेल एवढे नाही, असे ते म्हणत. आज जगभर जेव्हा पर्यावरणासाठी मोर्चे निघतात, तेव्हा त्यावर गांधीजींचे हेच वाक्य असते.

**११. स्त्रियांचे सक्षमीकरण-**

जीवनाच्या ज्या ज्या क्षेत्रात पुरुष कार्य करतात,त्या त्या क्षेत्रात स्त्रिया कार्य करू शकतात; स्त्रियांना कार्य करता आले पाहिजे आणि स्त्रियांनी कार्य केले पाहिजे हा गांधीजींचा आग्रह होता. त्यामुळेच त्यांनी स्त्रियांसाठी खास असे काही कार्यक्रम राबवले नसले, तरी त्यांच्या सार्वजनिक कार्यक्रमांची योजनाच अशी असायची की त्यात स्त्रियांचा सहभाग आवश्यक असे. एकदा बिहारमध्ये त्यांना एका कार्यक्रमासाठी निमंत्रित केले होते. आपल्या संपूर्ण देशामध्ये स्त्रियांना चूल, मुल, पदर आणि बुरखा एवढ्यापुरतेच मर्यादित ठेवले जाई. बिहार मध्ये तर स्त्रियांवर अजून काही बंधने होती. असे असताना गांधीजींनी अट घातली की, कार्यक्रमात स्त्रिया आणि पुरुषांची संख्या बरोबरीने असली तरच मी कार्यक्रमाला येणार आणि तेथे तो चमत्कार घडलासुद्धा. आपली भारतीय राज्यघटना तयार करण्यात अनेक गांधीवादी स्त्रियांचे मोठे योगदान आहे. स्त्रियांना मतदानाचा हक्क मिळण्यासाठी अनेक विकसित देशांना भांडावे लागले. आपल्या भारतात ते स्वातंत्र्यासोबतच मिळाले त्याला कारण गांधींनी तयार केलेली मानसिकता.

शेवटी बाबा आमटेंच्या मुक्तछंदातील हे शब्द सांगून विराम घेतो. त्याने प्रथम एका मिठाच्या पुडीला हात घातला आणि मग एक साम्राज्य मिठाच्या सात समुद्रापलीकडे फेकून दिले. त्याने सुतातून सुरुवात केली आणि अखेर स्वराज्याचा स्वर्ग गाठून दाखवला. याच साध्या सुताने त्याने एक पिढीची पिढी आणि एक देशाचा देश बांधून दाखवला. पण एक देशाचा देश आणि एक पिढीची पिढी पकडण्यासाठी नुसतीच हिकमत पुरी पडत नाही, त्यासाठी ताकदही लागते, भारी वजनाचा एक क्रूस वाहण्याची ताकद! ज्याला तो क्रूस वागवता येतो त्याच्या सोबत बारा अनुयायी असले तरी त्याचे प्रेषितत्व घाबरत नाही. पण खांद्यावर क्रूस नसता कुणी बारा लाख बाजारबुणगे घेऊन निघाला तरी त्याचा महंत होतो आणि महंत फक्त गादी चालवू शकतात. मन्वंतरे घडवून आणू शकत नाहीत. चला तर मग बदलाची सुरुवात स्वतःपासून करूया.

■ ■ ■

# चार्वाक दर्शन : भौतिकवादी विज्ञाननिष्ठ जीवनदृष्टी



अरुण शिंदे
९४२१० २४०५५

चार्वाकांनी मोक्षाप्रमाणेच धर्म हा पुरुषार्थही नाकारला. चार्वाकांशी परलोकाशी संबंधित सर्व संकल्पना नाकारल्या असल्यामुळे पारलौकिकाचे फळ देण्याचे साधन असणारा धर्मही त्यांनी नाकारणे स्वाभाविक होते. धर्माच्या बाबतीतील चार्वाकांची मते जाणून घेणे आवश्यक आहे. ' सर्वदर्शनसंग्रहा' मध्ये पुढील विधान आढळते, “ बहुधा सर्व लोक नीतिशास्त्र व कामशास्त्र यांना अनुसरून अर्थ व काम हे दोनच पुरुषार्थ मानतात, पारलौकिक पदार्थ नाकारतात आणि अशा रीतीने चार्वाकमताचे अनुसरण करीत असलेलेच आढळतात.” हरिभद्रसूरींनी म्हटले आहे की, 'चार्वाक धर्म मानत नाहीत!' वात्सायनानं लोकायत मत मांडताना म्हटले आहे, “ धर्माचे आचरण करू नये. कारण त्याचे फळ पुनर्जन्मानंतर वा स्वर्गात मिळावयाचे असते. तसेच ते मिळेल की नाही, हे शंकास्पद असते. मूर्ख नसलेला कोण मनुष्य आपल्या हाती असलेली गोष्ट परस्वाधीन करील.” 'बार्हस्पत्य अर्थशास्त्रा'तील लोकायतिक म्हणतो, ' धर्माचरण व्यर्थ आहे, ते पैसा मिळविण्याचे साधन म्हणून वापरले जाते. श्राद्धांचे जेवण जेवणारा चोर होय. तो पोट भरण्यासाठी धर्माचा उपदेश करतो, दुसऱ्याची निंदा करण्यासाठी तो वेद, धर्मशास्त्रे वगैरेंचे पठण करतो...!' अशा रीतीने चार्वाकांनी धर्म- अधर्म, पाप- पुण्य या संकल्पना परलोकाच्या संदर्भात नाकारल्या आहेत. ईश्वरप्राप्ती, मोक्ष व पारलौकिक सुखाच्या नावाखाली दांभिकता, फसवणूक, शोषण यांचा तिटकारा चार्वाकांना आला होता. म्हणून त्यांनी या सर्व शोषणाचे मूळ असणारा धर्म व तद्नुषंगिक संकल्पना नाकारल्या.

प्राचीन वैदिक काळामध्ये यज्ञाचे वारेमाप स्तोम माजले होते. यज्ञ हाच धर्म झाला होता. स्वर्गादी फळाच्या अपेक्षेने इंद्रादी देवतांना उद्देशून अग्नीमध्ये तूप वगैरेंची समंत्रक आहुती दिली जात असे. यज्ञाचा खर्च यजमान करीत असे. यज्ञकर्माचे अनुष्ठान यजमानाच्या वतीने ऋत्विज करीत आणि त्याबद्दल त्यांना दक्षिणा मिळे. अनुभवगम्य नसलेल्या स्वर्ग, देवता, अदृष्ट इत्यादी अलौकिक संकल्पनांवर यज्ञसंस्था उभारलेली होती. त्यामुळे चार्वाकांनी यज्ञसंस्थेवर तसेच धार्मिक कर्मकांडावरही हल्ले चढविले. यज्ञातील अवास्तवता, ढोंगबाजी, पुरोहितांचे हितसंबंध, लैंगिक उच्छृंखलता, हिंसा इत्यादी अनेक गोष्टींवर त्यांनी चिकित्सेच्या धारदार शस्त्रांनी तीव्र हल्ले केले. चार्वाक म्हणतात, 'दगड पाण्यावर तरंगतो, असे म्हणणे हे जितके खरे, तितकेच यज्ञाचे फळ मिळते, असे वेदाचे म्हणणेही खरे होय.' यज्ञातील अग्नीत द्रव्यनाश केल्यामुळे यजमानांना जर स्वर्ग मिळत असेल, तर वणव्याने जळालेल्या झाडांनाही भरपूर फळे लागावयास हवीत. श्राद्धामुळे जर मेलेल्या माणसांची तृप्ती होत असेल, तर विझलेल्या दिव्यांची ज्योतही तेलामुळे प्रज्वलित होईल. “ प्रवासास निघालेल्या लोकांनी आपल्याबरोबर शिदोरी घेण्याचा विचार व्यर्थ होय. घरातील लोकांनी त्यांच्यासाठी श्राद्ध केले असता, प्रवासात ते तृप्त होऊ शकतील.” “येथे दान दिल्यामुळे स्वर्गातील व्यक्ती तृप्त होत असतील, तर खालच्या मजल्यावर अर्पण केलेले अन्न महालाच्या वरच्या मजल्यावरील व्यक्तींना का बरे पोचू नये?” अशा

रीतीने यज्ञादी कर्माच्या कथित फळास चार्वाकांनी तार्किक युक्तिवादाच्या आधारे हास्यास्पद ठरविले आहे. यज्ञांच्याद्वारे अदृष्ट फळांच्या प्राप्तीसाठी धडपडणे हा लोकांचा मूर्खपणा आहे, असे चार्वाकांनी म्हटले आहे. यज्ञाच्या फळासंदर्भातील पुरोहितांचे दावे व त्यांची ढोंगबाजी यांवर चार्वाकांनी कडक टीका केली.

यज्ञामागे पुरोहितांचे आर्थिक हितसंबंध दडलेले आहेत, हे चार्वाकांनी उघड केले. 'सर्वदर्शनसंग्रहा'त बृहस्पतीचे विचार पुढीलप्रमाणे उद्धृत केले आहेत, 'अग्निहोत्रामुळे बुद्धी व कर्तृत्व नसलेल्या लोकांच्या उपजीविकेची सोय होते', ' मेलेल्या माणसांसाठी श्राद्ध वगैरे करणे ही ब्राह्मणांनी केलेली उपजीविकेची सोय आहे', 'ऐहिक स्वार्थ साधू पाहणाऱ्या क्षुद्रांनी यज्ञ, श्राद्ध यांसारख्या गोष्टी निर्माण केल्या आहेत' (पद्मपुराण). 'धर्म व्यर्थ आहे. तो (पुरोहितांच्या दृष्टीने) अर्थप्राप्तीचे साधन आहे. श्राद्धातील जेवण घेणारा चोर होय. अग्निहोत्र, संध्या, जप इत्यादी सर्व गोष्टी तो अर्थप्राप्तीसाठी करतो.' धार्मिक कर्मकांडांमागील ऐहिक हितसंबंध उलगडताना चार्वाक म्हणतात, ' सोने व भूमी यांचे दान, पक्वान्न- भोजनाचे आमंत्रण यांसारख्या गोष्टी भुकेलेल्या पोटच्या दरिद्री लोकांनी शोधून काढल्या आहेत' ( सर्वसिद्धांतसंग्रह) . यज्ञातील लैंगिक उच्छृंखलता, आत्यंतिक हिंसा यांमुळेही चार्वाकांनी यज्ञविरोधी भूमिका घेतली.

चातुर्वर्ण्यव्यवस्था हे वैदिक धर्माचे एक व्यवच्छेदक लक्षण आहे व वैदिक संस्कृतीच्या कट्टर अनुयायांना त्याचा अभिमान वाटत असतो. चार्वाकांनी मात्र चातुर्वर्ण्यव्यवस्थेवर कडाडून हल्ला चढविला आहे. 'सर्व मानवांच्या शरीरातील मुख वगैरे अवयव समान असताना त्यांच्यामध्ये वर्णांची उच्चनीचता कसली आली आहे?' असा सवाल चार्वाकांनी विचारला आहे. वंशशुद्धीच्या कल्पनेलाही त्यांनी आव्हान दिले होते.

चार्वाकांनी वैदिकांच्या ऐतखाऊपणाच्या मार्गावर टीका करून कष्टाने उपजीविका करण्याचा मार्ग सांगितला आहे. ' शहाण्या माणसाने या जगामध्ये नेहमी शेती, पशुपालन, व्यापार, दंडनीती इत्यादी प्रत्यक्षसिद्ध मार्गांनीच भोगांचा अनुभव घ्यावा' (सर्वसिद्धांतसंग्रह), असे चार्वाकांनी म्हटले आहे. अर्थशास्त्राचा त्यांनी अत्यंत गांभीर्याने विचार केला होता. म्हणूनच अर्थसाधनेसाठी ' ऐहिक व्यवहार यशस्वी करण्यासाठी लोकायत हे सर्वश्रेष्ठ शास्त्र आहे', असे 'बार्हस्पत्यसूत्र' तसेच सोमदेवाने म्हटले आहे.

समाजनियमनासाठी चार्वाकांनी दंडनीती ही स्वतंत्र विद्या मानली होती. ' ज्याने लोकायतमताचा अभ्यास केला आहे, असा राजा राष्ट्रकंटकांचा उच्छेद करण्यासाठी धडपडतो', असे सोमदेवाने म्हटले आहे.

चार्वाकांनी प्रयत्नवादाचा हिरिरीने पुरस्कार केला. 'जोपर्यंत जगायचे आहे, तोपर्यंत सुखाने जगावे. प्रसंगी ऋण काढून तूप घेतलेच, तर ते यज्ञात जाळण्याऐवजी किंवा श्राद्धात दुसऱ्याला प्यायला देण्याऐवजी स्वतः प्यावे', अशी भूमिका त्यांनी मांडली. 'माणसाने ते कर्म करावे की ज्यामुळे तो अखेरीस सुखी होईल' असा कर्मवाद व सुखी जीवनवाद त्यांनी सांगितला.

चार्वाकाचे स्त्री व कामजीवनविषयक विचारही प्रकृतीला सामोरे जाणारे, विवेकी व वास्तव आहेत. चार्वाकांनी पातिव्रत्याच्या संकल्पनेवर टीका केली. वैदिक अनुयायांनी पातिव्रत्याच्या संकल्पनेचा उपयोग पुरुषप्रधान संस्कृतीचे हितसंबंध जपण्यासाठी व स्त्रियांचा कोंडमारा करण्यासाठी एक हत्यार म्हणून केला होता. पातिव्रत्याचे स्तोम माजविणाऱ्या वैदिक अनुयायांनी पत्नीव्रताची मात्र कमालीची उपेक्षा केली. चार्वाकांनी पुरुषांच्या या पक्षपाती वृत्तीचा

तीव्र शब्दांत निषेध केला. ते म्हणतात, "मत्सराने स्त्रियांवर बंधने घालणाऱ्या लोकांचा धिक्कार असो. कारण ते आपल्या कुलस्थितीविषयी दांभिकता प्रकट करीत असतात. स्त्री आणि पुरुष यांच्यामध्ये असलेली कामांधता समान असताना ते स्त्रियांवर बंधने लादतात, परंतु पुरुषांवर मात्र तशाच प्रकारची बंधने लादत नाहीत. " या ठिकाणी चार्वाकांना स्त्रीपुरुषांच्या समान हक्कांची स्पष्ट जाणीव होती असे दिसते. स्त्रीसंदर्भात चार्वाकांनी वैदिक पुरुषांच्या ढोंगीपणाची लक्तरे वेशीवर टांगली आहेत. 'स्त्रियांकडून पातिव्रत्याची अपेक्षा करायची, परंतु इतरांच्या स्त्रियांना भ्रष्ट करायचे', अशा वर्तनाची उदाहरणे देऊन या दांभिकतेचा त्यांनी कठोर उपहास केला आहे. 'अशा प्रकारचा धर्म जेथे असतो, तेथे परमार्थ कोणत्या प्रकारचा असेल बरे?' असा प्रश्न बृहस्पतीने विचारला आहे.

स्त्रियांना समानतेची वागणूक न देता त्यांच्याबद्दल अपशब्द उच्चारणाऱ्यांचा चार्वाकांनी धिक्कार केला आहे. ते म्हणतात, "स्त्रियांना उद्देशून घृणास्पद वाक्ये उच्चारावयाचे सोडून दे. कारण, ती वाक्ये कस्पटासमान निरर्थक आहेत. तुझी स्वतःची स्थिती तशीच असताना तू किती काळ लोकांची फसवणूक करशील? " यातून चार्वाकांचा स्त्रीविषयक समान दृष्टिकोन स्पष्ट होतो.

कामभावना ही नैसर्गिक असल्याने चार्वाकाने 'कामा'ला पुरुषार्थामध्ये स्थान दिले आहे. चार्वाकांनी म्हटले आहे, "कामदेवाची जी आज्ञा ब्रह्मदेव वगैरेंनाही मोडता आली नाही, तिचे तुम्हीही पालन करा. तुम्ही कामरहित वैराग्याच्या मागे का धावत आहात? " कामभावनेचे नैसर्गिकपण व जीवनातील सुखमय स्थान यांचा निकोप मनाने विचार करून स्वीकार करावा, असे चार्वाकांचे आग्रही प्रतिपादन होते व ते शास्त्रीय आणि वास्तव होते व आहे.

चार्वाकांचे विचार क्रांतिकारी होते. त्यांनी भौतिक मानवी जीवनाला, मानवी सुखाला केंद्रस्थानी मानले. वास्तवता व अनुभवप्रामाण्य, तार्किक चिकित्सा या कसोट्यांवर तत्कालीन वैदिक धर्ममतांची परखड चिकित्सा केली. वैदिकांची दांभिकता, आर्थिक हितसंबंध, खोटेपणा उघडा पाडला. त्यामुळे वैदिक अनुयायांनी चार्वाकाचा कमालीचा तिरस्कार केला. चार्वाकांची बदनामी केली. 'चार्वाकांच्या भावी पिढ्या नष्ट होतील', असा शाप देण्यात आला. लोकांनी चार्वाकांच्या संपर्कात जाऊ नये म्हणून दंडक व दहशत निर्माण करण्यात आली. चार्वाकांनी उपहासापासून एकाकीपणापर्यंत आणि बहिष्कारापासून हत्येपर्यंतचा सर्व छळवाद सहन केला, परंतु त्यांना जी मूल्ये मानवी हिताची आहेत असे वाटत होते, त्यांच्याविषयी तडजोड केली नाही.

डॉ. आ. ह. साळुंखे चार्वाकदर्शनाचे मूल्य व महत्त्व अधोरेखित करताना म्हणतात, "चार्वाकदर्शन ही एक वास्तववादी जीवनदृष्टी आहे. जीवन सम्यक रीतीने जगण्याची एक विज्ञाननिष्ठ पद्धत आहे. या दर्शनानुसार जीवन ही एक वस्तुस्थिती आहे, जीवनाच्या विविध अंगांचा विचार करताना चार्वाकदर्शनाने खोटी प्रतिष्ठा, दुटप्पीपणा यांना थारा न देता प्रत्येक वेळी वास्तववादी, जीवनवादी भूमिका स्वीकारली. मानवी शरीर एकदा नष्ट झाले की, पुन्हा प्राप्त होत नसते. म्हणूनच प्राप्त झालेल्या शरीराचा शहाणपणाने जास्तीत जास्त उपयोग करून घेतला पाहिजे. आनंदाने जगणे हाच जीवनाचा उद्देश आहे. हा उद्देश सफल करण्यासाठी पारलौकिक वा कल्पित अशा अतिमानवी शक्तींचा आश्रय घेण्याची गरज नाही." डॉ. साळुंखे पुढे म्हणतात की, "चार्वाक दर्शन हे पारलौकिक व आध्यात्मिक अशा कल्पित आनंदाला बाजूला सारून ऐहिक, पार्थिव व

**(उर्वरीत मजकुर पृष्ठ क्र. १५)**

# तुकड्यादास म्हणे...



माधव जाधव
९४२३४ ३९९९१

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे आधुनिक काळातील प्रबोधनकार होते. अगदी सामान्य कुटुंबात जन्मलेल्या या संताने आपल्या वाणी आणि लेखणीतून समाज प्रबोधनाचा अविरत वसा घेतला. त्यासाठी व्याख्याता, लेखक, कवी, संगीतकार, प्रवचनकार, कीर्तनकार, संपादक, गायक आदी विविध भूमिका बजावल्या. सर्व सामर्थ्य एकवटून समाजजागृतीचे परोपरीने प्रयत्न केले. आपल्या देशातील झोपी गेलेली खेडी जागी व्हावीत, अज्ञान, लोकभ्रम आणि सामाजिक जडत्व यामुळे खेड्याला आलेली अवकळा नाहीशी व्हावी, म्हणून त्यांचे मन सदैव तळमळत असे. प्रारंभी अभंग व भजन यांच्या माध्यमातून त्यांनी समाजप्रबोधन केले. त्यानंतर काळाच्या ओघानुसार गद्यलेखन व भाषणाद्वारे समाजजागृतीस प्रारंभ केला. त्यांच्या प्रबोधनाचा केंद्रबिंदू सामान्य माणूस हाच होता. सामान्य जनता कर्मकांड, अंधश्रद्धा आणि अज्ञानात बुडत असल्याने त्यांनी या कामी सक्रीय सहभाग नोंदविला. खेडी सुधारण्यासाठी तेथील जनतेत असलेली व्यसने, गैरसमज, भोळ्याखुळ्या समजुती, अंधश्रद्धा, कर्मकांड आणि एकमेकातील वितुष्टे यांचा नायनाट करण्यासाठी ते वेगवेगळ्या माध्यमांचा उपयोग करीत. आपल्या खंजेरीतून जे बोल उमटवीत आणि आपल्या पहाडी आवाजातून त्याला गीताशी जोडत असत. त्यामुळे समोरचा लाखोचा समुदाय तल्लीन होऊन त्यांची गीतं ऐकत असे. त्यांच्या खंजेरीच्या आवाजाला मिळालेली त्यांच्या गीताची साथ जनसमूहात एक नवचैतन्य निर्माण करीत असे. केवळ चौथा वर्ग शिकलेल्या महाराजांचा मानसशास्त्राचा अभ्यास दांडगा होता. स्मरणशक्ती हा त्यांच्या चिंतनाचा आधार होता. तुकडोजी महाराज महिन्याला सुमारे तीन-साडेतीन हजार किमी प्रवास करीत. ह्या प्रवासापैकी नव्वद टक्के प्रवास हा ग्रामीण भागात व्हायचा. भटकंतीमध्ये महाराजांनी भारताला खूप काही दिलं. सकाळच्या रामधूनीपासून तर रात्रीच्या प्रार्थनेपर्यंत सर्व प्रसंगांसाठी त्यांनी गीतरचना केली. महाराजांचं समाजज्ञान विकसित झालं ते भटकंतीतूनच. त्यांनी आपल्या भजनातून भाषण प्रवचनातून व्यसनाधीन माणसाच्या उद्ध्वस्त संसाराची चित्रे रेखाटून हजारोंच्या संख्येसमोर व्यसनी माणसांला व्यसनमुक्तीची शपथ घ्यावयास लावून व्यसनमुक्त केले.

'माणूस द्या मज माणूस द्या' म्हणणाऱ्या महाराजांना विवेकी सद्विचारी माणूस हवा होता. अशा कमीतकमी माणसांची गावपातळीवर संघटना झाली तरी हे मोजकेच लोक, गावाला सर्वांगसंपन्न,अंधश्रद्धामुक्त करू शकतात यावर त्यांचा विश्वास होता. म्हणूनच ते 'ग्रामसुधारणेचा मूलमंत्र, सज्जनानी व्हावे एकत्र' असे म्हणतात. अंधश्रद्धा, कर्मकांडे, बुवाबाजी, बळीदान, व्यसनाधीनता, अनिष्ट रुढी-परंपरा यावर त्यांनी अहोरात्र प्रहार केला. या सर्व वाईट बाबींतून खेड्यातील भोळ्या भाबड्या माणसांची सुटका करण्यासाठीच त्यांनी आपले आयुष्य खर्ची घातले.

अज्ञानी जनांना लुबाडणाऱ्या बुवांपासून सुटका करण्यासाठी नवसाच्या अनिष्ट प्रथेवर महाराज सडकून टीका करतात. नवसातून पुत्रप्राप्ती होत नसते हे स्पष्ट करताना म्हणतात, 'मित्रहो पुत्र देणं, धन देणं हे साधुसंतांचं काम नव्हे. प्रारब्धावर अवलंबून राहू नका. यत्न तोच देव माना. रोग निवारण करणं हे डॉक्टरांचं काम आहे, संतांचं नव्हे' पुत्रप्राप्तीसाठी नवस करायला लावणाऱ्या बुवांचा ते सडकून समाचार घेतात -

"पुत्र द्यावयासी झुरतात गुरू।
जाणावे लुटारु कानकोंडे यांचे।।
बोले जरी पुत्र होय लोका।
कासायासी भिका मागती हे॥"

संतांनी मूल दिले असते, तर जगात कोणी वांझ राहिलेच नसते. धनद्रव्य दिले असते, तर भिकाऱ्यांची संख्या वाढलीच नसती. संतांजवळ आजार बरे करण्याची शक्ती असती तर, ते स्वतःच अमर नसते का झाले' असा त्यांचा सवाल आहे.

खेड्यातील अशिक्षित जनतेला धर्माच्या नावाखाली फसविणाऱ्या बुवाबाजीविरुद्ध आणि अंधश्रद्धेविरुद्ध भजन अभंग आणि ग्रामगीतेतील 'संत चमत्कार' ह्या अध्यायातूनही त्यांनी ताशेरे ओढले आहेत. संत म्हणजे जणू जादूगार. संत म्हणजे लोखंडाचे सोने करणारा, संत चोऱ्या लपवू शकतो. असाध्य रोग बरा करतो. वाझोंटीला मूल देतो अशा अनेक खुळ्या कल्पनांवर त्यांची लेखणी तळपत उठते.

संत बिमारी बसविती।
मग बुवाचेही का प्राण जाती।
जगी कोणीच ना मरती।
ऐसे का होऊ नये॥

खरं तर भोळ्याभाबड्या लोकांनी थोडा तरी विवेक वापरला पाहिजे. ते वापरत नसल्याने या पोटभरुंचा धंदा चालतो. बुवाबाजीला केवळ बुवाच कारणीभूत नसतात, तर स्वार्थी लोभी जनही कारणीभूत असतात. काही हौशी धनवान आपले काळे धंदे लपविण्यासाठी बुवांचा आधार घेतात. धनवानाच्या आश्रयाने 'अनुकरणाने गळा तुळशीची माळ। परी चालणे ओढाळ' अशा पोटभरु बुवांना महाराज चांगलेच फटकारतात. साधू कोण या संदर्भात ते म्हणतात, 'रंग फासून दीक्षा घ्यायची माझी इच्छा नाही. रंगाने साधू रंगावा ही कल्पनाच मला आवडत नाही. ज्याचे हृदय माणसाचे आहे, ज्याला माणुसकी जवळची वाटते, ज्याला माझ्या हिश्यापलीकडे मी अधिक घेणार नाही या कृतीने जीवन जगावेसे वाटते, त्यालाच मी साधू समजतो. भोळे अज्ञ जनही बुवांच्या नादी लागतात.'

देवाचं देवत्व हे दगडात नसून या सृष्टीतील प्रत्येक सजीवात देवाचा अंश आहे. ते म्हणतात 'जाणावे ग्राम हेचि मंदिर। ग्रामातील जण सर्वेश्वर॥' देवळात देव नसून समाजातील सज्जन माणसात आहे. रंजल्या गांजल्यात आहे.

दगडाच्या देवाला पुजणाऱ्या लोकांना, महाराज अज्ञानी समजतात-

'उगीच लावावा शेंदूर।
दोन चार धोंड्यावर।
तुकड्या म्हणे वा रे मंद।
ज्ञानाविन झाले धुंद॥'

ज्यांच्याकडे ज्ञान नाही, डोळसदृष्टी नाही, विवेक नाही तोच माणूस अशा कामी लागतो 'मी देव पाहण्यासाठी तीर्थास जात नसून माणसात तीर्थरुप बनविणारी माणूसकी वाढविण्यासाठी जात आहे. माझा विश्वास आहे की, देव पंढरपूर-हरिद्वारात नाही; तो आश्रम नि घराघरात आहे.' यात्रेच्या निमित्ताने तीर्थात जमलेल्या लोकांना देवाचे सत्यरुप पटवून देण्यासाठी तीर्थास जात असल्याचे महाराज सांगतात.

'आम्ही देव म्हणो तया।

ज्याची सत्ता त्रैलोकीया।
नव्हती आमचे देव धोंडे।
नका करु कानकोंडे॥'

ज्याची सत्ता त्रैलोकी आहे अशा देवाची प्राप्ती करून घ्यायची तर मूर्तिपूजा हा त्याचा मार्ग नाही, हे पटवून देताना महाराज म्हणतात 'देवाची प्राप्ती गंध लावून, मूर्तीपुढे घंटा वाजवून होते अशी कोणाची समजूत असेल तर ती चुकीची आहे. कर्मकांडाने कोणालाही देव प्रसन्न झाला नाही. उलट सावतामाळ्याला देव प्रसन्न झाला तो त्याला शेतात भाजी पिकविताना पाहून, गोरा कुंभाराला देव प्रसन्न झाला तो मडकी घडविताना पाहून. रोहिदासाने देवाची पूजा जोडे शिवून केली. देवाच्या प्राप्तीसाठी भजनपूजन करण्याची आवश्यकता नाही. प्रामाणिक माणसाला आपले काम करीत असतानाच देवाचे दर्शन घडते. उलट बेईमान माणसाने कितीही टाळ कुटले आणि देवापुढे नाक घासले तरी त्याला देव दिसू शकत नाही.'

दगडाच्या मूर्तीरुपी देवाला बळीदान देणाऱ्याचाही महाराज खरपूस समाचार घेतात.

याद ठेवा, 'कधी बळी द्याल जीवा।
कुळामध्ये दिवा न राहिल॥
जैसा त्या वधसी तैसी होय गती।
काळाघरी जाती कापणारे॥'

अरे स्वार्थी लोकांनो! एका जीवाचा बळी दिल्याने दुसरा जीव कसा सुखी होईल. कोंबडे-बकरे हे कोणतीही देवीदेवता मागत नसून बुवा भोंदूच्या कल्पनेचा आणि स्वार्थाचा हा खेळ आहे. 'माझा असा दृढविश्वास आहे की, देवीदेवता मुळीच बळी मागत नाहीत केवळ आंधळेपणाने व कावर्या वृत्तीने आपणच हे पापकर्म करतो आणि त्याचे प्रायश्चित बळी देणार्याला भोगावे लागते. म्हणून देवीदेवतांची पूजा करायचीच तर ती सत्यसंकल्पनेने मानसिक भावनेने व सात्त्विक सामग्रीने करा' असे महाराज म्हणतात. करणी, कौटाळ, भूतबाधा आदी बाबीचाही महाराजांनी निषेध केला.

'कोणी करणी कौटाळ म्हणती।
कोणी पिशाच्यास मारती।
औषधेही न देता रोगी मारती। मूर्खपणे॥
भगत, मांत्रिक, अरबाडी जाणते।
धुमारे बघती भाविक कोणते।
पोटासाठी नाना मते फैलविती। लोकामाजी॥'

भूतबाधा घालविण्याच्या नावाखाली माणसाला बांधून ठेवणे, देवदेवता किंवा श्रद्धेच्या आवरणाखाली बुवाबाजी करून लोकांना लुबाडणे, नवस फेडण्याच्या नावाखाली लोकांची आर्थिक लुबाडणूक करणे, देवदेवतासमोर सजीव प्राण्यांची हत्या करणे. आजारी माणसास गंडेदोरे घालणे, मंत्र उच्चारणे आदी अंधश्रद्धांचा त्यांनी तीव्र शब्दात निषेध केला. उसेगावच्या हनुमानाच्या मंदिरासमोर असणारी देवी ही बकऱ्याच्या मांसाच्या नैवेद्याने प्रसन्न होते. नैवद्य नाही दिला, तर खळबळते अशी लोकांची भावना होती. त्या देवीची मूर्ती खोदून ती देवळासमोर बसवून महाराजांनी ही बळीदानाची प्रथा बंद केली. 'तुकड्यादास म्हणे बकरे बंद केले। दही बोणे दिले देवी लागी' १९४५ साली महाराजांनी बळीदान बंदीची चळवळ मोठ्या प्रमाणात चालविली शेकडो गावी रेडा बळीदान बंदी केली. बकरे-कोंबडे देवीपुढे बळी देणे थांबविले. महाराज ग्रामगीतेत म्हणतात 'देवानेची केले जीव। तयास कैची मारण्याची हाव॥' महाराजांनी अनेक गावातील अनिष्ट रुढी प्रथा बंद केल्या.

राष्ट्रसंतांनी जे सांगितले ते प्रथम अनुभवले होते. एकदा ते एका गावात गेले. त्या गावचे लोक त्यांना देवळात भजन करू देईनात. या देवळात भजन केलं तर माणूस सकाळी मेलेलाच सापडतो

असे लोकांचे म्हणणे आले. महाराजांनी त्यांचे हे आव्हान स्वीकारुन रात्रभर भजन केले. लोक सकाळी येऊन पाहतात तर महाराज तल्लीन होऊन भजन करत होते. ते म्हणाले 'अहो अंधश्रद्धा मनातून काढून टाका' भूतपिशाच्च या कल्पना कशा खोट्या आहेत. हे महाराजांनी छोट्या-छोट्या घटना प्रसंगातून दाखवून दिले. यातून त्यांच्या बोलण्यावर लोकांच्या निष्ठा वाढत गेल्या. महाराजांना चमत्कार ही गोष्टच मान्य नव्हती. 'माणूस माणसाला बरोबरीच्या नात्याने वागवील, नेता,पुढारी, साधुसंत साधारण समाजाला आपले कुटुंब समजण्याइतके समंजस होतील एवढा चमत्कार जरी या देशात प्रामुख्याने घडून आला तरी माझा देश धन्य झाला असे मी समजेन' असे ते म्हणत.

धर्माच्या बाबतीतले त्यांचे चिंतन मार्गदर्शक असेच होते. 'धर्म म्हणजे टिळे, माळा, पूजाअर्चा, तीर्थयात्रा, व्रत-वैकल्ये, दानपान असाच संकुचित अर्थ आज लोक धरून बसले आहेत आणि त्यापुढे आपले स्वाभाविक मानवी कर्तव्ये विसरुन गेले आहेत. माणसाने एकमेकांशी माणसाप्रमाणे वागावे. आपल्यावरुन दुसऱ्याचे सुख-दुःख लक्षात घेऊन त्याच्याशी वर्तन करावे, सत्यासाठी निर्भयाने पुढे यावे हे धर्मनियम आहेत. खरे तर जिवंतपणीच संसार स्वर्गतुल्य बनविणारा धर्म मला तरी मान्य आहे. जिवंतपणी मुर्दाड बनविणारा आणि मेल्यानंतर मोक्ष देणारा तथाकथित धर्म मला नको आहे.' हे त्यांचे धर्मचिंतन होते. तीर्थात अवडंबर नको, पिंडदानाची गरज नाही, माणसाच्या मृत्यूचे आत्यंतिक अवडंबर नको. असे त्यांचे मत आहे. आपल्या देशात होणारे सर्व सणउत्सव हे ते ज्या उद्देशाने सुरु करण्यात आले त्या मूळ उद्देशानेच व्हावेत, यासाठी महाराजांनी सण-उत्सवाचे मूळ स्वरुप विस्ताराने स्पष्ट केले. यात्रा उत्सव सण वार, सेवक, संत, साधू देव धर्म विचार या संकल्पना डोळस दृष्टीने उलगडण्याचा प्रयत्न केला.

महाराजांनी अंधश्रद्धा, कर्मकांडे, अनिष्ट प्रथा, रुढी यांचा नायनाट करण्यासाठी अहोरात्र प्रयत्न केले. त्यासाठी शेकडो भजनं लिहिली, गायली अभंग गाथेतील अनेक अभंगातून आणि ग्रामगीतेतील बऱ्याच अध्यायातून अंधश्रद्धेला मूठमाती देणारा विचार मांडला. त्यांचा हा विचार समकालीन समाजाच्या उत्थानासाठी महत्त्वाचा असाच आहे.

---

**पृष्ठ क्र. ११ या लेखाचा उर्वरीत भाग....**
**(चार्वाक दर्शन : भौतिकवादी विज्ञाननिष्ठ जीवनदृष्टी)**

स्वकष्टार्जित अशा वास्तव आनंदाचा पुरस्कार करणारे दर्शन आहे. त्याने अज्ञानाच्या व शोषणाच्या व्यवस्थेला नकार जरूर दिला आहे, पण या नकारापेक्षा त्याची रचनात्मक विधायक बाजू अधिक प्रबळ आहे... त्याला एक नवा समाज निर्माण करायचा आहे”.

(क्र मशः)

# मी लेकुरवाळी...



सुषमा बसवंत
९८९२३ ८०४७३

गरोदरपणात आणि प्रसूतीनंतरच्या विविध अंधश्रद्धा आणि गैरसमज प्रचलित आहेत. त्यातील अनेक अंधश्रद्धा या बाळ आणि बाळंतीण यांच्या आरोग्यासाठी घातक ठरू शकतात. यावर प्रकाशझोत टाकून, या अंधश्रद्धांपासून दूर कसे रहावे या बाबतीत मार्गदर्शन केले आहे, डॉ. सुषमा बसवंत यांनी.

आपण बाईच्या गरोदरपणातील आणि प्रसुतीनंतरच्या काळातील अंधश्रध्दा याबाबत काही माहिती घेऊया. गरोदरपणामध्ये एखाद्या बाईचे पोट मोठे दिसते, म्हणजे मुलगा होईल किंवा पार्श्वभाग मोठा दिसतो, म्हणजे मुलगी होईल, असा एक गैरसमज आहे.

गरोदरपणात इंजेक्शन (धनुर्वाताचे) आणि गोळ्या (लोह व कॅल्शियमच्या) घेऊ नयेत. त्यामुळे बाळ पोसते आणि मग बाळंतपण अवघड जाते, प्रसूती नैसर्गिक होत नाही. सिझेरियन करावे लागते असे गैरसमज आहेत. खरे तर असे काहीही नसते. बाळाचे योग्य पोषण होण्यासाठी व धनुर्वातापासून बाळ बाळंतिणीच्या संरक्षणासाठी वरील उपचार आवश्यक असतात. सिझेरियन करण्यासाठी प्रसुतीमधील गुंतागुंत आणि इतरही अनेक कारणे आहेत.

गरोदरपणामध्ये अंडी, आंबे खाऊ नयेत कारण त्यामुळे गरम पडून गर्भपात होऊ शकतो, असा गैरसमज आहे. खरे तर गरम थंड असे काही नसते. रोजच्या आहारात प्रथिनांची गरज असते. त्यामुळे रोज एक अंडे जरूर खावे. आंब्याच्या सिझनमध्ये रोज एक आंबा खायला काहीही हरकत नाही. त्यातून आई व बाळासाठी जीवनसत्वे मिळतात. खरे तर गरोदरपणात आईवर बाळाचे पोषण अवलंबून असते त्यामुळे जादा प्रथिनांची व जीवनसत्वांची गरज असते.

गरोदरपणामध्ये सहाव्या किंवा आठव्या महिन्यात माहेरी गेले पाहिजे असे म्हणतात. परंतु हे पूर्णतः अवैज्ञानिक आहे. ग्रहण अजिबात पाहू नये आणि ग्रहणात अनेक नियम पाळावेत अशी अंधश्रद्धा आहे. आता हे नियम पाळणे म्हणजे ग्रहणकाळात झोपायचे नाही, जेवायचे नाही, पायाची तिढी घालायची नाही, (म्हणजे एकावर एक पाय टाकून बसणे) काही शिवायचे नाही, कापायचे नाही, ग्रहण बघायचे नाही वगैरे. ही लिस्ट बरीच मोठी आहे. हे नियम का पाळावेत याचे कारण म्हणजे, गरोदर स्त्रीने असे काही केले, तर मुलांमध्ये व्यंग निर्माण होऊ शकते अशा अंधश्रद्धा आहेत. खरे तर या दोन्हीचा (ग्रहण पाळणे व माहेरी जाणे) विज्ञानाच्या दृष्टीने बाळाच्या वाढीशी काहीही संबंध नाही.

मुलगाच व्हायला हवा म्हणून बुवा, बापू, गुरू, अम्मा, देव, देवऋषी यांच्याकडे जाणे आणि अंगारा लावणे, गंडेदोरे बांधणे, मंतरलेले फळ खाणे हे पूर्णपणे चुकीचे आहे. पण, ग्रामीण आणि शहरी भागात सुध्दा ही अंधश्रध्दा कधी चोरून तर कधी उघडपणे जोपासली जाते. होणारे बाळ मुलगा किंवा मुलगी होणे हे गुणसूत्रांवर अवलंबून असते, हे विज्ञानाने सिद्ध केले आहे.

बाळाच्या जन्मानंतर बाळाला दृष्ट लागू नये म्हणून काळा दोरा बांधणे, काळी तीट लावणे हे प्रकार केले जातात. बाळाच्या कान, नाक, बेंबीमध्ये तेलाचे थेंब टाकले जातात. खरे तर तिथे नैसर्गिक

ओलसरपणा असतो. बाळ म्हणजे मशीन नव्हे की, त्यात वंगण वगैरे घालायला लागावे. तसेच बाळाची टाळू भरणे हा एक प्रकार असतो. बाळाची कवटीची हाडे लवचिक असतात. त्यात माथ्यावर मध्ये दोन ठिकाणी फट असते. खरे तर बाळाचा जन्म सुलभ व्हावा, म्हणून ही हाडांची लवचिकता असते. शिवाय बाळाचा मेंदू जसा वाढत जाईल, तशी त्याला पुरेशी जागा उपलब्ध व्हावी, म्हणून निसर्गाचीच तशी रचना असते. परंतु तिथे तेल, लोणी, साय असे काय काय मुरवले जाते. त्यातून बाळाला मुंग्या लागणे, डोळ्यात तेल जाणे, बाळाला रडवणे, असे अनेक प्रकार घडतात. बाळाच्या डोळ्यात काजळ घालणे, हा पण असाच एक अवैज्ञानिक प्रकार आहे. ज्यामुळे डोळ्यातून पाणी वाहणे, डोळ्यात इन्फेक्शन होणे, त्वचेला ॲलर्जी होणे असे प्रकार घडू शकतात. अगदी सुशिक्षीत स्त्रियांचेसुद्धा वयोवृद्ध स्त्रियांच्यापुढे कधी कधी काहीही चालत नाही, कारण वर्षानुवर्षे जनमानसात रूजलेल्या या अनिष्ट रूढी आहेत.

बाळ-बाळंतिणीवरून भाकरी तुकडा ओवाळून टाकणे, बाहेरून आल्यावर लिंबू उतरून तिठ्यावर टाकावे अशा पण अंधश्रध्दा आहेत. या पूर्णतः अवैज्ञानिक आहेत. बाळाला आपल्याकडे लवकर घराच्या बाहेर आणले जात नाही, कारण विटाळाचा (म्हणजे अशुध्दीचा) काळ सव्वा महिना मानला जातो. त्यानंतर आई व बाळाला कुलदैवताला दर्शनाला नेले जाते. त्यासाठी बाळाचे लसीकरण सुध्दा उशीरा केले जाते. आईला फॉलोअप न झाल्याने उपचार मिळत नाहीत. परदेशात तसे काही नसते. तिकडे बाळाला लवकर बाहेर काढतात. आणि मोकळ्या हवेत, सूर्यप्रकाशात आणतात, जे त्याच्या आरोग्यासाठी अतिशय जरूरीचे असते.

खेड्यात आणखी एक वारंवार दिसणारी अंधश्रध्दा म्हणजे संध्याकाळच्या वेळी बाळ-बाळंतिणीने चिंचेखालून किंवा पिंपळाखालून जाऊ नये किंवा स्मशानाच्या रस्त्यावरून जाऊ नये. कारण चिंचेवर हडळ असते, पिंपळावर मुंजा असतो, स्मशानात मृतात्मा असतो अशा अंधश्रद्धा आहेत. मग लागीर होते, म्हणजेच त्या स्त्रीला किंवा बाळाला बाहेरची बाधा होते असे म्हणतात. खरे तर मुळातच स्त्रीची या काळात तब्येत नाजूक असते. तिची प्रतिकारशक्ती कमी झालेली असते. त्यामुळे तिला कोणतेही इन्फेक्शन पटकन होऊ शकते. मग ताप येणे, थंडी भरणे अशा योगायोगाने त्याच वेळी झालेल्या गोष्टीला बाहेरची बाधा झाली असे समजले जाते. आणि मग डॉक्टरकडे जाण्याऐवजी मांत्रिकाकडे घेऊन जाणे, अंगारा, धुपारा, गंडेदोरे वगैरे उपाय केले जातात. भूतप्रेत उतरवण्याचे अघोरी प्रकार केले जातात, ज्यामुळे तिच्या आरोग्याचे उलट नुकसानच होते. विज्ञानाने तर सिध्द केले आहे की भूत वगैरे काहीही नसते, ते अस्तित्वातच नसते.

का वागतात स्त्रिया अशा? ग्रामीण भागात स्त्रिया अशिक्षित वगैरे असतात इथपर्यंत एक वेळ ठीक आहे. पण शहरातील शहाण्यासुरत्या शिक्षीत स्त्रियासुद्धा अशा अंधश्रध्दांच्या आहारी का जातात? कारण त्या आपल्या कुटुंबावर, आपल्या लेकरांवर अतिशय प्रेम करतात. मनात कुठेतरी अदृष्टाची भीती असते. काळजी असते. आपण नाही केलं असं, तर आपल्या मुलाला काहीतरी जीवघेणा आजार होईल, कुटुंबियांचे नुकसान होईल, आर्थिक नुकसान होईल, नोकरी जाईल वगैरे समाजमनावर वर्षानुवर्षे बिंबलेले संस्कार असतात. इतके की, स्वतःवर वेळ आली की त्या खऱ्याच वाटायला लागतात. कधी कधी पहिलटकरणीला या सर्वांचे अप्रूप वाटत राहते. आपल्याला घरात कुणीतरी विशेष मानले जात आहे, याचा आनंद होतो. आपली व बाळाची दृष्ट काढणे, नवस करणे वगैरे गोष्टींचे सर्व कौतुकसोहळे ती पुरवून घेते. कधी

**(उर्वरीत मजकुर पृष्ठ क्र. २०)**

# असमानतेतही मानसिक आरोग्य



प्रदीप जोशी
९४२२६ ०३३९०

'वर्ल्ड फेडरेशन फॉर मेंटल हेल्थ' (WFMH) ही मानसिक आरोग्याविषयी जगभर काम करणारी एक संघटना आहे. या संघटनेने १९९२ पासून 'जागतिक मानसिक आरोग्य दिन' हा १० ऑक्टोबर रोजी पाळण्यास सुरवात केली. पुढे 'जागतिक आरोग्य संघटना' म्हणजे WHO ने सुध्दा हा दिवस पाळण्यास मान्यता दिली व सक्रीयपणे त्यात भाग घेण्यास सुरवात केली. हा दिवस संपूर्ण जगभर पाळला जातो. इतकेच नव्हे, तर ऑस्ट्रेलियासारख्या देशात तर १० ऑक्टोबर ज्या आठवड्यात येतो, तो आठवडाच 'मानसिक आरोग्य आठवडा' म्हणून पाळला जातो.

असा दिवस पाळला जाण्याचे कारण काय? मानसिक आरोग्याविषयी जगभर खूप अनास्था आणि अज्ञान आहे. किंबहुना मानसिक आरोग्य हा आपल्या प्रकृतीचा, आरोग्याचा एक महत्त्वपूर्ण भाग आहे, ही कल्पना अजूनही लोकांच्या मनात म्हणावी तशी रुळलेली नाही. सर्वसामान्यांच्या बाबतीत जी गोष्ट आहे, तीच सरकारी पातळयांवरही आहे. एकूण आरोग्य सेवांवरील खर्चापैकी फार थोडा खर्च मानसिक आरोग्य सेवांवर होत असतो. साहजिकच मानसिक रुग्णांसाठी मदत अगदी तटपुंजी आहे. मनोरुग्णांसाठी मदत करणाऱ्या आरोग्यसेवाही खूप अपुऱ्या आहेत. यात आणखी महत्त्वाची भर पडते आहे ती मनोविकारांविषयी समाजात असलेल्या कलंकामुळे. म्हणजे Stigma मुळे मनोविकारांकडे आणि मानसिक आजारी व्यक्तीकडे समाज निरोगी भावनेने बघत नाही. त्यामुळे अशी मदत घेण्यातही हेडसांड केली जाते. म्हणूनच एकूण मानसिक आजारी व्यक्तिपैकी फार थोडे लोक वैद्यकीय मदत घेण्यास धजावतात. साहजिकच ते योग्यवेळी, योग्य उपचारांपासून वंचित राहतात. ही अवस्था सर्व जगभर आहे. भारतातील ही अवस्था तर अधिकच गंभीर आहे. मुळात आपल्या देशातील आरोग्यसेवांवरचा खर्चच अगदी तुटपुंजा आहे आणि त्यातही मानसिक स्वास्थ्यावरचा तर नगण्य आहे. सर्वच पातळ्यांवर मानसिक स्वास्थ्याला दुय्यम स्थान दिले गेलेले आहे. शिवाय अशिक्षित लोक, अंधश्रध्दांचे प्रचंड प्रमाण, मानसिक आरोग्य सेवांचा फार मोठा तुटवडा, या सर्व कारणांमुळे भारतातील मानसिक रुग्ण अशा सुविधांपर्यंत पोहोचण्याचे प्रमाण अत्यल्प आहे.

भारतातील परिस्थिती किती गंभीर आहे, याची आपल्याला आकडेवारीवरून कल्पना येते. भारतात ५.६ कोटी लोकांना नैराश्याचा (Oppression) आजार आहे, तर सुमारे ३.८ कोटी लोकांना अराजनी चिंता (Anxiety Neurosis) चा आजारा आहे. याशिवाय सायकोसिस हिस्टेरीया व्यसनाधीनता, या सारख्या अनेक आजारांनी कित्येक लोक त्रस्त आहेत. अंदाज असा आहे की, दर दहा भारतीयांमध्ये एका व्यक्तीस कोणत्या ना कोणत्या प्रकारचा मानसिक त्रास आहेच. याचा अर्थ असा की भारतात सुमारे १२ ते १५ कोटी लोक मानसिक विकारग्रस्त आहेत. आत्महत्यांचे प्रमाण जरी पाहीले, तर ती आकडेवारीही मन विषण्ण करते. भारतातील आत्महत्यांचे प्रमाण १९९० नंतर २०१० पर्यंत स्त्रियात सुमारे ३६ टक्यांनी तर २५ टक्यांनी

पुरुषात वाढले आहे. या सर्व अडचणींना तोंड देण्यासाठी आपली यंत्रणा सक्षम आहे का ?

या सर्व मानसिक आजार असलेल्या लोकांपैकी केवळ २० टक्यांच्या आसपास लोकांना काही प्रमाणात मदत आपण देऊ शकतो आहोत, ही अनास्थाच भयंकर आहे. आजच्या घडीला दर लाख लोकसंख्येमागे ०.३ सायकियाट्रिक, ०.१ सायकियाट्रिक नर्सेस, ०.०७ सायकॉलॉजिस्ट व ०.०७ सायकियाट्रिक सोशल वर्कर आहेत. केवळ सायकियाट्रीस्टचा विचार केला तर, दर एक लाख लोकसंख्येमागे निदान ३ सायकियाट्रीस्ट असणे आवश्यक आहे. अशा कारणांमुळेच मानसिक आरोग्य दिन साजरा करण्याची गरज निर्माण झाली आहे.

हा दिवस साजरा करण्याने काय साध्य होणार?

- अशा मानसिक स्वास्थ्याविषयीच्या उपेक्षित वातावरणामुळे समाजात जागृती उत्पन्न करण्याची गरज आहे.
- या दिवशी जगभर विविध उपक्रमांच्या आधारे योग्य मानसिक आरोग्याच्या गरजेकडे लक्ष वेधणे हा उद्देश सफल करण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन होते.
- सरकार, त्यांचे आरोग्य विभाग, सेवा पुरवणाऱ्या यंत्रणा, एनजीओ, मनोविकार तज्ञांच्या संघटना यांनाही आपल्या कार्यातील गुण व उणीवांवर चर्चा करता येते व त्यात सुधारणा करणे शक्य होते. या सर्व यंत्रणांनी एकमेकांशी सहकार्याने काम करणे गरजेचे असते.
- शिवाय अनेक यंत्रणा विशेषत: सरकारदप्तरी असलेल्या सुविधांविषयी सर्वसामान्यांना पूर्ण कल्पना नसते. त्यामुळे त्या योजनांचा लाभ पूर्ण क्षमतेने घेतला जात नाही. आपल्या सरकारच्या 'नॅशनल मेंटल हेल्थ प्रोजेक्ट' अंतर्गत 'डिस्ट्रीक्ट मेंटल हेल्थ प्रोग्रॅम' हा जिल्हास्तरावरील कार्यक्रम राबवला जातो खरा, त्यातून जिल्हा व तालुका स्तरावर ही सेवा उपलब्ध करून देण्यात येत असते, पण त्याची माहिति किती जणांना असते. त्यातही दुर्दैवाने म्हणावे तशी कार्यक्षमता या कार्यक्रमात नसते. सरकारी कारभाराचा हा परिणाम असण्याची शक्यता आहे. परंतु त्यामुळे लोक या सेवांकडे वळत नाहीत. लोक वळत नाहीत म्हणून यात अधिकच ढिसाळपणा येतो, अशा दुष्टचक्रात या योजना सापडतात. मानसिक आरोग्य दिनाच्या निमित्ताने अशा योजनांची माहिति लोकांपर्यंत पोहोचणे आवश्यक होते.
- याच बरोबर मानसिक विकारासाठी नव्हे, तर त्यांच्या प्रतिबंधासाठी सुध्दा जे वेगवेगळे उपाय योजता येतात, त्यांचीही माहिति लोकांपर्यंत पोहोचवता आली पाहिजे. व्यायाम, रीलॅक्सेशन, योग्य आहार, व्यसनापासून दूर राहण्याचे महत्व या निमित्ताने पोहोचवता आले पाहीजे.
- या दिवसाच्या आयोजनात मनोविकारांविषयी असलेला कलंक दूर करणे या साठीही कार्यक्रम आयोजित करता येतात. मनोविकारच नव्हे, तर मनोविकार तज्ज्ञांकडे सुध्दा बघण्याचा दृष्टिकोन विशुध्द नाही, हे आपल्याला जाणवते. त्यामुळे मानसिक आजारासाठी मदत घेण्यात टाळाटाळ होत असते. या दिनाच्या निमित्ताने विविध प्रसिध्द व्यक्ती जर पुढे आल्या, ज्यांना मानसिक आजार होऊन गेले आहेत अशा, तर हा सिग्मा कमी व्हायला मदत होईल. या बाबतीत सुप्रसिध्द अभिनेत्री दिपिका पादुकोन हीचे उदाहरण आपल्याला देता येईल. ती इंडीयन सायकियाट्रीक ब्रॅंड ॲम्बॅसॅडर आहे. तिला डिप्रेशनचा आजार होता व योग्य उपचारांच्या मदतीने ती यातून बाहेर पडली आहे, हे ती आवर्जून सार्वजनिकरीत्या सांगत असते.

यामुळे तिच्या करिअरवर काहीही परिणाम झाला नाही. तिच्या चाहत्यांच्या मनातील तिच्या प्रतिमेला तडा गेला नाही. अशी उदाहरणे जर आपल्याला या दिवशी लोकांसमोर आणता आली, तर हा सिग्मा लवकर जाईल.

- या दिवशी प्रदर्शनांचे, रॅलीजचे आयोजन करता येऊ शकते, विविध व्याख्याने, चर्चासत्रे यांच्या आयोजनातून जागृती करता येते. या दिवसानिमित्त दरवर्षी एक घोषवाक्य देण्यात येते. हा दिवस जरी १९९२ पासून पाठण्यात येत असला, तरी घोषवाक्य १९९५ पासून देण्यात येऊ लागले. यंदाचे घोषवाक्य आहे, 'Mental Health in an Unequal World', म्हणजेच 'असमानतेने भरलेल्या जगातील मानसिक स्वास्थ्य.'

सध्या आपला समाज असमानतेने ग्रासला आहे. किंबहुना अशी असमानता हजारो वर्षांपासून असली, तरी तिची तीव्रता आजच्या जगात वाढली आहे. सर्वच समाजात विविध कारणांनी असमानता दिसून येते. रंग, धर्म, जात, स्त्री-पुरुष भेद, लैंगिक निवडीतील भिन्नता या सर्वच गोष्टी मानसिकतेवर आघात करीत असतात.

समाजात वावरतांना तुम्हाला अशा भेदांमुळे जर समान संधी उपलब्ध नसतील, तुम्हाला तुमच्या धर्मामुळे, जातीमुळे, लिंगामुळे, कमी-जास्त प्रमाणात पुढे जाता येत नसेल, किंवा तुम्हाला समानतेने वागवण्यात येत नसेल, तर तुम्हाला चिंता, नैराश्य, ताण जाणवत राहणार आहे. शिवाय या कोरोनाच्या काळात लॉकडाऊन आजारपण यामुळे अनेक जणांच्या नोकरी, धंद्यांवर परिणाम झाला आहे. याची विशेष झळ मध्यमवर्गीय आणि श्रमिक वर्गाला पोहोचली आहे. त्यामुळे आर्थिक विषमताही संपूर्ण जगभर मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. बऱ्याच कुटुंबांचा जगण्याचा संघर्ष मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. त्यांच्या घरात अन्न, शिक्षण अशा मुलभूत गोष्टीचीही उपलब्धता प्रभावित झाली आहे. आरोग्यसेवा मिळणे सुध्दा अवघड झाले आहे. त्यामुळे मानसिक अस्वास्थ्याचे प्रमाण तर वाढले आहेच, परंतु त्यासाठी योग्य उपचार मिळण्याची संधीही या लोकांसाठी अवघड झाली आहे. या असमानतेतही मानसिक स्वास्थ्यासाठी सर्वांना मदत होईल, यासाठी जगभरातील सर्व सरकारांनी, वेगवेगळ्या संघटनांनी एकत्रित येऊन प्रयत्न करण्याची गरज निर्माण झाली आहे. यंदा हे घोषवाक्य देण्याचे कारणच मुळी कोरोनामुळे सर्व जगावर झालेला परीणाम हेच आहे. केवळ आर्थिक नव्हे, तर सामाजिक विषमताही या काळात मोठ्या प्रमाणात वाढली आहे.

कोरोना रुग्णांकडे बघण्याचा दूषित दृष्टिकोन आणि मानसिक रुग्णांकडे बघण्याचा चुकीचा दृष्टिकोन यामुळे 'आहे-रे' आणि 'नाही-रे' गटातील दरी वाढली आहे. कोरोना हे जागतिक संकट आहे. दुसऱ्या महायुध्दानंतर प्रथमच आपण एखाद्या जागतिक संकटाचा सामना करीत आहोत. तेव्हा अशा आव्हानात्मक परिस्थितीत केवळ देशातीलच नव्हे, तर सर्व जगातील सरकारी-गैर सरकारी शक्तींनी एकत्र येऊन ही विषमता दूर करण्याचा प्रयत्न केला पाहीजे.

■ ■ ■

**पृष्ठ क्र. १७ या लेखाचा उर्वरीत भाग....**
**(मी लेकुरवाळी... )**

असुरक्षितता वाटते, वडीलधाऱ्यांचे नाही ऐकले, तर एकटे पडू, काहीतरी वाईट होईल वगैरे वाटते.

या सर्वातून स्त्रियांना बाहेर काढण्यासाठी प्रबोधनाची गरज आहे. लहानपणापासूनच यातला फोलपणा समजावण्याची गरज आहे. फक्त शिक्षणाने क्रांती होत नाही. समोर योग्य उदाहरणे ठेवणे गरजेचे आहे. तरच समाज हळूहळू बदलेल. निरोगी, निकोप मानसिकतेची मुले घडवण्यासाठी आपल्याला आधी मातांना विज्ञानवादी मानसिकतेने जगावयास शिकवले पाहिजे. ■ ■ ■

# आत्महत्या हा पर्याय नाही



सुरेश थोरात
९९६०८ ६०७५९

**आत्महत्या केल्यामुळे होणारे कौटुंबिक नुकसान-** आत्महत्या करणारी व्यक्ती अकल्पितपणे या जगातून अचानकपणे निघून जाते, परंतु तिच्या कुटुंबियांची अपरिमित हानी होते. जर स्त्रीने आत्महत्या केली असेल, तर लहान मुले आईच्या प्रेमाला मुकतात आणि वडिलांनी आत्महत्या केली असेल तर मुले पितृप्रेमाला पारखे होतात. दोघांनी आत्महत्या केली तर मुले उघड्यावर येतात, पोरकी होतात, घरातील प्रमुख व्यक्तीने आत्महत्या केल्याने अर्थाजन बंद होऊन कुटुंब देशोधडीला लागते. विधवा स्त्रीकडे समाजातील काही वाईट प्रवृतीचे लोक वाकड्या नजरेने पाहतात. आत्महत्या या प्रकाराचे सखोल विश्लेषण सुरेश थोरात यांनी केले आहे.

सध्या कोविड-१९ या कोरोना विषाणूचा जागतिक स्तरावर फैलाव होत असून, जगात कोविड -१९ रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे दवाखाने कमी पडत आहेत. जगात २१३ पेक्षा अधिक देशात रोगाचा प्रादुर्भाव वाढला असून आजपर्यंत जवळपास चार लाखापेक्षा अधिक लोकांचा मृत्यू झालेला आहे. भारतात २५ मार्च २०२० पासून (आवश्यक सेवा वगळून) लॉकडाऊनची घोषणा झाल्यापासून टप्प्याटप्प्याने त्याची मुदत वाढविण्यात येत आहे. या लॉकडाऊनच्या कालावधीत सगळीकडे आर्थिक मंदी, त्यामुळे सर्व व्यवहार ठप्प, अशा काही कारणास्तव लोकांमध्ये नैराश्य, ताणतणाव, उदासिनता इ.च्या प्रमाणात वाढ झालेली दिसते.

सध्या आत्महत्या करण्याचे प्रमाण वाढलेले दिसत आहे. कालपरवा दोंडाईचा येथील दहा वर्षाच्या मुलाने तर, अमळनेर तालुक्यातील १४-१५ वर्षांच्या विद्यार्थ्याने गळफास लावून आत्महत्या केली. आत्महत्या म्हणजे काय? त्याची कारणे, लक्षणे, उपाय आणि घ्यावयाची काळजी याबाबत बघूया.

आत्महत्या म्हणजे सहेतुक स्वतःच स्वतःचे जीवन संपविण्याचे कृत्य होय. अर्थात त्याची कारणे वेगवेगळी असू शकतात. आत्महत्या करणे ही बाब आता तशी नवीन राहिलेली नाही. पुष्कळदा नैराश्यामुळे किंवा मनात उद्भवलेल्या मानसिक विकारामुळे व्यक्ती आत्महत्येस प्रवृत्त होतात. दुर्दैवाने वाट्यास आलेली आर्थिक संकटे, वैयक्तिक नातेसंबंधातील गुंते यांचाही त्यात वाटा असू शकतो.

आपण जर सकाळी वृत्तपत्र उघडलं तर त्यात दररोज ४-५ तरी व्यक्तींनी आत्महत्या केल्याच्या बातम्या असतात. त्याची कारणे व्यक्तिपरत्वे वेगवेगळी असू शकतात उदा.(१) बहुतांश शेतकरी बंधू कर्जबाजारी असतात किंवा दुष्काळामुळे शेतात काहीही पीक हातात येत नाही, त्या नैराश्यामुळे (२) विद्यार्थी-विद्यार्थीनींस आत्महत्या करण्यासाठी अनेक कारणे असू शकतात. विशेषतः दहावी किंवा बारावीच्या परीक्षेत अनुत्तीर्ण झाल्यास किंवा परीक्षेत कमी गुण मिळाले म्हणून, पालकांनी मोबाईल न घेऊन दिल्यामुळे किंवा मोबाईलवर सतत गेम, कार्टून तसेच टीव्ही जास्त वेळ पाहू नकोस असं सांगितल्यामुळे (३) प्रेमीयुगुल- दोघांचं एकमेकावर जीवापाड प्रेम असतं, परंतु लग्नासाठी दोघांच्या आईवडिलांनी विरोध केल्यामुळे दोघेही सोबतच

आत्महत्या करतात, किंवा दोघांपैकी एकाचा प्रेमभंग झाल्यामुळे आत्महत्या करण्याची शक्यता असते (४) पतीपत्नी यांचं एकमेकांवरील विश्वास आणि प्रेमावर अवलंबून असणारं नातं आहे. ज्या दिवशी त्या विश्वासाला तडा जातो, त्यादिवशी एकमेकांविषयी संशय निर्माण होतो आणि त्यामुळे वाद, भांडण, मारझोड, खून असे प्रकार घडतात. पती जर दारु पिऊन घरात पत्नीला , मुलांना मारझोड करीत असेल, पत्नीच्या माहेरुन सतत पैशांची मागणी करत असेल तर अशा वेळी पत्नी या त्रासाला कंटाळून शेवटी आत्महत्या करते. काही ठिकाणी पत्नी मुलांसह तर काही ठिकाणी पती, पत्नी आणि मुलांसह आत्महत्या करतात. (५) पोलीस विभागात काही अधिकारी, कर्मचाऱ्यांनी स्वतःवर गोळी झाडून आत्महत्या केल्याचे वाचण्यात येते, त्याचे कारण म्हणजे कामावरील ताणतणाव इत्यादी.

प्रत्येक आत्महत्या करणारा हा मनोरुग्ण नसतो. मनोरुग्णात साधारणतः नैराश्य, स्किझोफ्रेनिया, व्यसनाधीनता या आजारात आत्महत्येचे प्रमाण जास्त आढळल्याचे आणि विशेषतः व्यसनाधीनता जर इतर आजाराबरोबर असेल तर त्या व्यक्तीत आत्महत्येची शक्यता जास्त असते, असे मानसोपचार तज्ज्ञांचे मत आहे.

जगात सुमारे ३३ कोटी नैराश्यग्रस्त लोक असून त्यापैकी ७ कोटी (१८ %) लोक एकट्या भारतात आहेत. यातील जवळपास ८०% नैराश्यग्रस्तांना कोणत्याही प्रकारचे उपचार अथवा तपासण्याची व्यवस्थाच उपलब्ध नसते. सध्या भारतात सुमारे चार हजार मानसोपचारतज्ज्ञ आहेत, असे जागतिक आरोग्य संघटनेचे म्हणणे आहे. संघटनेने पुढे असे म्हटले होते की, इ.स.२०२० मध्ये नैराश्य हा सर्वाधिक आढळणारा विकार असेल. जगभरात दरवर्षी सुमारे १० लाख माणसे आत्महत्या करतात. जागतिक आरोग्य संघटनेच्या अंदाजानुसार मानवी मृत्यूच्या कारणांच्या क्रमवारीत आत्महत्या तेराव्या क्रमांकावरचे कारण आहे. काही लोकांमध्ये खालील लक्षणे दिसू लागतात. यावर आपण विशेष लक्ष दिले पाहिजे म्हणजे अप्रिय घटना टळू शकेल.

अशा व्यक्तींमध्ये एकटेपणा जाणवतो, दु:ख, नैराश्याची भावना असते, असहाय, निराशाजनक असे वाटते. आपल्या आयुष्याला काहीही अर्थ उरला नाही, अशी मनोमन खात्री वाटते, काही जणांत अपराधीपणाची भावना उफाळून आलेली असते, काहींच्या स्वभावात बदल होऊ लागतो, मित्र, नातेवाईक यांच्यापासून दूर दूर राहू लागतो, त्यांचे व्यसनांचे प्रमाण वाढते. चिडचिड करतात, बोलण्यात नैराश्य जाणवते, स्वतःविषयी तिरस्कार, लाज, शरम व्यक्त होत राहते. आर्थिक व्यवहारात निरवानिरव सुरु होऊन, नॉमिनेशन, मृत्यूपत्र इ. तयार करण्याकडे कल होतो.

ज्यावेळी एखाद्या व्यक्तीला त्याचे जीवन निरर्थक व निरस वाटते तेव्हा नैसर्गिकरित्या त्याच्यामध्ये आत्महत्येचे विचार येतात. काही वेळा अशी व्यक्ती बरेचदा शेवटच्या क्षणापर्यंत द्विधा मनस्थितीत असते. आत्महत्या करु, नको करु असे द्वंद्व तिच्या मनात सातत्याने सुरु असते. म्हणजे जर शेवटच्या क्षणाला कोणी आशा दाखविली, तिचे मन वळविले, तर ती व्यक्ती निर्णय बदलवू शकते. अशावेळी त्या व्यक्तीला मानसिक आणि भावनिक आधार, पाठबळ देणे फार महत्वाचे असते. तसा वेळीच आधार मिळाला नाही, तर ती स्वतःला संपवावयाचा प्रयत्न करते. परंतु अशा व्यक्तीने कुटुंबातील जवळच्या व्यक्तीजवळ किंवा जिवलग मित्रांजवळ मन मोकळे करावयास पाहिजे. ते व्यक्त न झाल्यामुळे मनाची घालमेल होऊन आणखी मनाची घुसमट वाढते.अशावेळी कुटुंब आणि मित्र यांची भूमिका महत्वाची असते. हे दोघेही सजग राहिले तर अशा घटना टाळू शकतात. त्यासाठी काही उपाय बघूया.

अशा व्यक्तीच्या बोलण्यावर तातडीने प्रतिक्रिया देऊ नका, भरपूर गप्पा मारा. त्यांची स्वप्ने, संबंध यावर बारकाईने लक्ष द्या. आपल्याला वाटतात त्या गोष्टी अशा लोकांकडून बळजबरी करवून घेऊ नका. आपले मत थोपण्याऐवजी त्यांचे मत, त्यांचे विचार, त्यांची आवड यावर लक्ष द्यावे. त्या व्यक्तीचे मित्र, कुटुंबीय, सहकारी यांच्याबाबत अनुमान लावू नका. उगाच सहानुभूती दाखवू नका. ती व्यक्ती जे बोलते त्याला कमी लेखू नका, नैराश्यातील व्यक्तीला अनेक गोष्टी खऱ्या वाटू लागतात. ती व्यक्ती जे काही बोलते, त्यावर गांभीर्याने विचार केला पाहिजे.तसेच महत्वाचे म्हणजे गरज भासल्यास मनोविकारतज्ज्ञांची मदत घ्यायला हवी. नैराश्यात समुपदेशनाचा विशेष उपयोग होतो. त्यासाठी स्वतःचे छंद जोपासणे, व्यायाम करणे, आराम करत तणावाचे नियोजन करणे, स्वतःसाठी वेळ देणे, आपल्या विचारामुळे निराशा निर्माण करणारे विचार शोधून त्यावर काम करणे. काही लोकांत याबाबत खूपच विचार केलेला आढळतो. त्यांनी वेगवेगळ्या पर्यायांचा ही विचार करुन ठेवलेला असतो. मित्रांबरोबर, नेटवर अशा बाबतीत त्यांनी अभ्यासही केलेला असतो. अशा लोकांशीही अखेरच्या क्षणी संपर्क साधून त्यांना परावृत्त करता येऊ शकते. त्याचप्रमाणे मानसिक आधार, व्यसने, आधीचे आत्महत्येचे प्रयत्न, घरात, नात्यात नजिकच्या काळात आत्महत्या, जोडीदाराचा मृत्यू, आर्थिक नुकसान, घटस्फोट अशा गोष्टी ज्यांच्या बाबतीत आढळतील त्यांच्याकडे जास्त लक्ष दिले गेले पाहिजे, त्यांची विशेष काळजी घेतली गेली पाहिजे.

सौ. सिंधुताई सपकाळ (माई) यांच्या सहवासातील आठवणी -'आमची माई' हे पुस्तक वाचले. त्यातील एक घटना अशी की, दिनांक १२ जानेवारी २०१२ रोजी भुसावळ येथे सौ. सिंधूताईंचा आत्मकथनाचा कार्यक्रम होता. त्यानंतर त्या जळगावला मुक्कामाला आल्या. दुसऱ्या दिवशी सकाळी १० वाजता भुसावळहून एक मध्यम वयाची महिला माईंना भेटावयास आली. तिने माईंना पाहिल्यावर गळ्यात पडून ओक्साबोक्सी रडू लागली आणि शांत झाल्यावर सर्व हकिकत माईंना सांगितली. ती एक शिक्षिका, नवरा रेल्वेत नोकरीला, दोघांमध्ये सतत भांडणं, वादविवाद. नवरा छळतो, मारहाण करतो म्हणून ती जीवनाला कंटाळली होती. आत्महत्या करून सर्व संपवावे असे तिला तीव्रतेने वाटत होते, पण माईंच्या आत्मकथनामुळे त्या बाईच्या विचारात परिवर्तन झाले आणि तिने नव्या उमेदीने जगण्याचे ठरविले. तिने प्रत्यक्ष भेटून मन मोकळे केले. वेदनेला वाट मोकळी करून दिली आणि माईंच्या अनुभवातून तिला जगण्याचे सामर्थ्य मिळाले. म्हणून कोणासोबतही मन मोकळे करा. माईंचा एक संदेश, "आत्महत्या करून मरण पत्करण्यापेक्षा वेदना भोगत असलेल्या माणसांचा आधार बनून जगायला शिका."

**आत्महत्या केल्यामुळे होणारे कौटुंबिक नुकसान-** आत्महत्या करणारी व्यक्ती अकल्पितपणे या जगातून अचानकपणे निघून जाते, परंतु तिच्या कुटुंबियांची अपरिमित हानी होते. जर स्त्रीने आत्महत्या केली असेल, तर लहान मुले आईच्या प्रेमाला मुकतात आणि वडिलांनी आत्महत्या केली असेल, तर मुले पितृप्रेमाला पारखी होतात. दोघांनी आत्महत्या केली, तर मुले उघड्यावर येतात, पोरकी होतात. घरातील प्रमुख व्यक्तीने आत्महत्या केल्याने अर्थाजन बंद होऊन कुटुंब देशोधडीला लागते. विधवा स्त्रीकडे समाजातील काही वाईट प्रवृतीचे लोक वाकड्या नजरेने पाहतात.

**शेवटी जाता जाता......**

- आपण कोरोनामुळे चिंतित आहात ?
- स्वतःची व कुटुंबियांची काळजी वाटते?

**(उर्वरीत मजकुर पृष्ठ क्र. २५)**

# ऐका हो ऐका – मनापासून ऐका



डॉ. प्रदीप पाटकर
patkar.pradeep@gmail.com

ऑक्टोबर महिन्यात आम्ही मानसिक आरोग्याशी जीवनबंध जोडलेली मंडळी 'मानसिक आरोग्य सप्ताह' आणि मग १० ऑक्टोबरला 'मानसिक आरोग्य दिन' जगभर साजरा करतो. त्यात लेख, मुलाखती, सभा, व्हिडिओ, वेबिनार्स, गप्पागोष्टी अशा अनेक मार्गांनी आम्ही वर्षानुवर्षे सर्वांना मानसशास्त्राचा परिचय करून देत असतो. असलेली ओळख अधिक दृढ करीत असतो. मनाचे अंतरंग, भावनिक जग व विचारविश्व खुले करून, आयुष्यात अधिकाधिक सकारात्मक बदल घडवून, जग अधिक प्रगत, समृद्ध व आनंदी कसे होऊ शकेल हा प्रयत्न हे शास्त्र सतत करीत असते. त्या साऱ्या जीवनोत्सवात एक म्हटले, तर साधी, प्रत्यक्षात अत्यंत प्रभावी कृती असते, ती म्हणजे दुसऱ्यास, बोलणाऱ्यास ऐकणे ही होय.

सतत आपले कान उघडेच असल्यामुळे, आपण जागृतावस्थेत सतत ऐकत असतोच. पण बारकाईने लक्ष दिलेत, तर लक्षात येईल, खास करून वर्तमान तीव्र ध्वनिप्रदूषणाच्या जमान्यात आपण ऐकण्यासाठी बहुतेक वेळी काय काय ऐकायचे नाही? कुठे कान मनानेच बंद करून घ्यायचे? हेच ठरवीत असतो. शांततेला ऐकणे तर शहरात दुरापास्तच झाले आहे. मेहनत जास्त असते न ऐकण्यासाठी.

बरे बोलू पाहतात, बोलायचे असते अनेकांना. सजीवांना तसेच निर्जीवानाही. आताशा बेडकांना त्यांचे हायबरनेशनमधले अनुभव तीव्रतेने सांगायचे असतात. रातकिडे संध्यासमय घोषित करीत असतात. पक्षी सकाळी एकमेकांना ‘गुड मॉर्निंग‘ म्हणतात. मग पोट भरण्यासाठी आणि पोट भरल्यावर आपापली गाणी सुरू करतात. त्यातील काही उत्कृष्ट शीळबाज सुरेल शिट्ट्यांद्वारे रियाज करीत असतात. जीव केवढा आणि आवाज किती, यात काही ताळतंत्र नसते. [त्याचा इन्कमशी संबंध नसतो!] तसे सांगणारे तत्पर टीकाकार जसे आपल्या आजूबाजूला चिक्कार असतात, तसे 'मार्गदर्शक' त्यांच्यात बहुदा नसावेत ! सकाळी-संध्याकाळी कुणी काहीही बोलले तरी चालते. अदृश्य सेन्सॉर इथे नसतो. खार आणि साळुंक्या तर सतत तक्रार वाटावी, असा टिपेचा सूर लावून बसतात. शहरात भिन्न बहुदा यांत्रिक, व्यावहारिक आवाज चालू असतात. यात बोलणारे खूप आणि ऐकणारे फार कमी असा प्रकार जास्त.

पण मंडळींना काही सांगायचे असते, कुणीतरी ते नीट, शांतपणे ऐकावे, समजून घ्यावे असे आपल्याला सारखे वाटत असते. आसुसलेली असतात माणसे बोलायला, सांगायला [उगीच काय समुपदेशक व कौन्सिलर फॉर्मात आहेत?]. म्हणून मानसशास्त्राकडे जायला माणसे तयार असतात, मनोविकार तज्ज्ञाकडे जायला नाराजी असते. पूर्वी कोचवर झोपून मनात येईल ते बोलायची सुवर्णसंधी सायकोअनालिसिसमध्ये होती. मला तर वाटते, आज या सोयीची फारच गरज आहे. सेन्सॉर नाही [रेकॉर्डिंगही नसावे], खुशाल बोला काय बोलायचे ते!

पण ऐकणे ही एक अत्यंत आवश्यक कला तर आहेच, पण त्याहून जास्त महत्त्वाचे म्हणजे तो एक प्रभावी उपचार आहे. त्रस्त [गुगल हे लिहिताना 'ट्रस्ट' शब्द का टाइप करतो मला कळत नाही !! असो.], तप्त मनावरील तो एक शीतल, सुखदायी

शिडकावा आहे. ज्यांच्यापाशी भाषा नाही, अशा पाळीव प्राण्यांना घरा-दारात, शेतात जे ऐकतात त्यांना हे जाणवत असेल. लहान मुलांशी बोलताना हे जाणवतेच. कुणी आपल्याला लक्ष देऊन ऐकते आहे, यात स्वत्वाचा विलक्षण आदर जाणवतो व मुले मोकळी होऊन बोलतात; हा अनुभव अनेकांना असेल. नुसते कुणी आपल्याला एकाग्रतेने ऐकते आहे, याचा आनंद तर साध्या माणसापासून ते थोर कलाकारांपर्यंत सर्वांनाच होतो. हे ऐकणे त्यांना अधिक चांगले देण्यासाठी प्रेरित करते. प्रश्न निर्माण करणारी मुले या विषयावर संशोधन करीत असताना व नंतर उपचार करीत असताना मला अनेक वर्षे हे प्रकर्षाने जाणवत आले आहे. माझ्या पत्नीला, चित्राला तर सवय आहे, तिच्या बागेत उमललेल्या पाने-फुले-पक्ष्यांशी संवाद करण्याची. रोज थेट त्यांच्याशी बोलून, त्यांचे ऐकून, पक्षी, पानाफुलांचे कौतुक केल्याशिवाय तिची सकाळ आनंदी होत नाही. [हे कुठल्याही मनोविकारांचे लक्षण नाही, हे येथील शंकित मनांसाठी सांगू इच्छितो हुश्श...].

मात्र वेळ देऊन, नीट शांतपणे, न कंटाळता ऐकणे, हातातील मोबाइल बाजूला ठेऊन ऐकणे, मनातील इतर विचार बाजूला सारून ऐकणे, पूर्वग्रह व आधीच मनात भूमिका न घेता ऐकणे, मनात उत्तरे तयार करणे टाळीत ऐकणे, भूतकाळात न जाता ऐकणे, मनातील टीकाकाराला आवरून धरीत ऐकणे अशी अनेक संतुलने सांभाळीत ऐकावे लागते.

घरा-दारात सर्व सांगताहेत आम्हाला ऐका, भले प्रश्न नका सोडवू, उत्तरे नका देऊ, मार्गदर्शन नका देऊ किंवा द्या मार्गदर्शन पण पूर्ण ऐकल्यावर द्या. आधी प्लीज ऐका. मीही प्रयत्न करतो, तुम्हीही प्रयत्न करा. मानसमित्र होण्यासाठी, मने सावरण्यासाठी, सजीव-निर्जीव-सौंदर्य, प्रेम, निसर्ग, चित्रे-नाट्य-साहित्य-संगीत-इतिहास आणि आपली नाती, मैत्री, सहकार्यकर्ते, विरोधी मते, विरोधक- सारे समजून घेण्यासाठी मला महत्त्वाची वाटते ती ही पहिली पायरी.

जग सुंदर बनविण्यासाठी ऐकूया !!

■ ■ ■

---

**पृष्ठ क्र. २३ या लेखाचा उर्वरीत भाग....**
**(आत्महत्या हा पर्याय नाही )**

- भविष्याबद्दलच्या अनामिक भीतीने अस्वस्थता जाणवते?
- ताण आलाय ?
- नेमके काय होतंय कळत नाही ?

घाबरु नका, आम्ही आपल्याला खात्रीने मदत करु शकतो. केवळ एक कॉल करा आणि निःशंक मनाने व मोकळेपणाने संवाद साधा. यासाठी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने महाराष्ट्रभर मानसमैत्र हेल्पलाईन सुरु केली असून ती सेवा निःशुल्क आहे. तरी अवश्य लाभ घ्यावा.

# वेध खगोलीय अविष्कारांचा



शंकर शेलार
९६५७८ ८७५३२

**कालेय तारका समूहातील उल्कावर्षाव (Draconids Meteor Shower)**

या महिन्यात काही प्रेक्षणीय आणि अलौकिक अशा खगोलीय घटना पाहायला मिळणार आहेत. त्यापैकी पहिली घटना, Draconids उल्का वर्षावाच्या रुपात दिसेल. हा खगोलीय आविष्कार ऑक्टोबरच्या ७, ८ व ९ या तीन तारखांना घडणार आहे. त्यातही ८ तारखेला खास महत्व आहे, कारण त्यादिवशी उच्चांकी वर्षाव होईल. म्हणून या दिवसाला 'Peak day of Meteor Shower' म्हणतात. हा वर्षाव पाहाण्यासाठी योग्य वेळ सूर्यास्तानंतर लगेचंची (early evening) आहे. या वर्षावाचा उद्गमबिंदू (radiant), कालेय (Draco) तारकासमूहात दिसतो म्हणून यास ' कालेयचा उल्कावर्षाव' (Draconids Meteor Shower) म्हणून संबोधतात. सूर्यास्तानंतर वायव्य दिशेला (north west ) हा आविष्कार पाहायला मिळेल .

उत्तर आकाशात ध्रुव (Polaris) ताऱ्याभोवती सप्तर्षी (Ursa major) आणि ध्रुवममत्स्य (Ursa minor) या तारका समूहांदरम्यान सुरु होऊन, अभिजीत (Vega) या ताऱ्याजवळ पोहोचणाऱ्या १३-१४ ताऱ्यांचा मिळुन बनलेला, कालेय नावाचा, सर्पाच्या आकाराचा एक तारका समूह आहे. अभिजीतच्या पूर्वेस चार ताऱ्यांनी बनलेली या सर्पाची छानशी नागफना दिसते. तेथून उल्का पडताना दिसतील. आकाशात इतरत्रही उल्का पाहायला मिळतील. या वर्षावात उल्का पडण्याचा दर ताशी १० पर्यंत असतो.

ड्रॅकोनिड्स वर्षाव हा '21p/ Giacobini-zinner' या धूमकेतुमधून त्याच्या भ्रमणमार्गावर पडलेल्या कचऱ्यामुळे (debris) घडतो. सूर्य प्रदक्षिणेवेळी पृथ्वी दरवर्षी ६ ते १० ऑक्टोबर दरम्यान या कचऱ्याच्या पट्ट्यातून पुढे जात असते. गुरुत्वाकर्षणामुळे हा कचरा पृथ्वीच्या वातावरणात घुसतो आणि घर्षणाने पेट घेतो. 21p/Giacobini-zinner हा धूमकेतू दर ६.६ वर्षांनी सूर्य प्रदक्षिणा घालतो. २०१८ साली तो सूर्यमालेत येऊन गेला आहे. आता २०२५ साली तो पुन्हा येईल. तो जेंव्हा येऊन जातो, त्यावर्षी भरपूर प्रमाणात जोरदार उल्कावर्षाव घडतो. २०११ साली युरोप मधून ताशी ६०० पर्यंत उल्का पडताना दिसल्या होत्या. १९३३ आणि १९४६ साली ताशी हजारोच्या संख्येने उल्का कोसळताना पाहायला मिळाल्याची नोंद आहे.




**कालेय तारका समूह**

असा हा कालेयचा उल्कावर्षाव (Draconids), उत्तर गोलार्धातून चांगला पाहायला मिळतो. या काळात शुक्ल पक्षातील द्वितीया /तृतीयेची लहान चंद्रकोर असून, ती लवकरच मावळंत असल्याने, निरीक्षणात चंद्रप्रकाशाचा अडथळा जाणवणार नाही. उल्का वर्षाव चांगला दिसण्यासाठी शहरी लाईट्स आणि प्रदूषित वातावरण यांपासून दूर, अंधाऱ्या ठिकाणी, मैदान किंवा टेकडीवर जावे. अशा ठिकाणांवरून हा खगोलीय आविष्कार छान दिसतो.

**मृग नक्षत्रातील उल्का वर्षाव (Orionids Meteor Shower)**

याच महिन्यात खगोल प्रेमींना उल्कावर्षाव पाहाण्याची दुसऱ्यांदा संधी मिळणार आहे ती, २१-२२ ऑक्टोबरच्या रात्री. २१ तारखेच्या मध्यरात्री नंतर ते २२ च्या पहाटे सूर्योदयापर्यंत हा वर्षाव उत्तम दिसेल. मध्यरात्री नंतर पूर्व क्षितिजावर मृग नक्षत्राचा (Orion) उदय होईल. या वर्षावाचा उद्गम बिंदू मृग नक्षत्रात असलेने, तेथून उल्का फेकल्या जात आहेत असे दिसते. म्हणून याला 'मृगाचा उल्का वर्षाव' (Orionids) म्हणतात. हा वर्षाव सामान्य असल्याने यात ताशी २० पर्यंत उल्का पडताना दिसतील. नुकतीच पौर्णिमा होऊन गेली असल्याने, कृष्ण पक्षातील प्रथमा/ द्वितीयेचे मोठे चंद्रबिंब असेल. त्यामुळे हा वर्षाव पाहाताना चंद्राच्या चांदण्याचा अडथळा नक्कीच जाणवेल, तरीही ठळक उल्कांचे दर्शन जरुर होईल.

'ओरीओनिड्स वर्षाव' हा हॅलेच्या धूमकेतुमुळे घडतो. हा धूमकेतू दर ७६ वर्षांनी सूर्याला वळसा घालून जात असतो. त्यावेळी त्याच्या शेपटीतील काही द्रव्य / कचरा (debris) त्याच्या भ्रमण मार्गावर सांडला जातो. आपली पृथ्वी सूर्य प्रदक्षिणेवेळी या भागातूनच जात असते. तिचा तेथुन जाण्याचा काळ ऑक्टोबर २ ते नोव्हेंबर ७ असा आहे. म्हणजे १ महिना ५ पाच दिवस हा कचरा पृथ्वीच्या वातावरणात रोज घुसत असतो आणि दररोज उल्का वर्षाव घडत असतो. मात्र २१-२२ ऑक्टोबरला हा वर्षाव उच्चांकी (peak) असतो. अशा उल्का वर्षावास कारणीभूत ठरतो तो अंतराळातील कचरा (debris). हा कचरा प्रामुख्याने धूमकेतु व लघुग्रहांचा असतो.

धूमकेतु हे आपल्या सूर्यमालेचेच घटक. ते सूर्यापासून खूपच दूर, प्लुटोच्या ५० हजार पट अंतरावरील उर्टच्या मेघात आढळतात. बर्फ, धूळ व कार्बन डाय ऑक्साईड वायूचे गोठलेले घाणेरडे गोळे( Dirty Ice Ball) म्हणजे धूमकेतु. त्यांच्या कक्षा प्रदीर्घ वर्तुळाकार असतात. ठराविक काळाने ते सूर्य प्रदक्षिणा करीत असतात(periodic). सूर्य सानिध्यात सौरवातामुळे त्यांना अवाढव्य शेपट्या फुटतात. त्यामुळेच आपण त्यांना पाहू शकतो. या शेपट्यांतील काही द्रव्य ते त्यांच्या मार्गावर सोडून जातात. पुढे सूर्य प्रदक्षिणेवेळी पृथ्वी जेंव्हा या भागात येते तेंव्हा हाच कचरा पृथ्वीच्या वातावरणात घसतो आणि घर्षणाने पेटतो. तेंव्हा आकाशात आपल्याला उल्का वर्षावाचा सुंदर, अलौकिक नजारा पाहायला मिळतो.



**हॅलेचा धूमकेतु**

■ ■ ■

# अखेर भानामती थांबली



माधव बावगे
९४०४८७०४३५

कोविड-१९ महामारीमुळे लागलेल्या लॉकडाऊनमुळे सगळीकडेच चिंताजनक परिस्थिती निर्माण होऊन सर्वच लोक विवंचनेत आहेत. निलंगा तालुक्यातील नदीवाडी हे गावदेखील याला अपवाद नाही. येथील रहिवासी असलेली मानसी त्र्यंबक भोसले (बदललेले नाव) हिचे वडील दोन्ही पायांनी अधू असून ती स्वत:देखील दिव्यांग आहे. मात्र गेल्या पंधरा-वीस दिवसांपासून या चौदा वर्षीय मुलीच्या डोळ्यांमधून खडे, ज्वारी आणि तांदूळ बाहेर पडत आहेत. विशेष म्हणजे, या मुलीला काहीच त्रास होत नाही. परंतु डोळ्यांतून सतत पाणी येत असते. सदर मुलीच्या वडिलांनी तिला तपासणीसाठी लातूर येथील डॉक्टरांकडे नेले असता; हा अजब प्रकार असल्याचे त्यांनी सांगितले. याला चमत्कार म्हणावे की अंधश्रद्धा हा मोठा प्रश्न लोकांना पडला आहे. अनेक वेळा निर्जीव मूर्ती दूध पिते असे ऐकले होते. परंतु या दिव्यांग मुलीच्या डोळ्यातून मातीचे खडे, ज्वारी व तांदळाचे दाणे बाहेर पडत असल्याने तो एक संशोधनाचा विषय बनलेला आहे. डॉक्टर लोकांकडूनही या घटनेचे निदान होत नसल्याने या मुलीचे आईवडील चिंताग्रस्त आहेत. हा प्रकार नेमका काय आहे हे कोणालाही समजत नाहीये. अनेक खाजगी औषधे वापरून पाहिली. परंतु दररोज सकाळी ही मुलगी झोपेतून उठताक्षणी तिच्या डोळ्यातून मातीचे खडे, ज्वारी व तांदूळ बाहेर पडतात. या घटनेला काय म्हणावे असा प्रश्न या भागातील लोकांना पडला आहे. जगात अनेक आश्चर्यजनक गोष्टी घडत असतात. परंतु हा प्रकार थोडा वेगळाच असल्याने चिंतेचा विषय बनलेला होता. ही बातमी प्रिंट मीडियातून प्रसिद्ध होताच इलेक्ट्रॉनिक मीडियाची मंडळी त्या गावी पोहोचली. त्या मुलीच्या घराबाहेर खुर्चीवर बसवून प्रात्यक्षिक घेत मुलीच्या आणि तिच्या वडिलांच्या मुलाखतीच्या क्लिप्स यूट्यूबसह इतर प्रसारमाध्यमांतून प्रसारित झाल्या. तेव्हा पत्रकार व त्या परिसरातील लोकांनी महा. अंनिस, लातूरशी संपर्क साधला. त्यावर 'आम्ही हा प्रश्न हाताळून हे पूर्णतः थांबवू, मात्र त्यासाठी त्या कुटुंब प्रमुखाची संमती लागेल.' असे सांगितले. त्यानंतर दस्तुरखुद्द मुलीच्या वडिलांचाच हा प्रकार थांबवण्यासंदर्भात फोन आला.

दिनांक २० जुलै २०२१ रोजी माधव बावगे, अनिल दरेकर, सुधीर भोसले, दिलीप धुमाळ ही महा. अंनिसची टीम नदीवाडीला निघाली आणि पीडितेच्या घरी पोहचली. तिथे मुलगी, तिचे वडील, आजोबा आणि काही नागरिक हजर होते. आम्ही आमची कार्यपद्धती सांगितली. कुटुंब प्रमुखाची लिखित संमती मिळेपर्यंत गावाची इतर सर्वसाधारण माहिती घेतली. साधारणतः दीड हजार लोकवस्तीचे गाव. गावात चौथी पर्यंतच शाळा. हे गाव तसं सधन, नदीकाठी आणि कर्नाटक सरहद्दीजवळच आहे. मुलीची आजी, आई, वडील व शेवटी मुलीची वैयक्तिक मुलाखत त्यांच्या घरी घेण्याचे निश्चित करून घरी गेलो.

महा. अंनिसने अनुभवातून अशा भानामती शोधण्याची एक विशिष्ट पद्धत विकसित केली आहे. त्याप्रमाणे पहिल्यांदा मुलीची आजी, वडील, आई या क्रमाने सविस्तर वैयक्तिक मुलाखती घेतल्या. मुलगी आईपेक्षा आजीची लाडकी. आजी अशिक्षित व जुन्या गोष्टींवर प्रगाढ विश्वास असणारी. घरकाम आणि शेतातील कष्टातच रमलेल्या आईचा मुलीशी फारसा संवाद होत नाही. मुलगी सज्ञान होण्याच्या उंबरठ्यावर. या काळात होणारे शारीरिक, मानसिक

बदल व त्याचे परिणाम, आईने मुलीशी मैत्रीण होऊन ज्या गोष्टी सांगायला हव्यात, याबाबत ती पूर्णतः अनभिज्ञ. त्यातच भावकीतील एका लग्नात त्या बाधित मुलीला हिरव्या बांगड्या भरल्या गेल्या. त्यावेळी त्या महिलेने तिचा हात चोळला हे आईने पाहिले. तिच्या मनात शंकेची पाल चुकचुकली. पण त्याबाबत कुणावर त्यांनी संशय व्यक्त केला नाही. हे कुणी तरी केलंय असं वाटलं तरी नाव कुणाचे घ्यायचे? वडिलांचा ठाम समज हा की, ही बाब डॉक्टरांच्या कक्षेतली नाहीच. म्हणून त्यांनी दोन ठिकाणच्या भोंदूंना, दाखवले. त्यांनी सांगितलेल्या पद्धतीने सर्व काही केले. त्यांनी जागरण गोंधळ घालायला सांगितले. तो अद्याप घालावयाचा आहे. एका बाबाने मन मानेल ती फी उकळली. ती वडिलांनी गपगुमान दिली. गुण आला तर नाहीच उलट प्रकार वाढतच गेला. दरम्यान दोन डॉक्टरांना दाखवले. त्यापैकी एकाने हा अजब प्रकार असल्याचे सांगितले. तर दुसऱ्याने इतरांचे लक्ष वेधून घेण्यासाठी ती डोळ्यातून खडे काढत असावी, असे सांगितले. त्यावर वडिलांचा विश्वास बसला नाही. शेवटी मुलीची मुलाखत घेताना तिचे डोळे तपासले. वास्तविक ती मुलगी अपंग नाही, उलट ती चुणचणीत, हुशार आहे. तिला बोलते करण्यासाठी तिच्या आवडीनिवडी विचारल्या. आपण मोकळेपणाने चर्चा करायची आहे. तुझे जे प्रश्न आहेत; ते घरी कोणी विचारात घेत नाहीत. तुझ्या अपेक्षा पूर्ण होत नाहीत. कोणी तुला त्रास दिला, कोणी मारले का? इच्छेच्या विरुद्ध काही घडले का? ते स्पष्टपणे सांग. तुझ्या अपेक्षा कुटुंबांने पूर्ण कराव्यात याची हमी आम्ही देतोय. हे तू आम्हाला सांगितले असे त्यांना कळू न देता, त्या पूर्ण करण्याची व्यवस्था आम्ही करणार आहोत. एवढेच नव्हे तर आम्ही त्या पूर्ण करवून देतो, असा तिला विश्वास दिला. तिला शिक्षण घ्यावेसे वाटते. गावातील मुली मिळून पायी जवळच्या हांचणाल गावी जात होत्या. वडीलही तिला सोडायचे. पण गेली दोन वर्ष लॉकडाऊन मुळे शाळा बंद. त्यामुळे सतत दुकानात बसणे तिला आवडू लागले. शाळा ऑनलाईन असते म्हणून मोबाईल तिच्या हातात असतो. पुस्तकांची नावे तिला माहीत आहेत. वयात येण्याच्या उंबरठ्यावर असताना आईने तिला काहीच माहिती दिली नाही. भावकीच्या लग्नात तिला हिरव्या बांगड्या भरल्या गेल्या त्यावेळी तिचा हात चोळला, याची तिला जाणीव आहे. हे असे घडण्यामागची जी कारणे असतात त्याबाबत विचारणा केली. त्याची तिने समाधानकारक उत्तरे दिली नाहीत.

पत्रकारांच्यासमोर अर्ध्या तासात दोन तीन वेळा डोळ्यातून वस्तू, धान्य निघाले. थोडासा त्रास होतो असे ती म्हणाली. शेवटी मी माझ्या खिशाचा पेन तिच्यासमोर ठेवला आणि तिला विचारले, 'बाळा हा पेन आता आपोआप माझ्या खिशात जाईल का?' ती म्हणाली, 'नाही'. मी, 'मग काय करावे लागेल? ' असे म्हटल्यावर ती म्हणाली, ' तो जमिनीवर असलेला पेन आपल्या हाताने उचलावा लागेल, तो आपल्या हातानी खिशाला लावावा लागेल, तेव्हा तो खिशाला लागेल. मी म्हटलं, ' मग हे आपोआप घडेल का?' ती म्हणाली, 'नाही.' मी म्हटलं,'तू आता घरी आहेस; मग आपोआप दुकानात दिसशील का?' तर ती म्हणाली, ' नाही.' ' मग तुला दुकानात दिसण्यासाठी काय करावे लागेल?' ती म्हणाली, ' मला चालत दुकानात जावे लागेल.' ' म्हणजे कुठलीच गोष्ट आपोआप होत नाही.

कुठल्या तरी बाह्य स्पर्शाशिवाय कोणतीही वस्तू आपली जागा बदलू शकत नाही. तुझ्या डोळ्यात ज्या वस्तू निघतात त्या तुझ्या डोळ्यात आपोआप तयार झाल्यात का? तुझे डोळे त्या वस्तू, धान्य तयार करण्याचा कारखाना आहे का? तांदूळ गहू, ज्वारी यांचे पेरणीनंतर पीक येणे, राशी करून घरी आणून मग कांडून त्यातून तांदूळ निघतात, ही प्रक्रिया किती महिने, किती दिवसांची असते? तुझ्या डोळ्यात तर ते अर्ध्या तासात दोनदा निघतात, हे तुला पटते का? हे बघ बेटा हे गहू, ज्वारी, तांदूळ तुझ्या डोळ्यातून आपोआप निघाले नाहीत. तर ते अगोदर कुण्यातरी हातांनी इतरांच्या नजरा चुकवून

डोळ्याच्या खालच्या पापणीच्या आत ठेवले जातात. ते दुसऱ्या कोणाच्या हातानी तुझ्या डोळ्यात घातले तर ते कोणी घातले हे तुला दिसणार ना? मग हे कोणी दुसऱ्यांनी घातले नाही, आपोआप ते डोळ्यात तयार होत नाहीत, मग ते डोळ्यात कोणी घातले असणार? ज्या हाताने हे डोळ्याच्या खालच्या पापणीत हे ठेवले; तो हात आम्ही शोधला आहे. शिवाय तो हात कुणाचा आहे हे तुला आणि आम्हालाच माहीत आहे. इतर कोणालाच हे माहीत नाही. हा प्रश्न विचारल्यानंतर तिने दीर्घ श्वास घेतला आणि घाबरली. दिलीप धुमाळ यांनी, 'बेटा तुझ्यासारखी माझी नात आहे तू घाबरु नकोस. आपल्याला हे थांबवायचे आहे. यावेळी अनिल दरेकर व सुधीर भोसले यांनीही आवश्यक ते प्रश्न विचारले. सुधीर भोसले यांनी, 'मी मुलांना ऑनलाईन शिकवतो, तुलाही, मी नियमित अभ्यास पाठवतो. तो तू पूर्ण कर. काही अडचण असेल तर विचार, तुला शिकवले जाईल', असा विश्वास दिला. आम्ही म्हणालो,'हे तूच तुझ्या हाताने तुझ्या डोळ्यात घातले आहेस, हे कोणालाही सांगणार नाही. आणि तुला जर कोणी विचारले तर तूही सांगायचे की, ते अंनिसचे लोक आले आणि त्यांनी काय केले माहीत नाही. मात्र आता हे थांबले आहे, असेच तू सांगायचे. तुझ्या डोळ्यातून खडे निघतात, याची गावभर सगळीकडे चर्चा चालू आहे. तुला हे आवडते का? याचे भविष्यात काय परिणाम होतील याचा तू विचार केला आहेस का? लॉकडाऊननंतर शाळा सुरू होतील, तू शाळेत जाशील तेव्हा सर्व मुलेमुली तुझ्याकडे बघतील, हिच्या डोळ्यातून धान्य,खडे निघत होते, असे चिडवतील, तुझ्याकडे बघण्याचा सर्वांचा दृष्टीकोन बदलेल, तुझ्या गळ्यात गंडेदोरे बघून, हिला काहीतरी झालेले आहे असे म्हणतील. तुला भानामती होते आणि डोळ्यातून खडे, धान्य निघते ही चर्चा तुझ्या सर्व नातेवाईक मित्रमंडळी यांच्यामध्ये होईल. आणखी काही वर्षांनी तुझे वडील तुझे लग्न जमवण्याचे ठरवतील. त्यावेळी तुझ्याबरोबर लग्न करायला कोण तयार होईल? हे सर्व प्रश्न तुझ्या व कुटुंबियांच्या समोर असतील याचा विचार कर. पत्रकारांच्या समोर अर्ध्या तासात दोनदा तांदूळ डोळ्यात निघाले. ते तांदूळ आम्ही आमच्या ताब्यात घेतले आहेत. ते तांदूळ आणि तुझ्या दुकानातील तसेच घरातील तांदूळ सारखेच आहेत. आम्ही येऊन आता पाच तास झाले. तेव्हापासून एकदाही तुझ्या डोळ्यातून तांदूळ निघालेले नाहीत. आता इथून पुढे तुझ्या डोळ्यातून तांदूळ निघतील का? यावर इथून पुढे माझ्या डोळ्यातून खडे, ज्वारी तांदूळ अजिबात निघणार नाहीत, असे कबूल करत तिने स्वत:च्या हस्ताक्षरात लिहूनही दिले.

सर्व कुटुंबीयांना एकत्र बोलावून आम्ही निष्कर्ष सांगितले. हे जे काही घडले तो अनाकलनीय चमत्कार नाही. कोणी तिला करणी, भानामती केलेली नाही. अशी करणी करण्याची कोणतीही विद्या, मंत्र या जगात अस्तित्वात नाही. हा भुताटकीचाही प्रकार नाही. कुतूहलापोटी, कोणताही विचार न करता हा प्रकार घडलेला आहे. आता यापुढे असा प्रकार कदापीही होणार नाही याची त्यांना ग्वाही दिली. एका कुटुंबासोबतच गावाला आणि त्या परिसरातील जनतेला अंधश्रध्देच्या गर्तेतून बाहेर काढल्याचा आनंद व समाधान मनोमनी घेत रात्री साडेनऊ वाजता आम्ही परतीच्या प्रवासाला निघालो.

■ ■ ■

# जादुटोण्याचा संशय मानवजातीला कलंक



पी. एम. जाधव
९४२३१ १७६७८

चंद्रपूर जिल्हयातील अतिदुर्गम भाग असलेल्या जिवती तालुक्यातील वणी खुर्द हे गाव चंद्रपूरपासून अंदाजे ७० किमी अंतरावर व जिवती पासून १२ किमी अंतरावर महाराष्ट्र तेलंगणा सीमेवर आहे. वणी खुर्द या गावातील एका दलित कुटुंबावर जादुटोणा करीत असल्याचा आरोपींचा संशय होता. त्यातच गावातील काही महिलांच्या अंगात देवी आली. त्या देवीने दलित कुटुंबातील सात लोकांची नावे घेतली. यांनीच जादुटोणा केल्याचे सांगताच गावातील काही लोकांनी अंधश्रध्देपोटी वयोवृध्द स्त्री-पुरुषांना भर चौकात हातपाय बांधून अमानुष मारहाण केली. त्या मारहाणीमध्ये सात जण जखमी झाले असून एकनाथ हुके, साहेबराव हुके, प्रयागबाई हुके, शांताबाई कांबळे व शिवराज कांबळे या गंभीर जखमींना चंद्रपूर जिल्हा सामान्य रुग्णालयात भरती करण्यात आले. या गंभीर जखमींची महाराष्ट्र अंनिसचे कार्यकर्ते पी. एम. जाधव, जिल्हा कार्याध्यक्ष,सूर्यकांत खनके, जिल्हाध्यक्ष, नारायण चव्हाण, जिल्हा प्रधान सचिव व कैलास गर्गेलवार, उपाध्यक्ष यांनी भेट घेऊन विचारपूस केली. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार शांताबाई कांबळे (५३), साहेबराव हुके (४८), धम्मशिला हुके (३८), पंचफुला कांबळे (५५), प्रयाग हुके (६५), केशवराज कांबळे (७४) व एकनाथ हुके (७०) या सर्वांवर जादुटोणा करीत असल्याच्या आरोपावरुन या सर्वांना भर चौकात आणून, खांबाला दोरीने बांधून जबर मारहाण केली. ही घटना दिनांक २१ ऑगस्ट २०२१ रोजी सकाळी घडली. या घटनेच्या २४ तासानंतर पंचफुला कांबळे या पीडित महिलेने जिवती पोलीस ठाण्यात तक्रार केल्यानंतर तपासाची चक्रे सुरु झाली. पोलिसांनी सापळा रचून २१ ऑगस्टला मध्यरात्री १३ आरोपींना अटक करुन त्यांच्या विरुध्द जादूटोणाविरोधी कायदा कलम ३ सह भादंवि कलम १४३, १४६, १४९, ३२४ व ३४२ अन्वये गुन्हा दाखल केला. अटक झालेल्या आरोपींमध्ये सुग्रीव शिंदे, रामाराव शिंदे, दत्ता कांबळे, प्रकाश कोटंबे, बालाजी कांबळे, अमोल शिंदे, दादाराव कोटंबे, गोविंद येरेकर, केशव कांबळे, सिध्देश्वर शिंदे, संतोष पांचाळ, सूरज कांबळे, माधव तेलंग व दत्ता भालेराव यांचा समावेश आहे.यानंतर काही लोकांना अटक करण्यात येणार असल्याचे गडचांदूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी सुशिलकुमार नायक यांनी सांगितले. दोराने खांबाला बांधून अमानुषपणे मारहाण होत असलेला प्रकार गावातील बहुतांश नागरिक उघड्या डोळयांनी बघून आनंद व्यक्त करीत होते. पीडितांना सोडविण्यासाठी कुणीही पुढे येण्याची हिंमत केली नाही. ही पुरोगामी महाराष्ट्रासाठी लांछनास्पद व माणुसकीला काळिमा फासणारी घटना आहे. या घटनेचा महाराष्ट्र अंनिसने,तीव्र शब्दात निषेध करुन सर्वच आरोपींवर कठोर कार्यवाही करावी असे निवेदन मा. जिल्हाधिकारी गुल्हाणे, मा. जिल्हा पोलीस अधीक्षक अरविंद साळवे, चंद्रपूरचे खासदार मा. बाळुभाऊ धानोरकर यांना देण्यात आले. निवेदन देतेवेळी महाराष्ट्र अंनिसचे जिल्हाध्यक्ष सूर्यकांत खनके, कार्याध्यक्ष पी. एम. जाधव, सचिव नारायण चव्हाण व शहर शाखा अध्यक्ष सुनिल भोयर यांची उपस्थिती होती.

**घटनेबाबतची पार्श्वभूमी :**

जादूटोणा, भानामती केल्याच्या संशयावरुन मारहाण झालेल्या एका वृध्दाला ३० वर्षापूर्वी आंध्र प्रदेशातील एका गावातून करणी करीत असल्याच्या आरोपावरुन बहिष्कृत केले होते. ही बाब लक्षात येताच वणी खुर्द येथील नातेवाईकांनी तेथे जाऊन त्या वृध्दाला लपूनछपून गावात आणले होते. तसेच केकेझरी येथील शांताबाई कांबळे यांना १४ वर्षापूर्वी केकेझरी गावच्या लोकांनी याच आरोपाखाली गावाबाहेर काढले होते. त्या सुध्दा वणी खुर्द येथे वास्तव्यास आल्या. ही बाब गावकर्यांना माहित होती. या घटनेमागे ही पार्श्वभूमी कारणीभूत असावी असे वाटते. घटनेच्या दिवशी ज्या महिलांच्या अंगात देवी येवून त्यांनी दलित कुटुंबातील सात जणांवर जादुटोणा करीत असल्याचा आरोप केला त्यांनासुध्दा अटक करुन जिल्हा सामान्य रुग्णालयामध्ये मानसोपचारासाठी तज्ज्ञाकडे चंद्रपूरला पाठविण्यात आले. पोलिसांकडून पकडले जाण्याच्या भीतीने अनेक लोकांनी गावातून पलायन केले. त्यांचासुध्दा शोध पोलीस घेत आहेत. एकविसाव्या शतकातही समाजात अंधश्रध्देचे जोखड कायम असल्याचा धडधडीत पुरावा दिनांक २१ ऑगस्ट २०२१ ला वणी खुर्द येथील घटनेने समोर आला आहे. चंद्रपूर हा जिल्हा महाराष्ट्रात उद्योग धंद्यामध्ये आघाडीवर असला आणि संपूर्ण महाराष्ट्राला विद्युत ऊर्जा पुरवून प्रकाशमान करत असला तरी सामाजिक क्षेत्रातील येथील अंधश्रध्देचा काळोख या घटनेनतून पहावयास मिळतो. अंधश्रध्देच्या अनेक घटना या जिल्ह्यात घडल्या असतील,परंतु जादूटोणाविरोधी कायद्याचे ज्ञान नसल्यामुळे तक्रार करण्यास कोणीही हिंमत केली नाही. ४-५ वर्षापूर्वी जिवती तालुक्यासह जिल्ह्यातील प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये जिल्हा पोलीस प्रशासन व महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समिती यांच्या संयुक्त विद्यमाने चमत्कारामागील विज्ञान व बुवाबाजी तसेच जादूटोणाविरोधी कायदा याबाबत प्रत्येक गावातील पोलीस पाटील, सरपंच आणि तंटामुक्ती समितीचे पदाधिकारी यांच्या प्रबोधन कार्यशाळा घेण्यात आल्या. तरीदेखील गावामध्ये अशा घटना घडणे ही एकविसाव्या शतकातील शोकांतिका आहे. तेव्हा पुन्हा जिल्हा पोलीस प्रशासनाच्या वतीने प्रत्येक गावातील पोलीस पाटील, सरपंच, ग्रामसेवक, तंटामुक्त समितीचे पदाधिकारी, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर यांची प्रबोधन कार्यशाळा घेऊन त्यांच्यामार्फत गावामध्ये जादूटोणाविरोधी कायद्याबद्दल प्रभावीपणे जनजागृती करण्याची नितांत गरज आहे. प्रत्येक गाव अंधश्रध्दामुक्त करण्याकरीता वरीलप्रमाणे उपाययोजना करणे ही काळाची गरज आहे.

**चंद्रपूर जिल्ह्याला लागले अंधश्रध्देचे ग्रहण : जादुटोण्याच्या संशयावरुन अमानुषपणे मारहाण झालेल्या ४ घटनांनी चंद्रपूरात माणुसकी कलंकित**

जिल्ह्यातील जिवती तालुक्यातील वणी खुर्द येथे जादुटोण्याच्या संशयावरुन निष्पाप वृध्द स्त्री-पुरुषांना भर चौकात मांडवातील लाकडी खांबास दोराने बांधून बेदम मारहाण केल्यामुळे दलित कुटुंबातील व्यक्ती गंभीर जखमी झाल्याची घटना ताजी असतांनाच दहा दिवसांनी नागभीड तालुक्यातील मिंडाळा येथे जादुटोण्याच्या संशयावरुन इंदिरा कामठे (७०) या वृध्द आईसह मुलगा अशोक कामठे (५०) मुलगी यशोदा नान्हे (४२) यांना गावातील अंधश्रध्देने झपाटलेल्या लोकांनी अमानुषपणे बेदम मारहाण करण्याची घटना ३१ ऑगस्ट रोजी दुपारी ३ ते ४ च्या दरम्यान घडली. महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समितीचे कार्यकर्ते जिल्हा कार्याध्यक्ष पी. एम. जाधव, ब्रम्हपुरी शाखेचे कार्याध्यक्ष सुधीर अलोणे यांनी

मिंडाळा (टोली) येथील पीडित कुटुंबाची भेट घेऊन विचारपूस केली. यावेळी इंदिरा कामठे व तिच्या मुली यशोदा नान्हे व पुष्पा मांढरे या घरी हजर होत्या. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार दुपारी ३.०० वाजेच्या सुमारास गावातील १५ ते २० लोकांचा जमाव गावाच्या शेवटच्या टोकाला असलेल्या इंदिरा कामठेच्या झोपडीवर चालू आला आणि अचानकपणे जमावातील सडमाके व आत्राम कुटूंबाने इंदिरा कामठे व तिची मुलगी यशोदा यांना झोपडी बाहेर ओढत आणून मारहाण सुरु केली. आम्हाला कां मारता असे इंदिराने विचारले असता,तुझा मुलगा अशोकने आमच्या घरावर काय जादू केली,ज्यामुळे आमचे घरातील पैसा व सोने गायब होत आहेत. मुलगी संध्या हिची तब्येत खराब होत आहे. तुम्ही आमचे घरासमोरुन जायचे नाही, अशी धमकी देत मयूरी सडमाके हिने माझ्या मुलीचे केस ओढून हाताबुक्क्यांनी मारपीट केली. तुझा मुलगा अशोक कुठे आहे असे विचारले असता तो नागभिडला सायकल दुरुस्तीसाठी गेला आहे असे कळताच लगेच प्रमोद सडमाके व पिल्ला आत्राम हे दोघे मोटर सायकलने नागभिडला गेले. बाकी जमाव घरी गेला. नागभिडवरुन अशोकला मोटर सायकलने मिंडाळा (टोली) येथे आणले व नितेश सडमाकेच्या घरा समोरील पाण्याचे टाकीचे लोखंडी अँगलला अशोकला दोरीने बांधून पिल्ला आत्राम व प्रमोद सडमाके हे बॅटने व काठीने मारत होते. मला मारु नका, असे म्हणत अशोक जोरजोराने ओरडत होता. येथून जवळच असलेल्या इंदिरा आईला अशोकच्या ओरडण्याचा आवाज ऐकू येताच ती मुलीला घेऊन घटनास्थळी आली. तेथे पिल्ला आत्राम, प्रमोद सडमाके, मयुरी सडमाके व मयुरीची आई घटनास्थळी हजर होते. हे सर्वजण अशोकला मारहाण करीत होते. मारहाणीपासून अशोकला सोडविण्यासाठी आई गेली असता मयुरीच्या आईने इंदिराच्या डाव्या पायावर काठीने मारहाण केली. अशोकला पिल्ला आत्राम व प्रमोद सडमाके हे हातापायाला, पाठीला, कमरेला व पोटाला मारहाण करीत होते. अशोकला मारहाणीपासून वाचवा अशी वृध्द आई तेथे जमलेल्या लोकांना विनंती करीत होती. परंतु जमावातील एकही व्यक्ती तिच्या मदतीला धावून आली नाही. निमुटपणे उघडया डोळयांनी तो प्रकार जमाव बघत होता व आनंद घेत होता. त्यामुळे नाईलाजास्तव वृध्द आईने मार खात अशोकला मारहाणीतून सोडवून घरी आणले. अशोकने अंगावरील कपडे काढून दुसरे कपडे घातले व मी आता घरी राहत नाही असे सांगून निघून गेला. यानंतर वृध्द इंदिराने नागभीड पोलीस स्टेशनला घडलेल्या घटनेची सविस्तर माहिती दिली. त्यानुसार नागभीड पोलीसांनी तपास करुन प्रमोद सडमाके (३५), पिल्ला आत्राम (२०), मयुरी सडमाके (२८), चंद्रकला आत्राम(५५), सिताराम सडमाके (६५) या पाच आरोपींना ताब्यात घेऊन त्यांचे विरुध्द जादूटोणाविरोधी कायदा कलम ३(२) सह भादंवि कलम १४३, १४७, १४८, १४९, ४५२, ३२४, ३४२, ३६३, ३६८, ३२३ अन्वये गुन्हा दाखल केला. अशोक कामठे हा त्याला झालेल्या जबर मारहाणीला घाबरुन फरार झाला. यापूर्वी अशोकला जादूटोण्याच्या संशयावरुन दोन वेळा मारहाण याच लोकाकडून झाली होती. पोलिसांनी शोध घेऊन अशोकला घटनेनंतर ९ दिवसांनी त्याच्या आईच्या स्वाधीन केले. या घटनेमुळे गावात अशोकला शोधेपर्यंत पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त होता. जिल्हा पोलीस अधिक्षक अरविंद साळवे, ब्रम्हपुरीचे उपविभागीय पोलीस अधिकारी मिलिंद शिंदे याचे मार्गदर्शनाखाली नागभिडचे ठाणेदार प्रमोद मडामे यांनी योग्यरित्या हे प्रकरण हाताळले.

**जादुटोण्यामूळे कॅन्सर झाल्याच्या संशयावरुन चंद्रपूर येथील कुटुंबाला बेदम मारहाण.**

मारहाण करणारे व पीडित हे सख्खे नातेवाईक. मिंडाळाच्या घटनेनंतर लगेच ४

दिवसांनी ४ सप्टेंबर २०२१ ला चंद्रपूर शहरातील भिवापूर परिसरात जादुटोण्याच्या संशयावरुन मारहाणीचे प्रकरण घडले. वणी खुर्द आणि मिंडाळा येथील जादुटोण्याच्या संशयावरुन झालेल्या जबर मारहाणीच्या घटनांची शाई ओली असतांनाच चंद्रपूर महानगरात ही घटना घडल्यामुळे खळबळ उडाली. या घटनेतील पीडित कुटुंबियांची महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समितीचे जिल्हा कार्याध्यक्ष पी. एम. जाधव, जिल्हा सचिव नारायण चव्हाण व उपाध्यक्ष कैलास गर्गेलवार यांनी भेट घेऊन विचारपूस केल्यानंतर मिळालेल्या माहितीनुसार चंद्रपूरातील भिवापूर परिसरात लाल बहादूर शाळेजवळ पडदेमवार कुटुंबीय राहत आहेत. मांत्रिकाचे सांगण्यावरुन राम पडदेमवारचे मोठे भाऊ नारायण पडदेमवार यांनीच करणी केल्यामुळे राम पडदेमवार कॅन्सरने आजारी पडले असा आरोप करुन पूजा नारायण पडदेमवार व तिचे आईवडील व भाऊ यांना चंद्रपूर येथील भिवापूर परिसरात आरके चौकाजवळ राम पडदेमवार यांनी मारहाण केली. हे दोघे भाऊ शेजारीशेजारीच राहतात. राम पडदेमवार यांच्या नातेवाईकांनी मारहाण केली. या घटनेबाबत पूजा पडदेमवारने शहर पोलीस ठाण्यात केलेल्या तक्रारीवरुन पोलीसांनी चौकशी करुन आशालू पडदेमवार (राम व नारायण यांचे वडील) नरसिंग पडदेमवार, राम पडदेमवार, सिनु रादंडी, मदनुबाई रादंडी, रवी आशावार, मंगेश पडदेमवार व मांत्रिक यांना जादूटोणाविरोधी कायदा कलम ३ (२) नुसार तसेच भादंवि कलम १४३, १४७, १४९, ३२३ व ५०४ अन्वये गुन्हा दाखल करुन अटक केली. राम पडदेमवारचे १० सप्टेंबरला कॅन्सरने निधन झाल्याचे कळते. चंद्रपूर शहर पोलीस स्टेशनचे ठाणेदार सुधाकर अंभोरे यांच्या मार्गदर्शनात पुढील तपास सुरु आहे.

**मोहाडी (मो.) येथे जादुटोण्याच्या संशयावरुन इसमास मारहाण**

चंद्रपूरातील तिसऱ्या घटनेनंतर लगेच ३ दिवसांनी नागभीड तालुक्यातील मोहाडी (मोकासा) येथे मिंडाळानंतर दुसरी घटना घडली. दिलीप सिताराम वाघ (४९) हे घरी दरवाज्यात बसले असता विकास गजभे दिलीपच्या घरी आले. तू माझे मोठे भाऊ वैभववर जादू केली असा आरोप करुन,दिलीपला शिवीगाळ करुन चपलेनी गालावर मारल्यामुळे सदर प्रकरणी नागभीड पोलीस स्टेशन मध्ये तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलीसांनी जादूटोणाविरोधी कायदा कलम ३(१) व ३(२) सह भादंवि कलम ३२३, ४५२ व ५०४ अन्वये विकास गजभेवर गुन्हा दाखल करुन त्याला अटक केली. ही घटना घरगुती जुन्या वादातून घडल्याचे कळते.

■ ■ ■

# सार्वजनिक दायित्वाची जाणीव करुन देणारी जनहितार्थ याचिका



गोविंद पाटील
९८२२९ ५५०५९

भारतीय राज्यघटनेत ज्यांचा उल्लेख मूलभूत हक्क म्हणून केलेला आहे अशा सर्व हक्कांच्या संरक्षणासाठी व्यापक सामाजिक हित लक्षात घेऊन कुणीही नागरिक उच्च किंवा सर्वोच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करू शकतो. यालाच ‘ जनहितार्थ याचिका‘ असे म्हणतात. जनहितार्थ याचिका दाखल करण्याचा मूलभूत अधिकार प्रत्येक नागरिकाला आहे. सार्वजनिक न्याय मागण्याचा अतिशय प्रभावी उपाय म्हणून जनहितार्थ याचिका या पर्यायाकडे आज पाहिले जाते.

भारतीय राज्यघटनेने न्यायालयांना घालून दिलेल्या सार्वजनिक दायित्वाची जाणीव करुन देण्याचाच एक भाग म्हणजे जनहितार्थ याचिका आहे. १९८० च्या दशकामधे भारतात 'जनहितार्थ याचिका' (पब्लिक इंटरेस्ट लिटिगेशन) या संकल्पनेचा उदय झाला व मोठ्या प्रमाणात वापरही सुरु झाला. ही जनहित याचिकेची प्रक्रिया, भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे सतरावे मुख्य न्यायाधीश पी. एन. भगवती व न्यायमूर्ती कृष्णा अय्यर यांनी प्रस्थापित केली. न्यायव्यवस्थेला लोकाभिमुख करण्याच्या त्यांच्या अनेक उपाययोजनांपैकी ही एक महत्वाची व क्रांतिकारी ठरलेली प्रक्रिया आहे. जनहितार्थ याचिकेच्या माध्यमातून गरीबांतील गरीब व्यक्तीसाठी न्यायव्यवस्था खुली करताना त्यांनी न्यायिक प्रक्रियेतील सामान्यांचा लोकसहभाग वाढवण्याची प्रक्रिया सुरु केली.

भारतीय राज्यघटनेत ज्यांचा उल्लेख मूलभूत हक्क म्हणून केलेला आहे अशा सर्व हक्कांच्या संरक्षणासाठी व्यापक सामाजिक हित लक्षात घेऊन कुणीही नागरिक उच्च किंवा सर्वोच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करू शकतो. यालाच जनहितार्थ याचिका असे म्हणतात. जनहितार्थ याचिका दाखल करण्याचा मूलभूत अधिकार प्रत्येक नागरिकाला आहे. सार्वजनिक न्याय मागण्याचा अतिशय प्रभावी उपाय म्हणून जनहितार्थ याचिका या पर्यायाकडे आज पाहिले जाते.

**जनहितार्थ याचिका कोण-कोणत्या प्रकरणांमधे दाखल करता येऊ शकते?**

ज्या गोष्टी सरकारने व शासकीय व्यवस्थेने करणे कायदेशीररित्या गरजेचे असते, पण त्या गोष्टी करण्यामधे टाळाटाळ करणे, मुद्दाम जबाबदारी झटकणे, कामचुकारपणा करणे किंवा स्वतःच्या कायदेशीर अधिकार कक्षा ओलांडून वागणे अनुभवास येते; तेव्हा त्या विरोधात दाद मागण्याचा 'जनहितार्थ याचिका' हा मार्ग आहे.

**जनहितार्थ याचिका कोणाविरुद्ध करता येते?**

आपल्या कायद्यानुसार साधारणतः मूलभूत हक्क किंवा व्यापक मानवी हक्क उल्लंघनासाठी, राज्यशासन, केंद्र सरकार किंवा सरकारशी संबंधित कोणत्याही यंत्रणेविरोधात जनहितार्थ याचिका दाखल करता येते. सर्वसाधारणपणे खाजगी व्यक्तिविरोधात जनहितार्थ याचिका दाखल करता येत नाही. राज्यघटनेतील सहभाग व अस्तित्व लक्षात घेऊन जनहितार्थ याचिकेमध्ये सरकार किंवा सरकारी

यंत्रणेलाच प्रतिवादी करता येते. उदा. एखादी खाजगी संस्था त्यांच्या कारखान्यामुळे विविध प्रकारचे प्रदूषण करते आहे. अशावेळी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि त्यासोबत त्या खाजगी कारखान्याला प्रतिवादी करुन जनहितार्थ याचिका दाखल करता येते. जनहितार्थ याचिका केवळ खाजगी संस्थेविरोधात करता येत नाही. जनहितार्थ याचिकेची दखल घेण्याचे अधिकार उच्च व सर्वोच्च न्यायालयांना आहेत. साधारणतः राज्यशासनाशी संबंधित विषय असल्यास उच्च न्यायालयात याचिका दाखल केली पाहिजे व केंद्र शासनाशी संबंधित असल्यास सर्वोच्च न्यायालयात.

भारतातील उच्च व सर्वोच्च न्यायालयात याचिका म्हणजे 'कोर्ट ऑफ इक्विटी' आहेत. 'कोर्ट ऑफ इक्विटी' म्हणजे ही समन्यायिक तत्त्वावर चालणारी न्यायालये आहेत. त्यामुळे सर्वांना समानतापूर्ण, समतेच्या आधारावर व्यापक व पूर्ण न्याय देण्यासाठी कायद्याचे घटनेला अपेक्षित असे न्याय्य व विवेकपूर्ण अन्वयार्थ काढण्याचे अधिकार उच्च व सर्वोच्च न्यायालयाला असल्याने जनहितार्थ याचिका याच दोन वरिष्ठ न्यायालयांमधे दाखल करता येतात.

सर्वांना न्याय मिळाला पाहिजे या संकल्पनेवर आधारित जनहितार्थ याचिकेमुळे व्यापक न्याय मिळण्याच्या संकल्पना भारतात १९८० च्या दशकात जोरदारपणे प्रत्यक्षात येताना दिसायला लागल्या. पण काही लोकांनी या शस्त्राचा विवेकशून्य व बेलगाम वापर सुरु केल्याने जनहितार्थ याचिकांवर टीका व्हायला लागली. त्यामुळे खुप जाणतेपणाने, जवाबदारीने जनहितार्थ याचिका या 'लोकशाही अस्त्राचा' वापर केला गेला पाहिजे.

**याचिकेमध्ये खरोखरच जनहिताचा मुद्दा आहे किंवा नाही यावर निर्णय कसा घेतला जातो?**

याचिकेमधे नमूद केलेल्या घटना व परिस्थिती तसेच कागदपत्रे तपासून सद्सद्विवेक व न्यायबुद्धीच्या आधारे याचिकेतील जनहितार्थतेची खात्री पटवून घ्यावी लागते. परंतु 'विशिष्ट रक्कम आधी न्यायालयात जमा करा व नंतरच आम्ही याचिकेतील जनहिताचा मुद्दा तपासू किंवा पुढील कार्यवाही करू' असे सांगणे सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्वात बसत नाही. कुणाजवळ अग्रीम खात्री रक्कम भरण्यासाठी पैसा नाही किंवा एखाद्या सामाजिक संस्थेजवळ निधी नाही म्हणून त्यांच्या याचिकेत जनहितार्थ मुद्दाच नाही असा अर्थ काढणे अन्यायाचे ठरेल. न्यायव्यवस्था केवळ श्रीमंतांची मिरासदारी बनू नये, असेच कायदा मानतो.

**उच्च किंवा सर्वोच्च न्यायालयाला पाठविलेले एखादे पत्र जनहितार्थ याचिका म्हणून ग्राह्य धरले जाऊ शकते का?**

एका मोठ्या दुर्लक्षित, असंघटित वर्गावर, अन्याय होत असेल किंवा कोणा एखाद्या व्यक्तीचेच दुःख किंवा वेदना या प्रातिनिधिक स्वरूपाच्या असतील तर अशा पत्रांची दखल जनहितार्थ याचिका म्हणून घेता येते. न्यायमूर्ती व्ही. आर. कृष्णा अय्यर यांनी तर कारागृहांमधून आलेल्या कैद्यांच्या पोस्टकार्डांची दखल घेऊन त्या पोस्टकार्डांनाच याचिकेत रूपांतरित करून मूलभूत हक्क रक्षणाबाबतचे अनेक महत्वाचे न्यायनिर्णय दिलेले आहेत.

**याचिका पत्र (लेटर-पिटिशन) आणि जनहितार्थ याचिका(पब्लिक इंटरेस्ट लिटिगेशन) यामधे काय फरक आहे?**

जर दोन्हींमधे व्यापक जनतेच्या हिताचा मुद्दा असेल तर त्या अर्थाने फरक नाही. याचिका पत्र ही अत्यंत कमी खर्चामधे जनहितार्थ मुद्दे न्यायव्यवस्थेसमोर आणण्याची एक उत्तम लोकशाहीपूर्ण प्रक्रिया आहे. साधे पत्र लिहून न्यायव्यवस्था कार्यान्वित करण्याच्या घटनात्मक

अधिकारांचे हे एक उदाहरण आहे. विषयाची नीट मांडणी करुन उच्च किंवा सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींना पत्र लिहायचे आणि ते रजिस्टर पोस्टाने पाठवून द्यायचे. काही महिन्यांमधे त्याची दखल घेण्यात आली तर आपल्याला पोस्टानेच कळवले जाते.

याचिका पत्रांची दखल घेतलीच जाईल याची तसेच दखल घेण्यास किती दिवसांचा कालावधी लागेल याची कोणतीच खात्री देता येत नाही. न्यायमूर्तींसमोर जनहितार्थ याचिका दाखल करणे, हा पर्याय अनेकजण निवडतात.

मा. सर्वोच्च न्यायालयाने जनहितार्थ याचिकेसंबंधी काही मार्गदर्शक तत्वे घालून दिली आहेत. जसे की न्यायालयाने प्रामाणिक व विशुद्ध हेतूने प्रेरित याचिकांना प्रोत्साहन दिले पाहिजे. तसेच अप्रस्तुत उद्देश किंवा वैयक्तिक हेतु साध्य करण्यासाठी दाखल होणाऱ्या याचिकाकर्त्यांना कठोर दंड केला पाहिजे. न्यायालयाने याचिकाकर्त्याची विश्वासार्हता, खरेपणा तपासला पाहिजे आणि याचिकाकर्त्याला खरोखरच जनहित साधायचे आहे की स्वार्थ साधायचा आहे? याचीही शहानिशा केली पाहिजे, असे मार्गदर्शक तत्वात सांगितले आहे. याचिका दाखल करण्याचा उद्देश उदात्त आणि पवित्र असायला हवा, याचिकाकर्त्याला अज्ञानीपणाचा मुखवटा लावता येणार नाही, असा स्पष्ट निर्वाळा मा. सर्वोच्च न्यायालयाने 'स्टेट ऑफ उत्तरांचल विरुद्ध बलवंतसिंग २०१० (१) महाराष्ट्र लॉ रिपोर्टर' या प्रकरणात नोंदवला आहे.

प्रमाणिकता व सत्यनिष्ठा यांच्या आधारावर सर्व व्यवस्थांचा वापर करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. जनहितार्थ याचिका दाखल करताना त्या विशिष्ट विषयाचा सखोल अभ्यास असणे, काही आवश्यक आकडेवारी उपलब्ध असणे, माहितीच्या अधिकाराखाली काही माहिती काढलेली असणे नेहमीच परिणामकारक व उपयोगी ठरते. जनहितार्थ याचिकांच्या अधिकार वापरातून नवसमाज निर्माणाची व व्यवस्था परिवर्तनाची अनेक कामे करता येतात.

■ ■ ■

## प्रश्न तुमचा उत्तर आमचे



उत्तम जोगदंड
९९२०१ २८६२८

**प्रश्न:**

**महा. अंनिसचा विरोध फक्त हिंदूंच्याच अंधश्रद्धांना, सणावारांना का? अन्य धर्मातील अंधश्रद्धा यांना दिसत नाहीत काय?**

**उत्तर:**

हा प्रश्न अंनिस विरोधकांकडून अत्यंत खोचकपणे गेल्या कित्येक वर्षांपासून वारंवार विचारला जातो आहे. त्यावर स्वतः शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनी योग्य उत्तर वेळोवेळी दिले आहे. तरीही हा प्रश्न पुन्हा पुन्हा विचारला जातोच. त्यामुळे त्याचे उत्तर पुन्हा एकदा वेगवेगळ्या अंगाने विश्लेषण करून देणे आवश्यक आहे.

**महा. अंनिसच्या विचार व संघटना मार्गदर्शिकेत या बाबत पुढील मुद्दे मांडले आहेत:**

❶ हा आरोप पूर्णपणे खोटा आहे. महा. अंनिस सर्व धर्मातील अंधश्रद्धांना विरोध करते. याची उदाहरणे संघटनेच्या विविध प्रकाशनांत मिळतात.

❷ भारतात जवळपास ८२% लोक हिंदू असल्याने, बहुसंख्य प्रकरणे हिंदूंचीच आहेत.

❸ जातीप्रधान पाच हजार वर्षे जुन्या हिंदू धर्मात असंख्य देव, अनेक धर्मग्रंथ आहेत. त्या तुलनेत इस्लाम आणि ख्रिश्चन धर्मात एकच परमेश्वर, एकच प्रेषित (वा पुत्र), एकच धर्मग्रंथ यामुळे हिंदू धर्मात अंधश्रद्धा अधिक असण्याची शक्यता आहे.

❹ धर्माची परखड चिकित्सा करणारे समाजसुधारक हिंदू धर्मात आहेत.

❺ समितीचा हिंदू कार्यकर्ता स्वतःला कोणत्याही धर्माचा मानत नाही; पण प्रत्यक्षात तो हिंदू आई-बापाच्या पोटी जन्माला आल्याने (व त्याने जाहीरपणे धर्म न बदलल्याने) तो कायदेशीर अर्थाने हिंदूच असतो. म्हणून हिंदू धर्मातील अंधश्रद्धांवर बोलण्याचा त्याला पूर्ण अधिकार आहे. हिंदू धर्माबाबत कोणी काय बोलावे, याचा मक्ता स्वयंघोषित हिंदू धर्मरक्षकांना देण्याची गरज नाही.

वरील स्पष्टीकरण वेळोवेळी दिलेले असताना सुद्धा वारंवार हा प्रश्न पुन्हा उपस्थित केला जातो. आता या प्रश्नाचे विश्लेषण करू या.

महा. अंनिसचा विरोध फक्त हिंदूंच्याच अंधश्रद्धांना का? या प्रश्नाचा अर्थ असा होतो की हिंदूमध्ये अंधश्रद्धा आहेत हे प्रश्नकर्त्यास मान्य आहे. मग त्या अंधश्रद्धा दूर करायला नकोत का? वर उल्लेख केल्याप्रमाणे महा. अंनिस सर्वच धर्मांतील अंधश्रद्धांना विरोध करते. महा. अंनिसच्या पुढाकाराने पारित करण्यात आलेला जादूटोणा विरोधी कायदा पाहील्यास लक्षात येईल की, हा कायदा महाराष्ट्रातील सर्वच लोकांसाठी लागू आहे. तो फक्त हिंदूंसाठी लागू आहे. असे काहीही नाही. असे असताना सुद्धा फक्त हिंदूंच्याच अंधश्रद्धांना का? हा प्रश्न प्रश्नकर्ता किती गोंधळलेला आहे, हे दाखवून देतो.

प्रश्नकर्त्याचे म्हणणे असे असल्याचे दिसते की दुसऱ्या धर्मात अंधश्रद्धा आहेत त्याला महा. अंनिस विरोध का करीत नाही. विशेष म्हणजे, महा. अंनिसने कारवाई केलेल्या बाबांमध्ये सुमारे ३०-३५

टक्के बाबा हे मुस्लिम धर्मीय आहेत. परंतु आता पर्यंत महा. अंनिसवर मुस्लिम लोकांपैकी कोणीही असा आरोप केला नाही की महा. अंनिसवाले आमच्या धर्माच्या बाबांवर का कारवाई करतात? दुसरे असे की या मुस्लिम बाबांचे बहुसंख्य भक्त (आणि पीडित) हे हिंदूच असतात. या मुस्लिम बुवांचा भांडाफोड करताना काही वेळेला महा. अंनिस कार्यकर्त्यांना या हिंदू भक्तांचा मार देखील खावा लागला आहे. अशा वेळी कोणीही हिंदुत्ववादी या मुस्लिम बाबांना पकडून देण्यासाठी पुढे आला नाही किंवा या मारहाणीचा निषेध देखील त्यांनी केल्याचे ऐकिवात नाही. स्वतःच्या धर्मातील अंधश्रद्धा दूर करण्यासाठी काही करायचे नाही आणि दुसऱ्या धर्माकडे बोट दाखवायचे. तसेच दुसऱ्या धर्मातील अंधश्रद्धा दूर करण्यासाठी सुद्धा काहीही करायचे नाही, दुसरे काम करतात त्यात अडथळे आणायचे. या अशा वृत्तीमुळे हिंदु धर्मरक्षकांचा दावा दुटप्पीपणाचा वाटतो.

या प्रश्नकर्त्यांचा रोख असा असतो की आधी दुसऱ्या धर्मातील अंधश्रद्धा दूर करा मग हिंदूंच्या अंधश्रद्धांबद्दल बोला. आपल्या धर्मात अंधश्रद्धा आहेत हे मान्य असलेला प्रश्नकर्ता असा रोख ठेऊन हेच सिद्ध करू इच्छितो की आपल्या पाच हजार वर्षे जुन्या धर्मातील अंधश्रद्धा निर्मूलनाचा, सुधारणांचा आधार केवळ दोन हजार वर्षे जुना ख्रिश्चन धर्म आणि चौदाशे वर्षे जुना मुस्लिम धर्म आहे. हिंदू धर्माला विश्वगुरू मानणारा प्रश्नकर्ता आपल्या धर्मात सुधारणा करून, अंधश्रद्धा दूर करून अन्य धर्मांसमोर आदर्श उदाहरण घालून देण्याऐवजी दुसऱ्या धर्मातील अंधश्रद्धा कधी दूर होतात, याची वाट पहात आहे. हे दृश्यच त्याच्या ' विश्वगुरू' धर्माचे अवमूल्यन करणारे आहे. आपण आपल्या धर्माला कुठे आणून ठेवतो आहोत याचे भान सुद्धा या प्रश्नकर्त्यास नाही, याचे आश्चर्य वाटते.

हिंदू धर्मात हजारो 'उच्च-नीच' जातींची उतरंड आहे. असंख्य देव-देवता आहेत. भूतांचे विविध प्रकार आहेत. जादूटोण्याचे-करणी-भानामतीचे प्रकार आहेत. त्यानुसार एवढ्या वेगवेगळ्या अंधश्रद्धा, प्रथा, रूढी, परंपरा आहेत की त्यांची मोजणी करणे कठीण जावे. हे अंधश्रद्धांचे प्रचंड मोठे आगारच आहे. त्यामुळे इथे अंधश्रद्धा निर्मूलन आणि अनिष्ट रूढी-परंपरांमध्ये कालानुरूप बदल होणे अत्यंत गरजेचे आहे. विशेषतः एकविसाव्या शतकात जग आपल्यातील विविध अंधश्रद्धांना दूर सारून, वैज्ञानिक प्रगतीची नवनवीन शिखरे गाठत असताना आपण मात्र अन्य धर्मातील अंधश्रद्धांकडे बोट दाखवून देशाला, देशातील जनतेला भूतकाळात रमविणे, हे देशाच्या प्रगतीसाठी घातक आहे.

सर्वच धर्मातील सण, रूढी, प्रथा, परंपरा यांचा महा. अंनिस आदर करते. परंतु या रूढी, प्रथा, परंपरा, सण यातील अनिष्ट बाबींना मात्र महा. अंनिसचा विरोध असतो. महा. अंनिस केवळ विरोध करत नाही तर त्यासाठी कालसुसंगत पर्याय सुद्धा देते. उदा. गणपती उत्सवात पर्यावरणपूरक गणपती (जो उपक्रम आता महाराष्ट्र सरकारच राबवते. तसेच हिंदू धर्माचे तारणहार नरेंद्र मोदी यांनी देखील पर्यावरणस्नेही गणेशोत्सवाचे आवाहन यापूर्वीच केले आहे), फटाकेमुक्त दिवाळी आणि नववर्ष, बकरी ईदला रक्तदान शिबीर, ३१ डिसेंबरला व्यसनमुक्ति अभियान, वगैरे. विशेष म्हणजे या सर्व उपक्रमांना सर्वच धर्मीय जनतेकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे.

तर, फक्त आमच्याच धर्मातील अंधश्रद्धांना, प्रथा-परंपरांना विरोध का? हा प्रश्न गैरसमजावर आधारित, दुटप्पीपणाचा आहे. खरे तर हिंदू धर्म कालानुसार बदलला आहे, बदलत आहे तो संत, समाज सुधारक, संघटना यांनी

**(उर्वरीत मजकुर पृष्ठ क्र. ४१)**

# देवदेवस्कीची बाधा लिंबातून निघे धागा



मच्छिंद्रनाथ मुंडे
९९६९४ ७३७०२

मयेकरांची चेडु तेजू, गेल्या दोन महिन्यापासून जरा विचित्र वागू लागली होती. एकेदिवशी शाळेतून घरी आली आणि न जेवताच झोपी गेली. खूप वेळ झाली तरी जाग आली नाही म्हणून पप्पानी उठण्याचा प्रयत्न केला, तेव्हा जागे होताच ती जोराने खेकासली. आईने चहा देण्याचा प्रयत्न केला, तर तोही तिने नाकारला. मग शाळेला दांडी मारून, अभ्यासात लक्ष न देणे, जेवणावरिल इच्छा उडून जाणे, असं एकामागून एक घटना घडत होत्या. तेजू बाजुच्याच गावांतील हायस्कूलमध्ये नवव्या इयत्तेत शिकत होती. तेजूचे पप्पा रमेश मयेकर, आई पार्वती मायेकर यांनी शाळेमध्ये जाऊन थोडासा कानोसा घेतला. तेजूचे वर्गशिक्षक होते त्यांना रमेश मयेकर भेटले. तेजू बद्दल, अभ्यासातील प्रगतीबद्दल विचारले तेव्हा वर्गशिक्षक पांडे सर म्हणाले अभ्यासात ती शार्प आहे; परंतु आजकाल तीचे लक्ष लागत नाही. हे जेव्हा समजलं तेव्हा शेजारच्या तुळसा वहिनींनी दुसरीच शंका निर्माण केली, कदाचित तेजूला पारावरच्या खविसाने झपाटलं असेल म्हणून मग तिने लक्ष्या भक्ताकडे जाण्याचा सल्ला दिला. झाले, मग दुसऱ्या दिवशी सारेजण लक्ष्या भक्ताच्या दरबारात हजर. लक्षा भक्तांनी प्राथमिक चौकशी केली आणि लगेच उद्या सोमवती अमावस्या आहे. उद्या येताना १० लिंबू घेऊन या, त्यात एक चारधारी लिंबुही घेवुन, सकाळी आठवाजता, सोबत तेजूला घेवुन या. आपण विधी उरकुन घेवु. दुसऱ्या दिवशी सारेजण दहा लिंबू घेऊन दरबारात हजर. लक्षा भक्तांनी तेजूला पाटावर बसण्यापूर्वी हातपाय धुण्यास सांगितले. नंतर पायाला हळद कुंकू लावले आणि पाटावर बसवले व दुसऱ्या एका पाटावर आठ लिंबू मांडून ठेवले. एक लिंबू तेजूच्या तोंडात दिला व एक लिंबू हातात घेऊन पूजा सुरू केली. पंधरा-वीस मिनिटं लक्ष्या भगत अनेक भुतांची नावे घेऊन विधी करत होता. काही वेळानंतर त्याने पाटावरचे आठ लिंबू उचलले ते तेजुच्या डोक्यावरुन उतरविले आणि तेजूचे पप्पा रमेश मयेकर यांच्या हातात दिले आणि तोंडातील लिंबू काढुन पाटावर ठेवला व चारधारी लिंबू हातात घेऊन त्यातून धागा बाहेर काढला. धाग्याचे एक टोक तिच्या कानाला गुंडाळलं आणि तो लिंबू आईच्या हातात दिला आणि तांब्याभर पाणी तुळसाबाईच्या हातात दिले आणि जाताना सांगितलं की उलट्या पावलाने चालत जायचं. धागा जेथे संपेल तेथे गेल्यानंतर थांबायचं. आठ दिशांना आठ लिंबू फेकायचे आणि हा लिंबू तिथेच जमिनीत काढायचा, मग परत येताना सर्वांनी तांब्यातील पाण्यात हात पाय धुवुनच घरात प्रवेश करायचा, असं सांगून सर्वांना बाहेर पिटाळले. आता देवघरात फक्त लक्ष्या भगत आणि तेजू दोघेजणच होते. तेजूच्या कानात एकांतात लक्ष्या भगतांनी विचारले की, आता तेजू सांग, तुझ्या त्या प्रेमाचं नाव काय आहे? तू जर सांगितलं नाहीस, तर ही करणी त्याच्याकडे जाईल, मग तो घायाळ होऊन तुझ्यासारखाच आजारी पडेल. बिचारी तेजू घाबरून तिने पटकन तिच्या प्रेमविराचे नांव सांगितलं आणि मग तीने लक्ष्या भगताला विनंती केली की, काका तुम्ही त्याचे नांव बाबांना सांगू नका. जे काही करते ते सर्व मी थांबवते, असं म्हणताच लक्ष्या भगताचे काम फत्ते झालं! तोपर्यंत

दहा-बारा मिनिटानंतर सारी मंडळी घरात परत आली आणि मग लक्ष्या भक्तांनी तेजुला उठण्यापूर्वी विचारले की, आता तुझी सारी भूतबाधा नष्ट झालेली आहे. जाण्यापुर्वी लक्ष्या भगताने बिदागी म्हणून रमेश मयेकरांकडे काही रक्कमेची मागणी केली. रमेश मयेकरांनी ही रक्कम लक्ष्या भक्ताच्या हातात ठेवली आणि सारी मंडळी घराकडे निघणार तितक्यात भगताने पार्वती मयेकरांच्या कानात काहीतरी सांगितले. दुसऱ्या दिवसापासून तेजू नियमीत शाळेत जावू लागली. अभ्यासात लक्ष देवु लागली. मयेकरांची कन्या पूर्ण बरी झाली.

**रहस्यभेद:** या प्रसंगांमध्ये लिंबातुन धागा कसा निघाला? हे समजून घेण्यासाठी प्रत्यक्षात लिंबामध्ये असे धागे सुईनी ढकलता येतात हे माहीत असावं लागतं. लक्ष्या भक्तांनी चारधारी लिंबामध्ये अशा पद्धतीने काळा धागा सुईने आतमध्ये टाकलेला होता. त्यामुळे चारधारी लिंबू जो आणला होता तो बाजूला ठेवून, त्याने स्वतःचा लिंबू त्या लिंबामध्ये घुसवला होता. त्या आधारे त्यांनी तो धागा बाहेर काढला. जणू काहीतरी एक भयानक घडते आहे, असा भास त्यातून निर्माण झाला आणि मग त्या निमित्ताने लिंबातील धागा जेथपर्यंत जाईल तेथपर्यंत बाहेर तुम्ही जा, असं तेजूच्या घरच्या सर्व मंडळींना सांगितल. याचं दुसरं कारण असं होतं की, ज्या एकांतवासात लक्ष्या भक्ताला तेजूला काही बोलायचं होतं ते काम त्या एकांतवासात तेजूच्या कानात विचारुन पूर्ण केले. प्रेमविराचं नाव सांग, नाहीतर तुझी बाधा दूर होईल आणि मग ती बाधा त्या प्रेमवीराला त्रास देईल. असा दम देताच तेजूनी प्रेमविराचं नाव जितू सांगितलं आणि लक्ष्या भगताला घाबरुन विनंती केली की; असं तुम्ही काही करू नका, मात्र यापुढे असं मी काही करणार नाही असं वचन देते. लक्ष्याचे काम फत्ते झाले. त्याला हवं होतं ते साध्य झाले. येथे कोठेही काहीतरी चमत्कार घडला असं वाटण्याची गरज नाही. तेजू ही नववीमध्ये शिकणारी विद्यार्थिनी होती. म्हणजे तिचे वय चौदा-पंधरा वर्षे असेल. या वयामध्ये मुली आणि मुलं वयात येताना त्यांच्या मेंदूमधील रसायनांमध्ये बदल होतात. (harmonal changes) त्यामुळे अशा वेळी मनावर परिणाम होतो व लैंगीक भावना उत्तेजीत होतात. त्यातुन प्रेमाला वाट मोकळी करून दिली नाही, विचार सतत दाबुन ठेवण्याचा प्रयत्न केल्यास, मानसिकदृष्ट्या त्यांना अधिक त्रास होण्याची शक्यता असते. तेजूच्या बाबतीत तेच घडलं होतं. कारण घरी अत्यंत रागीट स्वभावाचे पप्पा आणि समजूतदार आई असताना देखील तिच्यावर प्रचंड बंधनं घातलेली होती. पण जेव्हा लक्ष्या भक्ताने आश्वासन दिलं तेव्हा तिला बरं वाटलं. तुला यापुढे घरातील कोणीही त्रास देणार नाहीत. तुझ्या आई पप्पाला मी समजून सांगतो. लक्ष्या भगतांनी ते काम केलं. एका बाजूला तिचे कामं फत्ते झालं आणि दुसऱ्या बाजूला लक्ष्याला बिदागी मिळाली.

■ ■ ■

**पृष्ठ क्र. ३९ या लेखाचा उर्वरीत भाग....**
**(प्रश्न तुमचा उत्तर आमचे )**

- केलेल्या कामामुळे, त्यागामुळे. या सुधारणांचे श्रेय मात्र हेच काही धर्मरक्षक लाटत असतात आणि आमचा धर्म कसा प्रगतीशील, परिवर्तनशील आहे हे एकीकडे सांगत असतात. तर, दुसरीकडे महा. अंनिस सारख्या संघटनांच्या अंधश्रद्धा निर्मूलन आणि व्यापक समाज परिवर्तनाच्या कार्याला कडाडून विरोध करत असतात. परंतु, सामान्य जनतेच्या लक्षात हे येऊ लागले आहे. त्यामुळे, असे घासून घासून गुळगुळीत झालेले प्रश्न उपस्थित करण्याऐवजी या धर्मरक्षकांनी प्रामाणिकपणे अंधश्रद्धा निर्मूलन आणि व्यापक सामाजिक परिवर्तनात लक्ष घालावे, हेच योग्य होईल.

■ ■ ■

# महाराष्ट्र अंनिस सोबतची माझी वाटचाल



सुधाकर तट
७५५९२ २०१०१

अज्ञान, दुःख आणि अगतिकता माणसाला दैववादाला शरण जाण्यास भाग पाडतात. वयाच्या सातव्या-आठव्या वर्षात प्रचंड आस्तिक, सर्व कर्मकांडं करणारा, उपास-तापास करणारा, भजन-किर्तनाला जाणारा आणि वार्षिक परीक्षा चुकवून ज्ञानेश्वरी पारायण करणारा माझ्यासारखा मुलगा जेव्हा तिसरीत नापास होतो, तेव्हा खाडकन भानावर येतो आणि जगण्यासाठी शिक्षण आवश्यक आहे आणि शिक्षणासाठी अभ्यासच करावा लागतो, हे उमगते. थोरांच्या इतिहासातील मूळ शंकराच्या कथेमध्ये स्वतःला शोधतो आणि मूर्ती पूजेतील व कर्मकांडातील फोलपणा समजतो. ही किमया, हे स्थित्यंतर माझ्या जीवनात फार लवकर घडले. अर्थात याला घरचे दारिद्र्य, घरची जगण्यासाठीची अत्यंत प्रतिकूल परिस्थिती, "जगायचे असेल तर शिका", "शिकणार असाल तर माझ्या जीवाची माती करून शिकवीन अन् शिकायचे नसेल तर माझ्यासोबत बराशी खोदायला चला", असे 'हा सूर्य हा जयद्रथ' हे आईचे तत्वज्ञान कारणीभूत झाले. तिसरीत नापास झाल्याने कदाचित आकलनक्षमता वाढली असावी आणि वाचलेले समजू लागले. त्यामुळे वाचनाची गोडी लागली आणि माझी विवेकी विचाराकडे वाटचाल सुरू झाली. आठवी-नववीच्या वयात स्टुडंट फेडरेशन ऑफ इंडिया(एसएफआय) या विद्यार्थी संघटनेच्या संपर्कात आलो. त्यामुळे माझ्या विवेकी विचारांच्या वाटचालीला गती मिळाली. डाव्या विद्रोही विचारांची बैठक पक्की झाली. भगतसिंगाचा नास्तिकवाद समजला आणि कृतीशील विद्रोही बनलो.

किराणा दुकानांमधून सामानासोबत आलेल्या वर्तमानपत्राचा कागद वाचत असताना एका बातमीने माझे लक्ष वेधले. सांगली मधील एक मांत्रिक भूत दाखवणार होता आणि अंधश्रद्धा निर्मूलन समितीने त्याला चॅलेंज केले होते आणि प्रत्यक्ष भूत दाखवण्यामध्ये तो अपयशी झाला, अशी काहीशी ती बातमी होती. त्यामुळे आपल्या विचाराचे काही लोक आहेत, अशी काही एक संघटना आहे, चळवळ आहे, आपण त्यात गेलं पाहिजे, असे मला वाटू लागले. साधारणपणे १९९२-९३ ला अंबाजोगाई येथील शासकीय डीएड कॉलेजमध्ये असताना सुनिल देशमुख या तरूणाने काही चमत्कार करून अंधश्रद्धा निर्मूलन समितीबद्दल माहिती सांगितली. त्यामुळे मला हव्या असलेल्या संघटनेत काम करायला मिळणार असल्याने मी त्याच्याकडे आकर्षित झालो आणि चळवळीत काम करण्याचे नक्की केले. त्यावेळी अंबाजोगाई येथील मा. संतराम कराड, मा. मनोहरराव काकडे सर इ. ज्येष्ठ कार्यकर्ते काम करत होते.

अंबाजोगाई शाखेत सुनील देशमुखसोबत काम करताना अंबाजोगाई शाखेच्या काही मर्यादा लक्षात आल्या. बीड जिल्ह्यात फक्त अंबाजोगाई येथेच सुरू असलेल्या कामाची व्याप्ती वाढविण्याची आवश्यकता होती. तसेच जिल्ह्यात इतरत्र शाखा काढणे गरजेचे वाटत होते. त्यामुळे केज येथे शाखा स्थापन करण्यासाठी सुनीलने डॉक्टर केंद्रे, खडबडे सर यांच्याशी संपर्क केला. त्या

निमित्ताने आम्ही मा. पां. न. निपाणीकर सरांना निमंत्रण दिले. निपाणीकर सर, माढ्याचे मा. विलास भाई शहा यांच्या उपस्थितीत केज येथे शाखा स्थापन केली आणि समितीच्या कामाच्या विस्तारीकरणाचे पहिले पाऊल टाकले.

लातूर शाखेप्रमाणेच अंबाजोगाई शाखा स्वयंपूर्ण झाली पाहिजे, यासाठी शाखेने गुंतवणूक करण्याचे ठरविले. त्यासाठी मी सातारा येथे जाऊन समितीची प्रकाशने आणावित असे ठरले. त्यानुसार थोरात सरांनी दिलेले दहा हजार रुपये घेऊन मी सातारला गेलो. त्यावेळी डॉ. दाभोलकरांना खूप आनंद वाटला. त्यांना माझे विशेष कौतुक वाटले. तसे त्यांनी कुमार मंडपे सरांना बोलूनही दाखविले.

परळी येथे झालेल्या मेळाव्यासाठी मध्यवर्तीकडून ज्येष्ठ कार्यकर्ते कॉ. बाबा आरगडे निरीक्षक म्हणून हजर होते. त्यांनी माझी बीड जिल्हा कार्याध्यक्ष म्हणून नियुक्ती केली आणि जिल्ह्यात महाराष्ट्र अंनिसचे काम वाढविण्याची जबाबदारी सोपवली. त्याच सुमारास गावात काम वाढवण्याची संधी मला मिळाली. मी बनसारोळा येथे नवीन शाखा सुरू केली. महाराष्ट्र विद्यालयातील काही सहकारी शिक्षक, शाळेचे मुख्याध्यापक आणि अंनिसचे ज्येष्ठ कार्यकर्ते मा. मनोहरराव काकडे सर यांच्या सहकार्याने बनसारोळा शाखेचे काम सुरू केले. काकडे सरांनी शाखेचे अध्यक्षपद स्वीकारून पाठिंबा दिला. ते उपक्रमशील असल्याने विविध उपक्रमात उत्साहाने सहभागी होत.

१९९७ साली मध्यवर्तीने प्रायोगिक स्तरावर मराठवाडास्तरीय भानामती प्रबोधन धडक मोहीम सुरू केली. त्यावेळी डॉक्टर दाभोलकर सरांनी निपाणीकर यांच्यासारखे ज्येष्ठ कार्यकर्ते साथीला देऊन रेणापूर तालुक्याची जबाबदारी माझ्यावर सोपविली. या मोहिमेमध्ये अनेक कार्यकर्ते तयार झाले. मी घडावा म्हणून सर मला भाषणाला पुढे करत. त्यामुळे माझा 'मन आणि मनाचे आजार' हा विषय तयार झाला. सोबतच सर्पविज्ञान व अंधश्रद्धा हा विषय तयार केला. प्रत्यक्ष साप जवळ ठेऊ लागलो. माझ्याकडे वीस-पंचवीस सापांचा संग्रह असे. सापांच्या प्रात्यक्षिकासह व्याख्याने करू लागलो. शिक्षक शिबिरे, शाळा-कॉलेज, अनेक गावातील विविध ठिकाणी या विषयावर व्याख्याने देऊन सापांबद्दल जनप्रबोधन केले. कालांतराने 'साप बाळगायचे नाहीत' असे सर्वानुमते ठरल्याने मी सापाशिवाय व्याख्याने देऊ लागलो.

विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन, मन - मनाचे आजार, फलज्योतिष, स्त्रिया व अंधश्रद्धा, विवेक, नीती याबद्दल सातत्याने मी जाणीव जागृती करत असे. त्यामुळे माझ्या काही विद्यार्थ्यांच्या व मित्रांच्या मदतीने जिल्ह्यातील टाकरवन, कळसंबर, येळम घाट इ. ठिकाणी नव्या शाखा उभारल्या. शाखेमार्फत सर्व कार्यकर्त्यांच्या सहकार्याने ग्रामसफाई करून 'पर्यावरण पूरक- कचऱ्याची होळी' हा पर्यावरण पूरक उपक्रम राबविण्यात आला. दि. १० सप्टेंबर २००० रोजी मी सारिका घुले यांच्याशी सत्यशोधक पद्धतीने बनसारोळा येथेच विवाह करण्याचे निश्चित केले. या विवाहाला डॉ. दाभोलकरांनी पूर्व नियोजित दौऱ्यामुळे उपस्थित राहता आले नसल्याची सल बोलून दाखविली. तरीही डॉक्टरांनी सातारहून उदय चव्हाण व प्रशांत पोतदर या दोन साथींना प्रतिनिधी म्हणून पाठवून दिले. शिवाय 'मानवलोक'चे बाबूजी व शैला भाभी यांनाही फोन करून सत्यशोधक विवाहाला उपस्थित राहण्याबद्दल आग्रहाने सांगितले. शिवाय लातूरची टीम पाचारण केली. यानंतर बनसारोळा शाखेच्या माध्यमातून आम्ही आणखी पाच सत्यशोधक विवाह लावले.

२००१ साली डॉ. दाभोलकरांचा बनसारोळा येथे विवेक जागराचा जाहीर व्याख्यानाचा

कार्यक्रम आयोजित केला. या कार्यक्रमाची पूर्वप्रसिद्धी केल्यामुळे आजूबाजूच्या परिसरातून सर्व वयोगटातील सुमारे दीड हजार श्रोता समुदाय उपस्थित राहिला. डॉक्टर दाभोलकर यांनी उपस्थित श्रोतावर्ग पाहून ऐनवेळी 'भूतबाधा, करणी, देवीचे अंगात येणे व मनोविकार आणि अंधश्रद्धा' असा विषय घेतला. त्यावेळी आम्हां कार्यकर्त्यांचे त्यांनी खूप कौतुक केले. सन २००२ साली विद्यार्थी, शिक्षक, ग्रामस्थ यांच्या मदतीने 'अंधश्रद्धा निर्मूलनाचा कायदा' होण्यासाठी सुमारे एक हजार पत्रे पाठविली. बनसारोळा शाखेने राज्य रक्त संक्रमण परिषद व महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रक्तदान शिबिरात असंख्य कार्यकर्त्यांनी रक्तदान केले. शाखेच्यावतीने अनेक वर्षे लोकविज्ञान दिनदर्शिकेची विक्री केली. बनसारोळासारख्या ग्रामीण भागात अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्राचे वर्गणीदार नोंदवून यथाशक्ती जाहिरातीचे संकलन केले तसेच अनेक गावांमधून प्रबोधन गीतांचा कार्यक्रम सादर केला.

चमत्कार सत्यशोधन यात्रेचा कार्यक्रम बनसारोळा येथे आयोजित केला. महाराष्ट्र अंनिसची दशकपूर्ती, द्विदशकपूर्ती, त्रिदशकपूर्ती, विवेक जागर कृती परिषद, अंधरूढीच्या बेड्या तोडा संकल्प परिषद, महिला परिषद, वैज्ञानिक दृष्टिकोनाचा शैक्षणिक जाहीरनामा परिषद, अधिवेशने, प्रशिक्षण शिबिरे, मेळावे यांच्या माध्यमातून सहभाग नोंदविला.



डॉ. दाभोलकरांचे संघटन कौशल्य, माणूस जोडण्याचे कसब, संभाषणशैली, वक्तृत्व, गुणग्राहकता या गुणांनी मी प्रभावित झालो आणि जवळजवळ अठ्ठावीस वर्षे महाराष्ट्र अंनिस सोबत वाटचाल करत आहे. चळवळीतील कामाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक ग्रंथालयाचा 'आदर्श शिक्षक' पुरस्कार, 'वार्तापत्र साथी' पुरस्कार आणि अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्राचा 'कृतज्ञता पुरस्कार' मला मिळवून दिले. अनेक कामांचे तपशील आज आठवत नाहीत. डॉ. दाभोलकर नेहमी म्हणत 'आपण काम करतो; पण आपण त्याचे टीपण ठेवत नाही', ते माझ्याबाबत जास्त खरे आहे. अंनिसमध्ये काम करत असल्याचा आज मला सार्थ अभिमान वाटतो.

■ ■ ■



# संविधानाच्या स्वप्नातलं गाव



पूजा आकोटकर
९४२०७ ११७२०

परिवर्तनवादी चळवळीतील कवी डॉ. सुभाष वाघमारे यांचा ' संविधानाच्या स्वप्नातलं गाव' हा पहिला कवितासंग्रह. 'अंत:करणातील भावनांचा सहजोद्रेक म्हणजे कविता', असे वर्डस्वर्थने म्हटले आहे. हे खरे असले तरी केवळ सहजोद्रेक म्हणजे कविता नव्हे, तर त्यामागे कवीचे दीर्घ परिश्रम, चौफेर वाचन, चिंतन, मनन असते. कवी सुभाष वाघमारे यांनी जे भोगले, पाहिले, अनुभवले तेच आपल्या कवितेतून प्रतिबिंबित केले.

'संविधानाच्या स्वप्नातलं गाव' मध्ये कुण्या एका गावाचे चित्रण नाही, तर देशातील संबंध गावाचे एक प्रातिनिधिक चित्र उभे केलेले आहे. गावागावातल्या विषम व्यवस्थेवर भाष्य करणारी ही कविता, संविधानमूल्यांच्या प्रस्थापनेसाठी गावाने एक व्हावे, एकात्म व्हावे, असा संदेश देते. स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय ही संविधान मूल्ये गावोगावच्या वेशीत प्रामाणिकपणे रूजली नाहीत, रूजवली नाहीत. परिणामी गावागावात दलित-सवर्ण संघर्ष वाढीस लागला. गुलामगिरीची मुळे अधिक खोलवर पसरू लागली. हुकूमशाही, संरजामशाही वाढीस लागली. अत्याचारी, बलात्कारी वृत्ती फोफावू लागली. या सर्वांचा एकत्रित परिणाम समाज जीवनावर झाला. आज गावोगावचा अल्पसंख्यांक समाज अस्वस्थ आहे, असुरक्षित आहे. हीच गोष्ट कवीच्या मनाला बेचैन करते. गावातली विषम व्यवस्था जाऊन, संविधान मूल्यांवर आधारित गावाची रचना व्हावी, हे कवीचे स्वप्न आहे.

'कविता केवळ भास नसतो
कवीचा श्वास असतो
अंतरीचा ध्यास असतो
वेचल्या दिसांचा ठेवा असतो'

या सामर्थ्याच्या जोरावरच कवी समाज परिवर्तनाची हाक देतो. प्रस्तुत कवितासंग्रहात १२१ कविता समाविष्ट आहेत. सामाजिक, राजकीय, आर्थिक, वैचारिक, सांस्कृतिक, कौटुंबिक आणि वैज्ञानिक जाणिवा त्यांच्या कवितेतून प्रामुख्याने आढळतात. वाघमारे यांच्या कवितेचा विचार करताना त्यांचे बहुआयामी व्यक्तिमत्त्व डोळ्यासमोर उभे राहते. लोकसंपर्क, सूक्ष्म निरीक्षण, आकलन, चिंतन, जीवनातील व्यापक अनुभव, संयत व सर्वसमावेशक दृष्टी, विश्वकल्याणाची आकांक्षा व वृत्तीतील सच्चेपणा त्यांच्या कवितेतून ठळकपणे प्रतिबिबिंत होतो.

'कायद्याचा अंमल नाही
डाकूंचा माल आहे
इथे मात्र शोषित रोज
भुका नि कंगाल आहे'

अस्वस्थ समाजाचं हे सखोल चिंतन मांडणारी कविता संविधान मूल्यांची गरज आणि उपयुक्तता जाहिरपणे अधोरेखित करते. कवीवर बुध्द, कबीर, फुले, शाहू, आंबेडकर, दाभोलकर अशा अनेक मानवतावादी विचारवंतांचा प्रभाव आहे. परंतु या विचारवंतांच्या कार्याकडे, विचारांकडे होत असलेले दुर्लक्ष कवीला संताप आणणारे आहे. आजचे परिवर्तनवादी वातावरण हा केवळ देखावा आहे. म्हणून कवी म्हणतो,

'श्रीखंड बासुंदीकडे
धावणारा परिवर्तन प्रकार
आम्हाला खुळं करून
बुळं बनवणारी प्रसारमाध्यमे
चविष्ट समीक्षा करणारे समीक्षक
बाबा ! तुमच्या जयंतीची जत्रा करतात काहीजण !
वर्गणी काढून निघावा देवीचा छबिना तशीच ही रीत'

परिवर्तनवाद्यांची सद्यस्थिती, दिशाभूल करणारी खूळचट माध्यमे आणि मोठमोठाल्या शब्दांची भलावण करून समीक्षेची चेष्टा करणाऱ्या समीक्षकांचा कवी खरपूस समाचार घेतो. गावागावात वाढत चाललेले मानवी क्रौर्य, जातिप्रधान व्यवस्था, व्यसनाधिनता, अनिष्ट प्रथा, सामाजिक, राजकीय, आर्थिक विषमता नष्ट करून कवीला गाव बदलायचा आहे. जात, पात, लिंगभेद, वर्ण, वर्ग, गरीब-श्रीमंत हा भेद नष्ट करून गावाला समानतेच्या प्रकाशात आणायचे आहे, म्हणून कवी म्हणतो,

'पडावा जोरात समतेचा पाऊस
अन् गावाचा मळ जावाच धुवून
उमलावी जशी मोगऱ्याची फुले
तशीच घडवीन मी परिवर्तवादी मुले'

गाव समतेच्या वाटेवर चालावा, गावात परिवर्तनाचा जागर घालणारी मुले उमलावीत हा कवीचा ध्यास आणि अट्टाहास आहे. हे सगळं घडावं यासाठीच हा काव्यप्रपंच आहे. वाघमारे प्रेमातील अस्वस्थताही तितक्याच संवेदनशीलतेने अधोरेखित करतात. तारुण्य अवस्थेत प्रेमभावना प्रबळ असते. या प्रेमभावनेच्या बळावरच तरुण-तरुणी एकमेकांच्या प्रेमात पडतात, आणाभाका घेतात, एकमेकांना वचने देतात आणि सुंदर आयुष्याची सुंदर स्वप्नेही पाहतात. परंतु समाजव्यवस्थेतील विकृत मनोवृत्तीमुळे अनेक प्रेमवीरांचे स्वप्न भंग पावते.

'स्वप्ने विरून गेली, सत्ये निघून गेली
जोडीने बांधलेली, वचने विझून गेली
हृदयाशी मिळालेली, हृदये तुटून गेली
मागील त्या स्मृतींची, स्वप्ने विटून गेली
ज्या मांडीवर ठेवुनी डोके, रंगविली स्वप्ने
त्या मांडीस पडल्या आळ्या, ती मांडी सडून गेली'

प्रेमातील ही अस्वस्थता संपुष्टात आणायची असेल तर जाती धर्माच्या पलीकडे जाऊन प्रेमाचा विचार करावा लागेल. याची जाणीव कवी करून देतो. या कविता केवळ राजकीय, सामाजिक, आर्थिक विषमतेला गच्छंती मिळवू पाहणारी नाही, तर अख्ख्या मानव्याला ती कवेत घेणारी आहे.

'धर्म असूनही धर्मनिरपेक्ष व्हावे माझे गाव
प्रज्ञा, शील, करुणा यावी, संपावा अन्याय'

अशी ही बहुआयामी मूल्यांची जाणीव करून देणारी कविता आहे. वाडाशाही, दडपशाही, ठोकशाही, धर्मांधता, घातपात, विविध क्षेत्रातील भ्रष्टाचार, राजकारणातील धनदांडगेपणा, सुशिक्षितांची बेकारी आणि सरकारी योजनेतील टक्केवारीचं राजकारण पाहून कवीचं मन उद्विग्न होतं

'प्रजा सारी आंधळी, सत्तेचा दिन आहे
सोने जाते परदेशी
भारत खाई मेवा
स्वातंत्र्याचे गीत आहे
बलात्कारी प्रीत आहे.'

व्यवस्थेत वाढत चाललेली ही कुरूपता, कृतघ्नपणा देशाची अधोगती करणारा आहे. म्हणूनच कवीला संविधानाच्या स्वप्नातला गाव उभा

करायचा आहे.

'अश्रू आनंदाचे सारे
माझ्या डोळ्यामध्ये येवो
संविधानासारखा आता
माझा गाव होवो'

डॉ. सुभाष वाघमारेयांच्या कविता वाचकांना संविधानाच्या स्वप्नातला गाव उभा करण्यासाठी निश्चित प्रेरणा देणाऱ्या आहेत. त्यांची कविता सर्वांशी संवाद साधणारी, स्वतःची स्वतंत्र वाट चोखाळणारी आहे. त्यांच्या कवितेत शब्दांचा आक्रस्ताळेपणा, भावनांचे आक्रंदन नाही. सामाजिक भान आणि सामाजिक आवाहन हे त्यांच्या कवितेचे वेगळेपण आहे. विधायक, विवेकी बदलासाठी वाचकांना तत्पर करणारी ही कविता उद्याच्या एकात्म गावाचा श्वास बनेल. यात शंका नाही. कवीच्या पुढील प्रवासाला मनःपूर्वक शुभेच्छा!

**संविधानाच्या स्वप्नातलं गाव**

डॉ. सुभाष वाघमारे

(मो. ९८९०७२६४४०)

साहित्यविश्व प्रकाशन, पुणे

मूल्य – रु. २५०/-

■ ■ ■



# संवाद



अतुल जगताप
९०२८५ ६८५८२

फक्त समोरून
किंचित जरी कल्पना दिली असती दाभोलकरांना
तर खरंच
तुम्ही मारलंच नसतं त्यांना!

फक्त समोरून...
जरी दोन शब्दांचा झाला असता संवाद
तर खरंच,
निर्भयता आणि नीतीचा 'चमत्कार'
पुन्हा एकदा पाहायला मिळाला असता
बुद्ध आणि फुलें नंतर...
मैत्रीबळाच्या कार्यकारणभावासहित!

फक्त समोरून
दोनच शब्द...

तर खरच
तुम्ही झाला असता त्यांचे अंगरक्षक!

त्या विवेकी संगतीने तुमचा भविष्यकाळ
नक्कीच उजळला असता!
नक्कीच उजळला असता!!

■ ■ ■

# महा. अंनिसची खबरबात



विशाल विमल
७२७६५ ५९३१८

## ■ कार्यकर्त्यांना पंचसूत्रीचे प्रशिक्षण

**पुणे :** शिवाजीनगर पुणे शाखेने २६ सप्टेंबर रोजी पुण्यात 'महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची पंचसूत्री आणि भूमिका' या विषयावर कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर आयोजित केले होते. या शिबिरात नावनोंदणी करून सुमारे ६६ जुने-नवे सक्रिय असलेले कार्यकर्ते सहभागी झाले होते. या





शिबिराला जिल्ह्यातील शिवाजीनगर, आकुर्डी, चाकण या तिन्ही शाखांचे कार्यकर्ते उपस्थित होते. या शिबीराचे उदघाटन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि महाराष्ट्र अंनिसचे पुणे जिल्हा अध्यक्ष मानव कांबळे यांनी केले.

'बुवाबाजी आणि शोषण' या विषयावर सुशीला मुंडे (राज्य प्रधानसचिव, महाराष्ट्र अंनिस) यांनी मांडणी केली. 'धर्मचिकित्सा आणि फलज्योतिष' या विषयावर डॉ. नितीन शिंदे





(संपादक अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका) यांनी मांडणी केली. 'संतसुधारक आणि संविधान' या विषयावर विशाल विमल (राज्यपदाधिकारी, प्रकाशन विभाग) यांनी मांडणी केली. 'वैज्ञानिक दृष्टिकोन आणि चमत्कार' या विषयावर प्रा. मच्छिन्द्रनाथ मुंडे (कार्यवाह प्रकाशन विभाग) यांनी मांडणी केली. 'व्यापक परिवर्तन व अंनिसची भूमिका' या विषयावर प्रा. संजय बनसोडे (प्रधानसचिव महाराष्ट्र अंनिस) यांनी मांडणी केली. 'कायदे आणि कामगिरी' या विषयावर ॲड. मनीषा महाजन (कार्यवाहक कायदे विभाग महाराष्ट्र अंनिस) यांनी मांडणी केली.

विशाल विमल, सचिन नेलेकर, विनोद खरटमोल, रविराज थोरात, मयूर पटारे, संदीप कांबळे, संदीप गुंजाळ, राजकुमार भंडे, सम्यक वि. म., घनश्याम येणगे, प्रिंयका राऊत, रोहित घोगरे, लालचंद कुंवर, शिवकांत पपुलवाड, अविनाश

इंगळे, परिक्रमा खोत, क्रांती दांडेकर, अतुल सवाखंडे, प्रमोद बचुटे, पल्लवी सवाखंडे, प्रज्ञा सवाखंडे, हर्षदकुमार मुंगे, रविकिरण काटकर, अक्षय दाडीकर, दर्शन कुंवर, एकनाथ पाठक, गंगाधर सत्वधर, वनिता फाळके, नम्रता ओव्हाळ, सचिन माने, स्वप्नील भोसले, डॉ. जितेंद्र डोलारे, केशव कुदळे यांनी विशेष प्रयत्न केले, अशी माहिती शिवाजीनगर पुणे शाखेचे सचिव विनोद खरटमोल यांनी दिली.

### ■ गणेशोत्सवात बुद्धिवर्धक उपक्रम

**पुणे :** शिवाजीनगर पुणे शाखेने गणेशोत्सवात विविध उपक्रम राबविले. संघटनात्मक कामासह संघटना वाढीसाठी यातून प्रयत्न झाले. पुस्तक विक्री, पर्यावरणपूरक गणेशोत्सवाबद्दलची अंनिसची भूमिका सांगणारा व्हिडीओ,







पर्यावरणपूरक गणेशोत्सवाच्या घोषवाक्यांची पोस्टर, पालिका आयुक्तांना पर्यावरणपूरक गणेशोत्सवाबद्दलच्या आदेशाचे स्मरणपत्र, अंनिसची भूमिका मांडणाऱ्या पत्रकांचे वाटप, हौदात मूर्ती विसर्जन - निर्माल्य संकलनाचे फोटो, व्हिडीओ तयार करणे आदी उपक्रम कार्यकर्त्यांनी राबविले. या पाच उपक्रमात शाखेतील सुमारे ५० कार्यकर्त्यांनी काम केले.

अप्पा बळवंत चौकात सहा दिवस पुस्तक विक्रीचे स्टॉल लावले होते. अंधश्रद्धा निर्मूलन, सर्पविज्ञान, जादुई वास्तव, चमत्कारामागील विज्ञान, संत साहित्य, भारतीय संविधान, मानसिक आरोग्य, प्रबोधनाची गाणी आदी विषयांवरील ६० पुस्तकांची विक्री झाली. या पुस्तक विक्रीतून सुमारे ४९५८ रुपये प्राप्त झाले. विशेष म्हणजे या उपक्रमात २९ कार्यकर्त्यांनी काम केले. दररोज सुमारे तीन तास स्टॉल लावला जात होता. विशाल विमल, अविनाश इंगळे, वनिता फाळके, सदाशिव फाळके, संदीप गुंजाळ, आकाश छाया, लालचंद कुंवर, राजू भंडे, परिक्रमा खोत, अविनाश शेंबटवाड, प्रिया राजेश, अमोल गवळी, रवींद्र रणपिसे, स्वप्नील भोसले, मयूर पटारे, अश्विनी गायकवाड, रविराज थोरात, दीप्ती जाधव, विशाल चौधरी, शिवकांत पपुलवाड, राम सैदपूरे, रुपेश जगताप, भुपेश कबीरराज, हर्षदा मगर, घनश्याम येणगे, रविकिरण काटकर, रवी आमले, सचिन माने, केशव कुदळे, रोहित घोगरे या सर्व कार्यकर्त्यांनी बुक स्टॉलवर येऊन पुस्तक विक्री केली. रविराज थोरात यांनी बुक विक्रीचा व्हिडीओ बनविला असून तो इतरांना पाहण्यासाठी युट्युबवर उपलब्ध करून दिला आहे. महाराष्ट्र अंनिसच्या कामाची पंचसूत्री आणि भूमिकेची पावणे दोन हजार पत्रके सहा दिवस बुक स्टॉलवर आलेल्या नागरिकांना कार्यकर्त्यांनी वाटली. हे पत्रक वाचून चार जणांनी अंनिसच्या कामात सहभागी होण्यासाठी संपर्क केला आणि दोघेजण शनिवारी झालेल्या साप्ताहिक मिटींगला आले होते, ही महत्वाची उपलब्धी आहे. पत्रकाचे डिझाईन रविराज थोरात यांनी केले. पत्रकाचे लेखन, छपाई व्यवस्था विशाल विमल यांनी पाहिली. रविकिरण काटकर यांनी मदत केली.

गणपती विसर्जनासाठी हौद आणि निर्माल्य संकलनासाठी कलश उभारावे आदी सूचनांचा आदेश राज्य सरकारने २०११ साली स्थानिक स्वराज्य संस्थांना काढला आहे. या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी असे स्मरणपत्र शाखेच्यावतीने आयुक्त विक्रम कुमार यांना देण्यात आले. संदीप गुंजाळ, विशाल विमल, रविराज थोरात यांनी हे पत्र तयार करून सुपूर्द केले. महाराष्ट्र अंनिसच्या २५ वर्षांपासूनच्या पर्यावरणपूरक गणेशोत्सवाची भूमिका मांडणारे दोन व्हिडीओ बनविण्यात आले. स्क्रिप्ट लेखन विशाल विमल यांनी केले. व्हिडीओ निर्मिती रोहित घोगरे, रविराज थोरात यांनी केली. व्हिडिओसाठी निवेदन माया बनकर, वीणा डोंगरवार यांनी केले. या कामासाठी सचिन नेलेकर, ॲड. संदीप गुंजाळ यांनी सहकार्य केले. हा व्हिडीओ सप्टेंबर अखेरपर्यंत साडेबाराशे नागरिकांनी पाहिला आहे. गणपती विसर्जनाच्या शेवटच्या दिवशी शहरातील नदी, नाले, ओढ्यांच्या ठिकाणी जाऊन कार्यकर्त्यांनी पाहणी केली. बहुतांश लोकांनी हौदात अथवा घरीच गणपती विसर्जन केल्याचे निदर्शनास आले. या कामात विशाल विमल, रविराज थोरात, अश्विनी गायकवाड, विशाल चौधरी, विनोद खरटमोल, अविनाश शेंबटवाड, रविकिरण काटकर, हर्षदकुमार मुंगे, स्वप्नील भोसले आदी कार्यकर्ते सहभागी होते. पर्यावरणपूरक गणेशोत्सवाची घोषवाक्य अविनाश शेंबटवाड, प्रिया राजेश, रविराज थोरात यांनी बनवली. ती महाराष्ट्रभर प्रसारित झाली, अशी माहिती शाखेचे सचिव विनोद खरटमोल यांनी दिली.

### ■ आंतरजातीय-धर्मीय विवाहितांचा सन्मान

**पुणे :** महाराष्ट्र अंनिसच्या आकुर्डी पुणे शाखेने 'आंतरजातीय-धर्मीय विवाहितांचा सन्मान' या कार्यक्रमाचे ५ सप्टेंबर रोजी आयोजन केले आहे. तक्षशीला बुद्धविहार आकुर्डी येथे हा कार्यक्रम झाला. प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि महाराष्ट्र अंनिसचे पुणे जिल्हा अध्यक्ष मानव कांबळे उपस्थित होते. अध्यक्षस्थानी आकुर्डी शाखेचे अध्यक्ष डॉ. योगेश गाडेकर होते. अमृता भोसले - आशिष वानखेडे, गिता हरावडे -





रवि भिसे, ज्योती डखरे - अभय लांडगे, पूजा कलवले - अजिंक्य सांडभोर, रेणुका बनसोडे - ईश्वर राठोड, अश्विनी सुर्यवंशी - गोपीनाथ गायकवाड, शहेनाज कुरणे - राधेश्याम धाडगे, दिव्या वाघमोडे - रियाझ शेख, रुपाली बोरकर - दर्शन देवकांत या आंतरजातीय - धर्मीय विवाह केलेल्या जोडप्यांचा सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, पुस्तके आणि रोप भेट देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी लोणंद (सातारा) येथील अंकुश सव्वलाखे आणि टीमने बुवाबाजी विषयी नाटक सादर केले. राज्यपदाधिकारी ॲड. मनीषा महाजन, विशाल विमल, शिवाजीनगर पुणे शाखेच्या अध्यक्षा वनिता फाळके याप्रसंगी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आकुर्डी शाखेच्या कार्याध्यक्ष क्रांती दांडेकर यांनी केले. श्रावणी वाळुंज, नेहा सोनवणे यांनी गाणी सादर केली.

अरूणा यशवंते, गंगाधर सत्वधर, सुरेश पोतदार आणि अभिलाषा महाजन यांनी कार्यक्रमाला अर्थसहाय्य केले. स्वप्निल वाळूंज, गणेश तमाचिकर, महेंद्र गायकवाड, भुषण महाजन, सुधीर सोनावणे यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रयत्न केले. सुत्रसंचलन नितीन कांबळे यांनी केले. एकनाथ पाठक यांनी आभार व्यक्त केले, अशी माहिती आकुर्डी पुणे शाखेच्या कार्यध्यक्षा क्रांती दांडेकर यांनी दिली.

■ **दुःख समजावून घ्या : खिवसरा**

**धुळे :** जागतिक आत्महत्या प्रतिबंधदिनानिमित्त महाराष्ट्र अंनिस निमगुळ (जिल्हा धुळे) शाखेतर्फे निमगुळ बस स्थानक येथे जनजागृती करण्यात आली. यावेळी रावसाहेब चव्हाण, अजय मराठे,



आधार सोनवणे, पुंजाराम सोनवणे, वामन सोनवणे, हिलाल राजपूत, रवींद्र बोरसे, भाईदास सोनवणे, इंद्रजीत सूर्यवंशी, पंकज सूर्यवंशी, तेजस सोनवणे, गौरव सोनवणे, तुषार चित्ते, नागराज सोनवणे ,चंदन सोनवणे, लोटन सोनवणे, विकास महाजन, आदी उपस्थित होते. "कालपर्यंत आपल्याशी बोलणारी व्यक्ती, गप्पा मारणारी व्यक्ती दुसऱ्याच दिवशी या जगातून नाहीशी होते. आत्महत्या करणारी व्यक्ती आपल्या मागे अनेक प्रश्न सोडून जाते. त्यांच्या परिवाराला बऱ्याच संकटांना नंतर सामोरे जावे लागते. प्रत्येक व्यक्तीने याविषयी समजून घेणे महत्वाचे आहे. अनेक गोष्टींमुळे व्यक्ती आत्महत्याकडे वळते. आर्थिक अडचण, प्रेमभंग, नातेसंबंध प्रॉब्लेम, नोकरी मिळत नाही इत्यादी कारणे आहेत. ज्या व्यक्तीच्या मनात आत्महत्येचे विचार येतात. त्या व्यक्तीवर टीका न करता त्यांना बोलते करणे. त्यांचे दुःख प्रश्न समजून घेणे फार महत्त्वाचे असते. विशेष करून ताणतणाव कमी करणे. त्यांच्या लक्षणांकडे विशेष लक्ष देणे. त्यांच्याशी सुसंवाद साधणे महत्वाचे आहे, अशी माहिती महाराष्ट्र अंनिसचे दिलीप खिंवसरा यांनी सांगितले.

■ **चमत्कार सत्यशोधन दिन**

**धुळे :** न्यू इंग्लिश स्कुल निमगूळ येथे चमत्कार सत्यशोधन दिनानिमित्त कार्यक्रम घेण्यात आला. २१ सप्टेंबर १९९५ ची पुनरावृत्ती परत होऊ नये, यासाठी प्रबोधन करण्यात आले. मुलांमध्ये



वैज्ञानिक दृष्टिकोन राबवून प्रत्येक गोष्टीमध्ये कार्यकारणभाव असतो, चमत्कार करणारे ढोंगी असतात, ते लोकांची फसवणूक करतात, अत्याचार सुद्धा करतात, अशी माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. यावेळी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे पदाधिकारी दिलीप खिवसरा यांनी चमत्कार करणाऱ्या बाबांचा भांडाफोड उदाहरणासह सादर केला. यावेळी प्राचार्य पी. पी. पाटील, पर्यवेक्षक देसले व विद्यार्थी उपस्थित होते, अशी माहिती दिलीप खिवसरा यांनी दिली.

■ **नाशिक :** महापालिकेने विसर्जित मूर्ती आणि निर्माल्य संकलन केंद्र उभारली होती. यावेळी



पाईपलाईन रोड, आनंदवली येथे महाराष्ट्र अंनिसच्या कार्यकर्त्यांनी त्यामध्ये सहभाग घेतला, अशी माहिती ठाकसेन गोराणे यांनी दिली.

## ■ पुण्यात जातपंचायतीच्या १४ पंचांना अटक

**पुणे** : पत्नीपासून अलिप्त होण्यासाठी घटस्फोटाचा दावा जातपंचायत ऐवजी न्यायालयात दाखल केल्याने जातपंचायतीने मुलाच्या कुटुंबियांना वाळीत टाकल्याची धक्कादायक घटना




पुण्यातील वाकड येथे घडली आहे. मुलासह कुटुंबियांना पावणे तीन वर्षांपासून जातपंचायतीच्या हुकुमावरून समाजातून बहिष्कृत केले आहे. त्यामुळे जातपंचांयतीचे पाटील, पंच यांच्यासह १४ जणांविरोधात वाकड पोलीस ठाण्यात सामाजिक बहिष्कार विरोधी कायद्याच्या कलम ५ व ६ नुसार आणि भारतीय दंड विधान संहितेच्या कलम १२०- बी नुसार महाराष्ट्र अंनिसच्या आकुर्डी पुणे शाखेच्या पुढाकाराने गुन्हा दाखल झाला आणि आरोपींना अटकही झाली आहे. सदर आरोपी हे जमिनीवर बाहेर आहेत, अशी माहिती अंनिसचे राज्य पदाधिकारी विशाल विमल, अँड. मनीषा महाजन यांनी प्रसारमाध्यमांना दिली. यावेळी पीडित सीताराम सागरे, त्यांचे आईवडील, शिवाजीनगर पुणे शाखेच्या अध्यक्षा वनिता फाळके, महाराष्ट्र अंनिसचे पुणे जिल्हा निधी व्यवस्थापन विभागाचे कार्यवाह एकनाथ पाठक उपस्थित होते.

जातपंचायतीचे पाटील आणि पंच म्हणून मुलीचे आजोबा, मामा हे काम पाहत असून त्यांच्या विरोधात हा गुन्हा दाखल झाला आहे. सागरे कुटुंबियांच्या तक्रारीची दखल घेऊन संबंधितांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी महाराष्ट्र अंनिसने पोलिसांकडे केली होती. करेप्पा मारुती वाघमारे, बाजीराव करेप्पा वाघमारे, साहेबराव करेप्पा वाघमारे, बाळकृष्ण करेप्पा वाघमारे (सर्व रा. वाल्हेकरवाडी), मोहन शामराव उगाडे (रा. ताथवडे), मनोज सागरे, विजय सागरे (रा. वारजे माळवाडी) रामदास भोरे (रा. हिंजेवडी), अमर भोरे, महादेव भोरे (रा. मुंबई), मारुती वाघमारे (रा. उरळीकांचन), विष्णू वाघमारे (उडगी, अक्कलकोट), अमृत भोरे, गोविंद भोरे (रा. मुंबई) या १४ जणांविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. सिताराम कृष्णा सागरे (वय 33 वर्षे, रा. वाकड) यांच्या तक्रारीवरून हा गुन्हा दाखल झाला आहे. सीताराम सागरे यांचा ०१ जानेवारी २०१३ रोजी शितल भोरे यांच्याशी विवाह झाला. मार्च २०१८ मध्ये नवरा बायकोमध्ये किरकोळ कारणावरून वाद झाले. कुटुंबीय नातेवाईक हे पत्नी शीतल हिला माहेरी घेऊन गेले. सागरे यांनी पत्नी शीतल भोरे यांच्यापासून अलिप्त होण्यासाठी कौटुंबिक न्यायालयात डिसेंबर २०१८ मध्ये दावा दाखल केला आहे. मात्र भारतीय राज्यघटनेच्या विसंगत आणि भारतीय न्याय व्यवस्थेच्या समांतर असलेल्या शोषणकारी जातपंचायत ऐवजी न्यायालयात घटस्फोटाचा दावा दाखल केल्याने सागरे कुटुंबियांना पावणे तीन वर्षांपासून जातपंचायतीच्या हुकुमावरून समाजातून बहिष्कृत

केले आहे.

जातीचे ठराविक लोक पंच म्हणून काम करत असून त्यातील मुख्य पंचाला पाटील म्हणण्याची प्रथा आहे. विशेषतः पत्नी शीतल यांचे आईचे वडील अर्थात आजोबा करेप्पा मारुती वाघमारे आणि मामा बाजीराव करेप्पा वाघमारे, साहेबराव करेप्पा वाघमारे, बाळकृष्ण करेप्पा वाघमारे हे जातपंचायतीचे पाटील म्हणून काम करत आहेत. त्यांच्या पुढाकारानेचे सागरे कुटुंबियांना समाजातून बहिष्कृत करून अमानवीय वागणूक देण्यात आली आहे. सागरे कुटुंबियांशी कुणी संबंध ठेवू नये, ठेवल्यास त्यांनाही वाळीत टाकू, असे फर्मान जातपंचायतीने काढले आहे. सागरे कुटुंबियांना समाजातील, नात्यातील सुखदुःखाच्या प्रसंगात सहभागी करून घेतले जात नसून, त्यांच्याही कार्यक्रमांना कुणाला येऊ दिले जात नाही. वाळीत टाकण्याबाबत सागरे कुटुंबीयांनी जातपंचायतीचे पाटील आणि पंचांना विचारणा केली असता वाळीत टाकण्याचे कृत्य योग्यच असल्याचे त्यांचे मत आहे. मिटिंगचे फोटो काढले असता सीताराम सागरे यांना पंचांनी मारहाण केली असून त्यांचा चष्मा फोडला. सागरे कुटुंबियांशी गावाला कुणी बोलत नाही. घरच्या कार्यक्रमाला कुणी येत नाही. सागरे कुटुंबियांकडून दरवर्षी घेतली जाणारी जीवगंता वर्गणीही घेतली जात नाही. तसेच त्या वर्गणीचे समाजात वाटप होते. मात्र ते वाटप सागरे कुटुंबियांना दिले जात नाही. चुलत्यांनी लग्न पत्रिकेत सीताराम सागरे यांच्या वडिलांचे नाव टाकले म्हणून त्यांचीही वर्गणी घेतली जात नाही, अशी कृत्य जातपंचायतीच्या हुकुमावरून घडत आहेत, अशी माहिती सीताराम सागरे यांनी दिली.

## ■ पर्यावरणपूरक काम करणाऱ्यांचा सन्मान

**जळगाव :** महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या जळगाव शहर शाखेमार्फत शाडू मातीची मूर्ती



बनविणाऱ्या, घरगुती गणपतींचे विसर्जन घरीच बादलीमध्ये करणाऱ्या नागरिकांचा सन्मान करण्यात आला. खोटेनगर, शंकर अप्पानगर, पिंप्राळा येथे दिगंबर कट्यारे (जिल्हा कार्याध्यक्ष, महा. अंनिस) यांच्या हस्ते सन्मानपत्र देण्यात आले. सदर प्रसंगी कार्यकर्ते ॲड.भरत गुजर, शिरीष चौधरी उपस्थित होते.

पाळधी येथील काही युवक दीपक माळी या युवकासह समाधान भोई व कैलास कोळी या युवकांचा सन्मान केला. केवळ देणगी रुपाने शाडुमातीचा गणपती देण्याचा उपक्रम त्यांनी राबवला होता. डॉ. व्ही. आर. पाटील लिखित 'आयुष्य उलगडतांना' हे पुस्तक देऊन या युवकांचा सन्मान करण्यात आला. यावेळी जिल्हाध्यक्ष दिगंबर कट्यारे, ॲड.भरत गुजर, शिरीष चौधरी, जितेंद्र धनगर, कृष्णा बिचवे, सोनार सर उपस्थित होते, अशी माहिती दिगंबर कट्यारे यांनी दिली.

## ■ पोलिसांना जादूटोणा विरोधी कायद्याचे प्रशिक्षण


**नागपूर :** येथील यशोधरानगर पोलीस स्टेशनच्या कर्मचारी व अधिकाऱ्यांना महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा प्रतिबंध व उच्चाटन अध्यादेश - २०१३ या कायद्याची कडक अंमलबजावणी करण्याबाबत महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती नागपूर जिल्हा कार्यकर्त्यांनी प्रशिक्षण शिबिर घेतले. या शिबिराची सुरुवात संविधान प्रास्ताविका व गीत सादरीकरणाने जिल्हा सांस्कृतिक विभाग कार्यवाह

रवी सहारे यांनी केली. जिल्हा अध्यक्ष जगजीत सिंग यांनी समितीची पंचसूत्री व चळवळीची माहिती




दिली. जादूटोणाविरोधी कायद्याची सखोल माहिती तसेच एकूण बारा कलमांची उदाहरणांसह चित्रमय माहिती राज्य सरचिटणीस संजय शेंडे यांनी उपस्थितांना दिली. यावेळी बुवा, बाबा, मांत्रिक सामान्य नागरिकांना चमत्काराच्या जाळ्यात कसे अडकवतात यावर चमत्कारांचे सादरीकरण जिल्हा कार्याध्यक्ष गौरव आळणे यांनी केले. यानंतर सहप्रयोग चमत्कारामागील कारणांची मीमांसा करुन उकल करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी यशोधरा नगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय जाधव होते. कायद्याची माहिती व चमत्काराच्या मागचे विज्ञान प्रत्येक पोलिस कर्मचाऱ्याला माहीत असावे, याकरिताच अंनिसच्या शिबिराचे आयोजन करण्यात आल्याचे जाधव यांनी मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हा महिला सहकार्यवाह चैताली रामटेके, तर आभार प्रदर्शन जिल्हा बुवाबाजी संघर्ष कार्यवाह मंजुश्री फोपरे यांनी केले, अशी माहिती गौरव आळणे यांनी दिली.

■ ■ ■





महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे
विवेक जागर प्रकाशन
फक्त
२१० /-
सवलतीत मिळवा
जातपंचायतींना मूठमाती
- कृष्णा चांदगुडे
जातपंचायतींना मूठमाती
लेखक : कृष्णा चांदगुडे
मूळ किंमत : २२५ रुपये
बुकिंग करा
72765 59318 / 99694 73702
गुगल पे अथवा बँक खात्यावर पाठवू शकता.
गुगल पे नं. 7276559318 (vishal vimal)
बुक खाते : विवेक जागर संस्था, आय. सी. आय. सी. आय. बँक, मुंदडा मार्केट, धुळे, अकौंट नंबर : 646301002757, ifsc code : ICIC0006463
पैसे पाठवले की वरील नंबरच्या व्हॉट्सऍपवर
स्क्रीनशॉट पाठवा.
नाव, पिन कोडसह पत्ता, मो.नंबर पाठवा.



महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे
विवेक जागर प्रकाशन
आम्ही वारस विवेकाचे
प्रकाशनपूर्व सवलत
2 पुस्तके फक्त 240 रु. घरपोच
फलज्योतिष
भ्रमातून वास्तवाकडे
लेखक : डॉ. नितीन शिंदे
किंमत : २०० रुपये
ओळखा
नवरत्नाचा विळखा
लेखक : डॉ. नितीन शिंदे
किंमत : ८० रुपये
• मुदत : १५ सप्टेंबरपर्यंत
• पुस्तके घरपोच मिळतील.
• पोस्टेज खर्च वेगळा द्यावा लागणार नाही.
• गुगल पे, बँक खात्यावर ऑनलाईन पैसे पाठविण्याची सुविधा.
◆ बुकिंग करा 7276559318 / 9969473702 ◆

- सदरचा अंक महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीसाठी विवेक जागर ट्रस्टच्यावतीने प्रकाशित करण्यात आला आहे.
- अंधश्रध्दा निर्मूलन पत्रिकेसाठी लेखन साहित्य युनिकोड फॉंटमध्ये टाईप केलेले किंवा सुवाच्च अक्षरात कागदाच्या एकाच बाजूस लिहिलेले असावे.
- लेखकाने स्वतःचे नाव, मोबाईल नंबर व इमेल बिनचूक नमूद करावा.
- लेखन साहित्यासोबत लेखातील आशयाला समर्पक दोन फोटो आणि स्वतःचा फोटो पाठवावा.
- समताधिष्ठित समाजरचनेला पोषक भूमिका मांडणाऱ्या दर्जेदार साहित्याचे स्वागत आहे.
- लेखकांनी आपले लेखन शक्यतो प्रत्येक महिन्याच्या २० तारखेपर्यंत पाठवावे.
- अंकासाठी साहित्य ९९२०१ २८६२८ या व्हाटस् ॲप नंबरवर अथवा manspatrika@gmail.com या इमेलवर पाठवावे.
- तूर्त अंक ऑनलाईन पाठवण्यात येईल.
- ऑनलाइन अंक निशुल्क असेल. छापील अंकाच्या वर्गणीचे स्वरुप यथावकाश कळविण्यात येईल.
- छापील स्वरुपातील अंकाचे वर्गणीदार होऊ इच्छिणाऱ्यांनी ७२७६५५९३१८ या व्हाटस् ॲप नंबरवर पूर्वनोंदणी करावी.


**संपादकीय पत्ता**

संपादक
अंधश्रध्दा निर्मूलन पत्रिका
'कल्पतरु', कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजसमोर,
इस्लामपूर, जि. सांगली, ४१५४०९



www.mans.org.in
/pg/MaharashtraANiS /MahaANIS_MANS /t.me/mahaANIS


बुक पोस्ट

प्रति,

..........

..........

..........

**प्रेषक**


कार्याध्यक्ष, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, भास्कर-६८, कालिकादेवीनगर,
संघमा चौक, गोळीबार टेकडी रस्ता, धुळे, ४२४००१